
छात्र

# प्रबोधन

सौर श्रावण शके १९१९
वर्ष ६ अंक १




## सुवर्णमहोत्सवी स्वातंत्र्यदिन विशेषांक

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी अभिनव मासिक!

# हे स्फुरण येथुनि दशदिशांतराला जावो!!



*आजच्या विज्ञानयुगात विज्ञानाचे महत्त्व ओळखून त्याचा वापर जागरूकपणे करणे आवश्यक आहे. त्यासाठी अंधश्रद्धांवर मात करून वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याची गरज आहे. म्हणून तुम्ही हा दृष्टिकोन आत्मसात करा.*

(जयंत नारळीकर)

*कलाकृती ही केवळ जीवनाचे प्रतिबिंब असू नये तर त्यातून जीवनाच्या मूल्यांचा साक्षात्कार घडावा. कारण कला ही केवळ करमणुकीची गोष्ट नाही. रसिकाच्या हृदयाला हात घालून त्याला प्रेरणा देणारी ती असाधारण शक्ती आहे. या शक्तीचा राष्ट्रसंवर्धनासाठी उपयोग करणे हे कलावंताचे कर्तव्य आहे.*



(भय्यासाहेब ओंकार)



*टागोरांचे काव्य आहे : फूल फळाला विचारतं, 'तू किती दूर आहेस?' फळ उत्तरलं, 'मी दूर नाही, मी तुझ्या हृदयातच आहे." साधना आणि सफलता यांच्यातील नातंही असंच असतं.*

(वि. वा. शिरवाडकर)

*'ग्रंथ' हे आपले सर्वात विश्वासू मित्र आहेत. म्हणून या मित्रांची संगत कधीही सोडू नये. ग्रंथांच्या वाचनाने माणसाच्या मनातील संकुचित भाव दूर होतात. ते चांगलाच विचार करीत राहते. वाचनाने जीवनाचा अर्थ समजतो. म्हणून ग्रंथांची सोबत नित्य असावी. स्वातंत्र्याचा खरा अर्थही त्यामुळेच समजेल.*



(द. मा. मिरासदार)



*"स्वातंत्र्य हेच खरे जीवन-पारतंत्र्य म्हणजे मरण. ज्या समाजात समता आणि बंधुभाव असेल तेथेच स्वातंत्र्य बहरते. "*

(ग. प्र. प्रधान)

*(स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त भारताच्या पराक्रमी, देशभक्त, सुपुत्रांनी छात्र प्रबोधनच्या वाचकांसाठी दिलेले खास संदेश)*

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती,
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख लेऊनी
ने ज्योतिर्जगतात।

**संपादक, प्रकाशक**
महेंद्र सेठिया
**संपादक मंडळ**
महेन्द्र सेठिया B.E.,M.Ed
विवेक पोंक्षे M.Sc.,M.Ed
अनघा लवळेकर M.A.,M.Ed
शैजला देशमुख M.A.,M.Ed
**मुखपृष्ठ व आतील चित्रे:**
भास्कर सगर
**अक्षर जुळणी**
प्रिंट लिंक, पुणे
**सपर्क पत्ता**
**'छात्र प्रबोधन'**
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
०२१२-४७७६९१, ४७८०९५
**प्रकाशन दिनांक**
राष्ट्रीय सौर १५ श्रावण, शके १९१९
६ ऑगस्ट १९९७
**वर्गणी**
भारतात
**वार्षिक**-रु. १२५/- **द्वैवार्षिक**-रु. २४०/-
**त्रैवार्षिक**-रु.३५०/- **आजीवन**-रु. २०००/-
**भारताबाहेर - वार्षिक** ३० डॉलर

वर्ष ६ अंक १
सौर श्रावण शके १९२०

# छात्र प्रबोधन

## सुवर्णमहोत्सवी स्वातंत्र्यदिन विशेषांक

## अं त रं ग

२ संवाद
३ जमाखर्च स्वातंत्र्याचा
७ 'गाझी'च्या विनाशाचे गुपित
९ मागोवा पंतप्रधानांच्या भाषणांचा
१४ कविता पानोपानी
१५ संगणक सजीव झाला
१८ माकडांचा खेळ
२१ तेजस्वी उल्का - कल्पना दत्त
२३ गंध मोहवी काव्याचा - 'कविता स्वातंत्र्याची'
२७ वीरतेसाठीचे सर्वोच्च पदक 'परमवीर चक्र'
२९ मनात जपलेले ते '१४' दिवस
३३ वाचलेच पाहिजे असे काही -'स्वाधीन की दैवाधीन'
३५ जराशी ओळख ईशान्य भारताची
३८ भारतमातेची मुले
४० स्थानिक कार्यालयांचे पत्ते

*आपण स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव साजरा करत असतानाच ज्ञानप्रबोधिनी आपला ३५ वा वर्धापनदिन साजरा करत आहे. त्यानिमित्ताने प्रबोधिनीचे संचालक डॉ. गिरीश बापट यांचा प्रबोधकांना प्रेरणादायी संदेश!*

## आम्ही जग जिंकलेच पाहिजे!

स्वामी विवेकानंदनी भारतात परत आल्यावर केलेल्या भाषणात म्हटले की, 'आम्ही जग जिंकलेच पाहिजे.' स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी पन्नास वर्षे आधी केलेले हे आवाहन स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पन्नास वर्षांनी अधिकच आव्हान देणारे वाटते आहे, इतर देशांनी तलवारीच्या, बंदुकीच्या, व्यापाराच्या जोरावर जग जिंकण्याचा प्रयत्न केला. स्वामी विवेकानंद म्हणाले, 'की भारताने जग जिंकण्याचा मार्ग वेगळाच आहे. आपल्या विचारांनी जगाला मंत्रमुग्ध करून आपण जग जिंकले पाहिजे.' अतिमंदपणे पडणाऱ्या, पडताना कुणाला न दिसणाऱ्या, न ऐकू येणाऱ्या आणि तरीही विलक्षण परिणाम घडवून आणणाऱ्या सकाळच्या दवाप्रमाणे भारतीय विचार जगभर पोचला पाहिजे, असे स्वामीजींनी सांगितले. शंभर वर्षापूर्वीचा त्यांचा हा संदेश आणखी शंभर वर्षे आपल्याला उपयोगी पडू शकेल. स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवाच्या वेळी स्वामीजींनी समोर ठेवलेले आव्हान स्वीकारण्यासाठी प्रत्येक प्रबोधकाने रोजच स्वत:ला बजावले पाहिजे.

*विज्ञान ज्ञान अमुचे परिपूर्ण होवो।*
*अभ्यास देशस्थितीचा समतोल चालो।*
*निष्ठा विवेक प्रकटो मन पूर्ण शुद्ध।*
*वर्तू अम्ही दृढ प्रसन्न नि ध्येयधुंद।।*

(गिरीश श्री. बापट)

## संवाद

*प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,*

*बघता बघता छात्र प्रबोधनाचं पाचवं वर्ष संपून सहावं वर्ष सुरू झालं. चौथ्या वर्षपेक्षा पाचव्या वर्षात पुढचं पाऊल पडल्याचा आनंद, समाधान निश्चितच आहे. मासिकातील लेखांचे वैविध्य वाढले. मुलांच्या व मान्यवरांच्या लेखनात भर पडली. दीपावली विशेषांकाला तीन पारितोषिके मिळाली. गावोगावी होणाऱ्या कार्यक्रमांची संख्या वाढली. स्थानिक कार्यकर्त्यांचा, उत्साही व धडपडणाऱ्या मुलामुलींचा गट काही ठिकाणी तयार होऊ लागलाय. हे सगळं जरी खरं असलं तरी झालेलं काम खूप छोटं आहे याची जाणीव आहे.* ***खूप मोठं स्वप्न डोळ्यासमोर ठेवूनच छात्र प्रबोधनाचा प्रारंभ झाला आहे.***

*तुमच्यासारख्या हजारो, धडपडणाऱ्या मुलामुलींसाठी सुप्त शक्ती जागृत करणं, ती विकसित करणं, राष्ट्रार्थ पराक्रम करण्याची प्रेरणा निर्माण करणं, इतरांसाठी झटण्याची वृत्ती वाढवणं, ज्यांना विकासाची संधी कधी मिळालीच नाही अशांपर्यंत ती संधी पोहोचवणं, त्यांच्यातला आत्मविश्वास जागा करणं, आणि या सर्वांमधून* ***कर्तृत्वसंपन्न–देशभक्त–चारित्र्यवान अन् संघटित युवापिढी निर्माण करणं हे ज्ञान प्रबोधिनीच्या 'छात्र प्रबोधन' मासिकाचं... चळवळीचं स्वप्न आहे.*** *आत्तापर्यंतची वाटचाल म्हणजे या दिशेने पडलेली पहिली पावलं आहेत. येत्या पाच वर्षात ही वाटचाल अधिक गतिमान करायची आहे.* ***तुम्हीही या वाटचालीचे भक्कम असे आधारस्तंभ व्हाल अशी अपेक्षा बाळगून आहोत.***

*येत्या १५ ऑगस्टला आपण आपल्या देशाचा सुवर्णमहोत्सव स्वातंत्र्यदिन साजरा करत आहोत. त्यानिमित्ताने स्वातंत्र्यप्राप्तीसाठी धडपडणाऱ्या, बलिदान करणाऱ्या क्रांतिकारकांच्या, स्वातंत्र्यसैनिकांच्या कथांपासून ते गेल्या ५० वर्षातील भारतीय घडामोडींपर्यंत अनेक गोष्टींचा आढावा घ्यायचा प्रयत्न या स्वातंत्र्यदिन विशेषांकात केला आहे. तुम्ही तो मनापासून वाचावा, समजून घ्यावा, त्यावर चर्चा करावी, चिंतन करावे अन् कृती करावी हीच अपेक्षा!*

*स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त ठिकठिकाणी अनेक प्रकारच्या कार्यक्रमांना उधाण येईल. दिवसभर विविध प्रकारच्या मिरवणुका, सभा, प्रदर्शने, स्पर्धा आयोजित केल्या जातील. जोडीला धांगडधिंगा, सिनेमातील भडक गाणी, आचकट–विचकट नाचणे, दारू पिऊन बेहोष होणे हेही अनेक ठिकाणी बघायला मिळेल. तर काहींच्या गावी १५ ऑगस्ट आला काय अन् गेला काय, स्वातंत्र्याला ५० वर्षे पूर्ण झाली काय अन् ६० झाली काय काही फरक पडलेला दिसणार नाही. अशी अनेक टोकं यानिमित्ताने बघायला मिळतील. तुम्ही काय करणार ?*

*शाळेतील ध्वजवंदनाला अन् अन्य कार्यक्रमांमध्ये तुम्ही सहभागी व्हालच पण* ***यावेळी आपले आईवडील, मोठे भाऊ–बहीण यांनाही आवर्जून ध्वजवंदनाला उपस्थित राहण्यास सांगा. यावर्षी सुवर्णमहोत्सवी स्वातंत्र्यदिनानिमित्त आपण सर्वजण असा संकल्प करूयात की*** *'या पुढच्या काळात मी शाळेत असेन अथवा महाविद्यालयात असेन, अथवा नोकरी–व्यवसायात असेन; देशात असेन अथवा परदेशात असेन; जेथे कोठे असेन तेथे १५ ऑगस्टला राष्ट्रगीत म्हणून ध्वजवंदन करीन, ज्याच्यामुळे हे स्वातंत्र्य मिळाले त्यांचं स्मरण करीन, आणि असे कार्य करण्याचा प्रयत्न करीन जेणे करून येणाऱ्या पिढ्यांना भारताचा अधिकाधिक अभिमान वाटेल'.*

*अशा संकल्पातून वैभवसंपन्न, कर्तृत्वसंपन्न, विश्वगुरूपदी विराजमान झालेल्या हिंदुस्थानचे चित्र साकारू या! काम अवघड आहे पण अशक्य नाही. अनेक ध्येयवेड्या माणसांच्या सहवासाने आपणही असे वेड लावून घेतले तर खऱ्या अर्थाने आपण अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिनाचे शिल्पकार होऊ. तसे घडावे हीच मातृभूमीच्या चरणी विनम्र प्रार्थना.*

सस्नेह तुमचा

(महेंद्र सेठिया)



# जमाखर्च स्वातंत्र्याचा !!

***देशाच्या स्वातंत्र्योत्तर इतिहासाकडे नजर टाकली असता गेल्या पन्नास वर्षात, आम्ही काय कमावले आणि काय गमावले, याचे एक चित्र डोळ्यांसमोर येते. केवळ इतिहासाचे गोडवे न गाता वास्तवाचे भान ठेवून भविष्याची स्वप्ने पाहणे शक्य व्हावे यासाठी गेल्या ५० वर्षांतील देशाच्या सामाजिक, वैचारिक, आर्थिक, सांस्कृतिक जमाखर्चाचा आढावा घेतला आहे प्रा. राम डिंबळे यांनी***

**१९४७** साली हिंदुस्थान स्वतंत्र झाला. म्हणजे कसे जगायचे, कसे वागायचे याचे निर्णय घेण्याचे अधिकार त्याने मिळविले. आज या गोष्टीला ५० वर्षे होत असताना या स्वतंत्रतेबद्दल काही सिंहावलोकन करण्याचा निश्चितच काही फायदा आहे.

प्रथम असा विचार येतो, परतंत्र होण्यापूर्वी भारत स्वतंत्र होता म्हणजे नक्की काय होत? भारत म्हणून आज आपण ज्या भौगोलिक आकाराकडे पाहतो, तो एका छत्राखाली असा संपूर्णच्या संपूर्ण कधी होता का? आचार भिन्न परंतु विचार एक, असे येथील स्वरूप होते. त्या अर्थाने मोगलांचे परकीय आक्रमण हे खऱ्या अर्थाने भारतीय संस्कृतीवरील पहिले आक्रमण! मुसलमानांनी लोकांच्या धर्माचारावर बळजबरी करायला प्रारंभ केला. लोकांचे तंत्र स्वत:च्या हाती राहिले नाही. ते खऱ्या अर्थाने परतंत्र झाले तेही याच काळात.

इंग्रजांच्या कारकिर्दीत जरी अशा प्रकारचे जुलूम झाले नाही तरी पूर्वीचे मोकळेपण गेले. स्वत:च्या सोईप्रमाणे शिक्षण, व्यापार इ. धोरणे इंग्रजांनी ठरविली. त्यामुळेच कारकून घडविणारे शिक्षण त्यांनी इथे रुजविले. इथे घडविलेल्या सुधारणाही आपली सत्ता सुरळीत चालावी या हेतूने राबविल्या गेल्या. एकूणच पारतंत्र्यामुळे इथल्या माणसाची अस्मिता दुखावली. परस्पर सामंजस्य संपले. संपत्तीचे शोषण सुरू झाले. इथल्या बुद्धिजीवी आणि पराक्रमी माणसांना भविष्य काळेकुट्ट दिसू लागले. जगातील स्वायत्त देश विज्ञान, तंत्रज्ञान, व्यापारात मोठी झेप घेत असताना,'' आम्हालाच का पारतंत्र्य पंजरी कोंडिले राम?'' हा प्रश्न त्यांना सतावू लागला. त्यातून विद्रोहाची बीजे रुजली. सारा देश ''करेंगे या मरेंगे'' या भावनेने पेटला. ब्रिटिशांना हा देश सोडावा लागला. जाताजाता फाळणीची जखम करून ब्रिटिश गेले. पण स्वातंत्र्य आले. भारतीयांनी या देशाच्या उज्ज्वल भवितव्याचा नियतीशी जणू करार केला.

स्वतंत्र झाल्यापासून आजपर्यंतच्या पन्नास वर्षात हिंदुस्थानात काही रूपांतर घडले, ते निश्चितपणे स्वातंत्र्यामुळेच घडू शकले, असे म्हणता येईल. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील लढाईने विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात हिंदुस्थानात बरे दिवस दिसणे शक्य झाले आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीतील कित्येकांचे बलिदान निश्चितच कारणी लागले आहे. खरे तर गेल्या हजार वर्षात कुठल्याही पिढीला आजच्या स्वतंत्र पिढी एवढे राजकीय स्थैर्य, स्वास्थ्य आणि विकासाची संधी लाभलेली नाही. मानवाची सारी संस्कृती रुजायला आणि फुलायला जे स्वास्थ्य लागते ते स्वातंत्र्याच्या पहिल्या अर्धशतकाने निश्चितच आपल्याला दिले! याच स्वास्थ्यामुळे संस्कृतीची मुक्त वाढ सुरू झाली. नवे तंत्रज्ञान आणि नवे विज्ञान प्रगत करण्यासाठी मुक्त प्रतिभेची गरज असते. पारतंत्र्याच्या काळात ही प्रतिभा काहीशी भेदरलेली झाली होती. तिला मुक्त करून फुलविणे हे पहिले आव्हान होते. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात हे आव्हान आपल्या पूर्वजांनी पेलले. म्हणूनच आपण आपल्या संस्कृतीत भर घालायला मोकळे झालो. ५० वर्षात आपण ही भर पुरेशी घातली का? या प्रश्नाचे उत्तर, आपण स्वातंत्र्य कसे वापरत आहोत, याचे दर्शन घडवील.



With Best Compliments from - **SUNIKEM ENTERPRISES, Pune.**

स्वातंत्र्योत्तर काळात, प्रगत राष्ट्रांचे अनुकरण करून हिंदुस्थानने तांत्रिक व वैज्ञानिक क्षेत्रात प्रगती केली. भारतीय उद्योगक्षेत्रात झपाट्याची वाढ या स्वातंत्र्य काळात झाली. आपण स्वतंत्र आहोत म्हणूनच जगातील औद्योगिक स्पर्धेपासून आपल्या उद्योगधंद्यांना प्रारंभिक संरक्षण आपण देऊ शकलो. त्यानंतर ९०-९१ सालापासून काहीशा जागतिक दबावाखाली आणि काहीशी काळाची गरज म्हणून आपण मुक्त अर्थव्यवस्था आणण्याचा निर्णय केला व आपल्या उद्योगांना जागतिक स्पर्धा आणि संदर्भ प्राप्त करून दिला.

स्वातंत्र्याचा दुसरा महत्त्वाचा लाभ म्हणजे, आपल्या इतिहासाचा अन्वयार्थ लावणे आणि आम्ही खरे कोण आहोत याचा, म्हणजे अस्मितेचा निर्णय करणे आणि आपला वारसा कोणता आहे याचा संभ्रम संपवणे, आपल्याला हळूहळू शक्य होत आहे. परतंत्र देशाची अस्मिता देखील परतंत्र असते. मात्र स्वातंत्र्याने आपल्याला ताठ मान दिली.

६२ साली चीनने चपराक दिल्यावर आपली अस्मिता दुखावली गेली.६५ साली पहिल्यांदा हिंदुस्थानच्या फौजा सरहद्दीपलीकडे आक्रमण करून विजयी झाल्या. आम्ही कोणीतरी आहोत, आम्ही प्रसंगी तडाखेही देऊ शकतो हे पहिल्यांदा सिद्ध झाले. 'धोतीवालेभी लढ सकते है' ही लालबहादूर शास्त्रींची युद्धघोषणा आपल्या अस्मितेचा पहिला समर्थ उद्गार होय.

स्वातंत्र्यामुळे हिंदुस्थानच्या सर्व सामाजिक थरांमध्ये विकासाची भूक निर्माण झाली आणि आम्ही देखील सर्वांच्या खांद्याला खांदा लावून, बरोबरीने चालू शकलो पाहिजे, असा समतेचा आग्रह निर्माण झाला. स्वातंत्र्याने सर्व समाजांना बोलते केले. पददलितांनाही शिक्षणाची संधी दिली. सत्तेत सहभागी मिळण्याची शक्यता निर्माण केली. रोजगार, घर, आरोग्य, शिक्षण या गोष्टी आपल्या हक्काच्या आहेत, हे या समाजाच्या मनातही येणे पारतंत्र्यात शक्य नव्हते.

जसे समाजाचे सर्व थर विकासाच्या संधीने हक्कदार बनत चालले तसेच हिंदुस्थानचे सर्व भौगोलिक विभागदेखील हिंदुस्थानच्या केंद्रीय सत्तेत आणि संपत्तीत सहभागी होऊ लागले. पारतंत्र्यात हे कधीच शक्य नव्हते. आज बिहार, आसाम यासारख्या प्रांतांना भारत सरकारच्या तिजोरीवर हक्क सांगता येतो आहे. तिथले उत्पन्न कमी असले तरी तिथे खर्च पुरेसा होऊ शकतो. या सर्वांचे कारण सर्व प्रांतांचे एकत्रित कुटुंब आपण दिल्लीत स्थापू शकलो आहोत. पश्चिम भारतातील पंजाब, गुजरात, महाराष्ट्रासारखे संपन्न प्रांत या एकत्र कुटुंबात गरीब प्रांतांच्या बरोबरीने वागू शकतात. तेही आपण स्वतंत्र झाल्यामुळेच.

खनिजे, जंगलसंपत्ती, जलसंचय, पिकाऊ शेतमाती या सर्व गोष्टी दीर्घकालीन पोषणाचा पाया आहेत, त्या कुणी आपल्याकडून खचून घेऊ नयेत यासाठी देश स्वाधीन व स्वायत्त असावा लागतो. पारतंत्र्यात ब्रिटिशांनी इथला कच्चा माल त्यांच्या सोईने पळवला, तसे आता शक्य नाही.

या देशातले मनुष्यबळ हे अधिकाधिक सक्षम व्हावे आणि ते देशाच्या कारणी लागावे याची खटपटही स्वतंत्र देशच करू शकतो. ४७ सालापूर्वी भारतीय सैन्याला ब्रिटिशांच्या जगभरातील लढाया लढत रहावे लागत होते. आज आपले मनुष्यबळ कसे वापरावे, त्यांना काय शिकवावे याची दिशा देखील आपणच ठरवू शकतो. जगभरातील उत्कृष्ट तांत्रिक मनुष्यबळात भारताचा क्रमांक तिसरा लागतो हे आपल्या शिक्षण यंत्रणेचे फलित आहे. आपली संरक्षणसिद्धता आणि अन्नधान्याची स्वयंपूर्णता ही देखील आपण आपल्या मनुष्यबळाच्या शिक्षणात भरपूर गुंतवणूक करू शकल्यामुळेच शक्य झाली. स्वातंत्र्यामुळे भारताच्या सर्व विभागांचा समतोल विकास झाला नाही, पण प्रत्येक विभागात विकासाची काही पावले नक्कीच पडली. समाजाच्या सर्व घटकांना समान संधी मिळाली असे झाले नाही, पण प्रत्येक घटक जागृत होऊन पुढची पावले टाकू लागला.

जगाच्या तुलनेत अजूनही आपला देश खूप गरीब आहे. तथापि आज दुष्काळांमध्ये लाखांनी लोकं मरताना पाहावे लागत नाही. साथीच्या आजारांनी गावेच्या गावे उजाड होत नाहीत. किंवा अंतर्गत संघर्षात हजारो मुडदे पडत आहेत अशी स्थिती नाही. सर्वसामान्य गरीब माणूस अगदीच पोरका नाही. त्याला कोणीतरी त्राता आहे. त्याच्या दु:खाच्या वेदना वेशीवर टांगू शकतो. त्याच्या पुढच्या पिढ्यांना त्याच्या इतक्या दारिद्र्याचे चटके सोसण्याचा शाप नाही. मी नाहीतर निदान माझा मुलागा तरी सुखाचे चार दिवस पाहील, अशी आशा तो बाळगू शकतो. एकेका पिढीत माणसांची स्थित्यंतरे होऊ शकतात. असा आत्मविश्वास दबलेल्या जातींना येऊ लागला आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या ५० वर्षात इथली



**MICROVERSE AUTOMATION (P) LTD.** for Automation, Requirements of process plant.

लोकशाही प्रक्रिया तावून सुलाखून निघत आता स्थिर झाली आहे.

४७ नंतरच्या पहिल्या १५ वर्षात या देशात मूलभूत रचनेचे युग अवतरले, उद्योगधंद्यांचा पाया घातला गेला. शिक्षण सार्वत्रिक होऊ लागले. शेती हरित-क्रांतीच्या दिशेने वाटचाल करू लागली. अलिप्त राष्ट्रांच्या रांगेत भारत मानाने बसू लागला. भाषावार प्रांतरचनेसाठी याकाळात मोठीच भावनात्मक आंदोलने झाली. सर्वात मोठा आघात मात्र चीनच्या आक्रमणाच्या रूपाने आपल्यावर झाला.

६३ सालानंतरच्या १० वर्षात दोन भारत-पाक युद्धे झाली. संयुक्त मंत्रिमंडळाच्या पहिल्या दुसऱ्या प्रयोगामुळे राजकीय तडजोडीचा परिचय झाला. दक्षिण भारतात हिंदी द्वेषाचा मोठा उद्रेक होऊन फुटीरतेच्या शक्यता डोळ्यासमोर उभ्या राहिल्या. याकाळात पाकिस्तानचे दोन तुकडे करण्यात आपल्याला यश आले.

७३ सालानंतरची ५ वर्षे इंदिरा गांधींच्या वादळी कारकिर्दीने गाजली. एक महिला सर्वसत्ताधिश होऊ शकते आणि सर्वसामान्य जनता हुकूमशाही विरुद्ध तीव्र प्रतिक्रिया उभी करू शकते याचा अनुभव आला. कॉंग्रेस पराभूत होऊ शकते असेही अनुभवास आले.

७८ सालापासून ९१ सालापर्यंतच्या १४ वर्षात हिंदुस्थानात फार मोठ्या उलथापालथी झाल्या. पंजाब व काश्मिरात अतिरेक्यांनी लोकशाही जेरीस आणली. पूर्वेकडे बोडो, उल्फा अतिरेक्यांनी प्रतिशासन उभे केले. इंदिराजी आणि राजीव गांधी या पंतप्रधानांचे वध करण्यात आले. पंतप्रधानपद उत्तरेऐवजी दक्षिणेकडे




आले. याच काळात संपूर्ण हादरवणारे बोफोर्स, हर्षद मेहता सारखे भ्रष्टाचाराचे उद्रेक झाले.

९२ पासून ९७ पर्यंतच्या पाच वर्षात बाबरी मशीद -रामजन्मभूमि वादाने हिंदुस्थानच्या अस्मितेचा प्रश्न उग्रपणे, उद्रेक घडवीत समोर आला आणि या प्रश्नावर संपूर्ण देशात ठळक दोन तट पडल्यासारखे झाले. याच कालखंडात पंजाब आणि काश्मीरचे टोकाला गेलेले पेचप्रसंग सुटले. भारतीय अर्थव्यवस्थेची दरी जगाला मोकळी करण्यात आली. केंद्रात आघाडीचे अल्पमतातले सरकार चालू शकते असे दिसले. तथापि हवाला व्यवहारात, भारतीय राजकारणातले पंतप्रधानापासूनचे दिग्गज गैरमार्गी पैशावर पोसले जात होते, हे उघड झाल्यावर संपूर्ण व्यवस्था हादरून गेली.

राजकारणाबरोबर समाजकारणाने देखील पन्नास वर्षात मोठी उलथापालथ पाहिली. ९२ सालानंतर राखीव जागांच्या प्रश्नावर मंडल आयोगाच्या निर्णयामुळे मोठ्या प्रमाणावर जातीय ध्रुवीकरण झाले. संपूर्ण राजकारणाला जातींच्या संघर्षाचे निर्लज्ज रूप आले. याच कालखंडात गुन्हेगार कोण अणि राजकारणी कोण हे वेगळे ओळखता येऊ नये इतकी संघटित गुन्हेगारीला प्रतिष्ठा आली.


खेड्यांमधून शहरांकडे स्थलांतर करण्याच्या प्रवृत्तीने एवढा वेग घेतला की ५० वर्षात नागरी लोकसंख्या तिप्पट झाली. महानगरामध्ये जवळजवळ ४० टक्के लोकसंख्या झोपड्यामध्ये भीषण अवस्थेत राहू लागली. या स्थितीत, गुन्हेगारी आणि दंगलखोरीची ही हमखास केंद्रस्थाने झाली आहेत. याशिवाय नागरी व्यवस्थापनात आपण कमी पडत असल्याने झोपडपट्यांमधील सांडपाणी, विष्ठा यांचा निचरा न होऊन सुरतसारख्या शहरात प्लेगने हाहा:कार माजवला. या झोपडपट्यांमधील व्यसनग्रस्तांचे प्रमाण एवढे वाढले की मादक द्रव्ये, तंबाखू आणि गुटखा यांसारख्या नव्या व्यसनांनी दारूवरही मात करून अव्वल स्थान पटकावले आहे.

प्रसारमाध्यमातील आधुनिक टी.व्ही. चॅनेल्स, इंटरनेट यासारख्या घटकांनी संपूर्ण समाजावर मोठी पकड घेतली आहे आणि बाजारू जाहिरातींनी प्रसारमाध्यमांना काखोटीला मारले आहे. या सर्वांमुळे भारतीय संस्कृतीला पचणार नाही इतका असभ्य उपभोगवाद तरूण पिढीच्या उरावर बसला आहे. त्यातून एड्स सारख्या, तरूण पिढी गारद करणाऱ्या भयावह रोगाने आपल्याकडच्या श्रमिक आणि कुशल कारागिरांचा घास गिळायला सुरुवात केली आहे.

व्यसन आणि स्वैर




**प्रायोजक : बजेट कन्स्ट्रक्शन, १०२ 'वीरशांती', क्रांतीचौक, औरंगाबाद.**



उपभोगवादाविरुद्धची राजकीय जनजागृती देखील प्रभावी ठरू शकते, असे आंध्रातील महिलांनी दाखवून दिले. परंतु सध्यातरी अनियंत्रित बाजारू अधाशीपणा आणि संघटित प्रतिक्रया यांच्यातले युद्ध अनिर्णीत अवस्थेतच आहे.

आधुनिकीकरणाचे महत्त्वाचे अग्रदूत म्हणून, कॉम्प्यूटर्स आणि ऑटोमायझेशन् ८० सालानंतर लोकमान्य झाले. तथापि बेकारी वाढून रोजगाराच्या संधी इथे कमी राहणार असे वाटून या  देशातील बुद्धिजीवी वर्ग परदेशात स्थलांतर करीत राहिला आहे. दुसरीकडे जगभरातील कंपन्या भारतीय उपखंडाला 'आयाती बाजारपेठ' म्हणून आशाळभूतपणे न्याहाळू लागल्या आहेत.

पन्नास वर्षापूर्वी ब्रिटीशांना घालवून देशाची सूत्रे हाती घेणारे भारतीय, पन्नास वर्षात स्वत:च ब्रिटिशांपेक्षा 'ब्रिटिश' होण्यात धन्यता मानू लागले आहेत. ब्रिटिश गेल्यावर हिंदुस्थानात इंग्रजीच्या वेडाने परमावधी गाठली आहे. आपल्याकडे उच्चभ्रू व धनिक, आपली मुले इंग्रजी संस्कारात बुचकाळून काढण्यासाठी वाटेल तेवढा आटापिटा करू लागले आहेत. भारतीय भाषेत भारतीय विद्यांचा अभ्यास करणारे लोक झपाट्याने कमी होऊ लागले आहेत.

जे स्वातंत्र्य आपण आग्रहाने, झगडून मिळवले त्याचा उपयोग मात्र आपण पुरेसा करून घेत नाही आहोत अशी स्थिती आहे. स्वतंत्र माणसे, स्वत:चे म्हणून तंत्र काय असावे याबाबतीच गोंधळून गेली आहेत आणि दुसऱ्यांच्या प्रभावात वाहून गेली आहेत, असे दिसते आहे.

गांधीजींच्या वळणातले अस्सल देशी काँग्रेस कार्यकर्ते निष्प्रभ होत गेले किंवा संपत चालले आहेत. टिळकांचा निखळ भारतीय पीळ, आचारविचारात असणारे फार थोडे उरले, अशी स्थिती आहे.

दुसरीकडे, आम्ही भारतीय आहोत म्हणजे कोण आहोत याचा निर्णय करताना, आपल्या परंपरेचा अर्थ लावताना, अपराधीपणाने व भोंगळपणाने विचार करण्याची पद्धत पडत चालली आहे. स्वामी विवेकानंदांइतक्या खणखणीतपणे आपला वारसा सांगणारे स्वाभिमानी भारतीय प्रतिगामी ठरवायची पद्धत पडली आहे.

जागतिक अर्थप्रवाहाच्या दबावाखाली न येता आपल्या देशाचा स्वार्थ सांभाळू शकणारे चतुर अर्थतज्ज्ञ, ताठ कण्याचे चाणाक्ष, राजनीतिज्ञ, दुनियेच्या तोडीसतोड उद्योग उभे करणारे उद्योजक या तिघांची साखळी उभी राहण्यात अडचणी  दिसत आहेत.

म्हणूनच पुढच्या शतकात भारत ताठ मानेने स्वतंत्रतेचा खरा उपयोग करीत पुढची पावले टाकताना दिसावा, अशासाठी स्वत: झगडण्याचा संकल्प करणे, हाच खरा सुवर्णमहोत्सव आहे.

••

**– प्रा. राम डिंबळे**
१९०/७, सदाशिव पेठ, मणोरे बंगला, शास्त्री मार्ग, पुणे ३०



## Jawan

The tall Strong Jawan
He is a Soldier
Fighting for his country
Is his pledger

He fights today
To save our tomorrow
And Makes sure
We have no sorrow

Dear Jawan
We Salute you
You lead and
We will follow

*क्षितिजे अभिनव गाठायाते पडते ज्यांचे पुढती पाऊल, असे बनू या निश्चय करुनी परिस्थितीची घेऊनि चाहूल।*



**प्रायोजक : अभ्यंकर क्लासेस, सांगली ७५९०३**


# 'गाझी' च्या विनाशाचे गुपित

**कमांडर उत्फुल्ल डबीर**

१९७१ चा डिसेंबर महिना होता. भारतीय नौदलाच्या 'गुलदर' या रणगाडेवाहू युद्धनौकेचा मी मुख्याधिकारी होतो. रणगाडे वाहून नेणं हे गुलदरचं मुख्य काम. युद्धकाळात समुद्रातील नेहमीच्या कामांपेक्षा फार मोठे काम तिच्या हातून घडेल याची तेव्हा कल्पनाही नव्हती.

'विक्रांत' ही भारताची विमानवाहू युद्धनौका त्यावेळी अंदमानजवळ युद्धासाठी सज्ज होऊन उभी होती. तिच्यावर विमानांचे सुटे भाग आणि प्राणवायूच्या बाटल्या पोहोचवणं हे आमचं एक महत्त्वाचं काम.

पश्चिम किनाऱ्यावर युद्ध होण्याची शक्यता असताना दूरवर एकांतात असलेल्या अंदमान बेटात 'विक्रांत' का बरं उभी होती? नव्याने भरती झालेल्या अनेक ज्युनिअर ऑफीसर्सच्या मनातही हे प्रश्नचिन्ह होतंच. नौदलाच्या पूर्व विभागाचे व्हाइस ॲडमिरल एन्. कृष्णन यांच्या बोलण्यात जेव्हाजेव्हा 'विक्रांत'चा उल्लेख येई, तेव्हा त्यांच्या डोळ्यात एक वेगळीच चमक दिसायची. 'विक्रांत'ने त्यांच्या कल्पनाशक्तीला खूपच चालना दिली होती. कधीकधी अधिकाऱ्यांची बैठक चालू असायची, कृष्णन् साहेब मध्येच उठून मद्रासमधील नौदलाच्या अधिकाऱ्याला फोन करायचे. विशाखा-पट्टणम्ला 'विक्रांत'ची दुरुस्ती पुरी होत आलीय असं काहीतरी त्यांच्या संभाषणात ऐकू यायचं. तर कधी विशाखापट्टणम्ला असताना 'मद्रास'ला असलेल्या (?) 'विक्रांत'वर ते संदेश पाठवायचे. नव्या आलेल्या तरूण अधिकाऱ्यांना त्यांना म्हातारचळ लागलंय असंच वाटायचं.





**प्रायोजक : मे. आर. डी. वीरकर आणि कं., वीट कारखानदार, सिंहगड रस्ता, पुणे.**

पण सत्य काय होतं?
पाकिस्तानची सर्वात मोठी पाणबुडी 'गाझी' युद्ध सुरू होण्यापूर्वीच बरेचसे पाणसुरुंग आणि टार्पेडो भरून कराचीहून निघाली होती. 'विक्रांत' हे तिचं लक्ष्य होतं. १९७१ चा नोव्हेंबर महिना उजाडला. 'विक्रांत' मद्रासच्या जवळपास असणार अशा अंदाजाने हल्ल्याला योग्य अशी जागा शोधत 'गाझी'चा प्रवास चालू होता. खरंतर 'विक्रांत' मुक्कामाला होती अंदमानजवळ! पण चुकीचे रेडिओसंदेश, मुद्दाम पसरवलेल्या अफवा, दूरध्वनीवरील फसवी संभाषणे या सगळ्यातून 'गाझी'ची दिशाभूल करण्यात आली. 'विक्रांत' विशाखापट्टणम येथे आहे, अशी चुकीची माहिती 'गाझी' पर्यंत पोहोचविण्यात आम्ही यशस्वी ठरलो. 'विक्रांत'चा माग काढत 'गाझी' विशाखापट्टणम्‌ला येणार हे तर नक्की. पण कधी? आम्ही डोळ्यात तेल घालून सावध होतो.

शत्रूच्या हद्दीतील किनाऱ्यावर असणे 'गाझी'च्या दृष्टीने मोठ्याच धोक्याचं होतं. विशाखापट्टणम् नजीकचा समुद्र खोल असला तरी तेवढी खोली पाणबुडीला पाण्याच्या आत मोकळेपणाने वापरण्यासाठी पुरेशी नव्हती. परंतु 'विक्रांत'चा बळी घेण्याचे ध्येय ठेवून 'गाझी'ने धोक्यात उडी घेतली. दिवसभर शांतपणे पाण्याखाली रहायचं आणि रात्री बॅटरीज् चार्ज करण्यासाठी पृष्ठभागावर यायचं. असे एकामागून एक दिवस चालले होते. 'विक्रांत' विशाखापट्टणम् केव्हा सोडते आणि आपल्या टार्पेडोचं लक्ष्य बनते याचीच 'गाझी'वरील पाकिस्तानी अधिकारी वाट पाहात होते.

'विक्रांत'सारख्या अवजड युद्धनौकेचा बंदरानजिकच्या समुद्रातील वेग ताशी सात ते आठ किलोमीटर इतका कमी असतो. हे गृहीत धरून 'गाझी' विशाखापट्टणम् बंदरातून युद्धनौकांच्या बाहेर पडण्याचा सागरी मार्गापासून सुमारे तीन हजार यार्ड अंतरावर सुरुंग आणि टार्पेडो सज्ज ठेवून होती.

गेले कित्येक दिवस आपल्या लक्ष्यावर नजर ठेवून असलेले 'गाझी'वरील मुख्य अधिकारी 'विक्रांत'वर मारा करण्यासाठी अधीर झाले होते. पहाटेची वेळ होती. धूसर उजेडात विशाखापट्टणम् बंदरातून सपाट पृष्ठभाग असलेली युद्धनौका बाहेर येत होती. 'गाझी'च्या प्रमुख अधिकाऱ्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. इतक्या दिवसांची तपश्चर्या फळाला आली तर ''ती पहा विक्रांत! सावधान, हल्ला करा!''

वातावरणातील शांतता एका क्षणात भंग पावली. एक क्षण गोंधळ झाला. जिला ते 'विक्रांत' समजत होते ती होती आमची 'गुलदर'. आमचा वेगही होता ताशी सुमारे ३० किलोमीटर म्हणजे अपेक्षेपेक्षा चौपट! त्यामुळे 'गाझी'ची परिस्थिती ऐन मोक्याच्यावेळी गोंधळाची झाली. अतिशय वेगाने समोरून येणाऱ्या युद्धनौकेचा वेध घेणे 'गाझी'च्या टार्पेडोला शक्य नव्हते. काय करावं? हल्ला करावा की टक्कर होऊ नये म्हणून सुरक्षेसाठी खोलवर जावे? 'जाताजाता एक-दोन टार्पेडोज उडवावेत-कदाचित् 'विक्रांत'ला नष्ट करण्याचं ध्येय सफल होईलही' अशा वेड्या आशेने प्रयत्न करण्यात काही सेकंद गेली. 'गाझी'ला त्याची किंमत द्यावीच लागली. बचावासाठी खाली सूर मारून वर पळण्याच्या आतच 'गाझी' समुद्राच्या तळावर आपटली. कारण समुद्र तसा उथळच होता.

समुद्राच्या तळाशी आपटताना 'गाझी'चा पुढचा भाग फुटला आणि पाणी अतिशय वेगाने पाणबुडीत शिरले. पाण्याच्या वेगवान माऱ्यामुळे 'गाझी'मध्ये असलेले पाणसुरुंग आणि टार्पेडो यांची यंत्रणा कार्यान्वित झाली. त्याचक्षणी 'गाझी'च्या आतल्या भागात स्फोट झाला. 'गाझी' मधील पाकिस्तानी नौदलाचे सर्वच्या सर्व अधिकारी व कर्मचारी तात्काळ ठार झाले.

सपाट पृष्ठभाग व तळ असलेली आमची 'गुलदर' अंदमान बेटातील 'कॉर्नविलास' बंदरात उभ्या असलेल्या 'विक्रांत'ला भेटायला मजेत लाटांवर डुलत निघाली होती. आपल्या तळाखालून एखादा टॉर्पेडो गेलाही असेल याची आम्हाला त्याक्षणी कल्पनाही नव्हती. एवढंच काय 'गाझी'च्या विनाशाचं पुण्य 'गुलदर' म्हणजे 'विक्रांत' अशा चुकीच्या समजामुळे आमच्या पदरी नकळत बांधले गेलं होतं!

●●

**– कमांडर उत्फुल्ल डबीर**
३/४८ माणिक हौसिंग सोसायटी,
सेनापती बापट रोड, पुणे १६.



**प्रायोजक : परांजपे पोल्ट्री फार्म, दुर्गामाता मंदिरामागे, सांगली.**

# मागोवा पंतप्रधानांच्या भाषणांचा!

**– संकलन – स्वाती ढेकणे, रवींद्र भोसले**

**स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या ५० वर्षात दरवर्षी १५ ऑगस्टला देशाच्या पंतप्रधानांचे भाषण आपण ऐकतो. दिल्लीला होणाऱ्या स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्याचे थेट प्रक्षेपणही आजकाल आपण दूरदर्शनवर पाहतो. पाहात असताना मनात अनेक विचारांचे तरंग उमटत असतात. देशाच्या पंतप्रधानांनी जनतेला उद्देशून केलेल्या भाषणांमधून देशाच्या विकासाच्या नियोजनाचे, युद्ध, अंतर्गत संघर्ष, नैसर्गिक आपत्ती यासारख्या घटनांचे पडसाद उमटत असतात. प्रतिकूल परिस्थितीत लोकांना धीर देणे किंवा प्रेरणा देण्याचे कार्य अशा मोठ्या व्यक्तींचे शब्द करत असतात. गेल्या ५० वर्षात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले. अशा काही महत्त्वाच्या वर्षातील पंतप्रधानांच्या भाषणाबद्दल तुम्हाला नक्कीच उत्सुकता असेल नाही? त्यासाठी त्यांच्या भाषणातील काही महत्त्वाचे उतारे सोबत देत आहोत.**



**१५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून पं. नेहरूंनी हिंदवासीयांना केलेले आवाहन अतिशय भावपूर्ण होते.**

आज जनतेचा पहिला सेवक म्हणून अधिकृतरित्या मी बोलत आहे. आज आपण स्वतंत्र व सार्वभौम झालो. गतकालाचे ओझे फेकून दिले. परसत्तेचे ओझे उतरले. पण स्वातंत्र्याबरोबर जबाबदाऱ्याही आल्या आहेत. स्वतंत्र, शिस्तबद्ध व स्वातंत्र्यरक्षणाचा निर्धार करणारी जनताच त्या जबाबदाऱ्या पार पाडू शकेल. दीर्घकालीन गुलामी व महायुद्धानंतरची परिस्थिती यामुळे संकटाचा व बिकट प्रसंगांचा वारसा आपणास मिळाला आहे. आज जनतेपाशी अन्न नाही; कपडे नाहीत, जगण्यास जरूरीच्या अशा इतर वस्तू नाहीत. महागाई व चढलेल्या किंमती यांनी लोकांना बेजार केले आहे. हे प्रश्न एकदम सोडविता यायचे नाहीत. पण ते तसेच लांबणीवरही टाकता यावयाचे नाहीत. देशाची संपत्ती वाढेल व ती जास्तीत जास्त लोकांना मिळेल अशा रितीने ही उभारणी केली पाहिजे.'' कालवे व पाटबंधारे बांधून वीजनिर्मिती करून त्याद्वारे शेतीचे उत्पन्न वाढविण्याच्या योजना लवकर पूर्ण करण्याचे प्रयत्न करू. यामुळे सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल.

या सर्वांसाठी शांततेचे व सहकार्याचे वातावरण पाहिजे, कठीण व सतत परिश्रम पाहिजेत. आपण भांडणे व संघर्ष विसरू या आणि ही मोठी कामे हाती घेऊया. भांडण्याची जशी वेळ असते तशीच सहकार्याने झटण्याचीहि वेळ असते. आजची वेळ भांडण्याची किंवा मौज करण्याची नाही. परस्परांशी सहकार्य करून काम करण्याची आहे. आज तुम्हा सर्वांना आम्ही देशसेवेसाठी आवाहन करीत आहोत.''

**१९५० साली भारत हे लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र झाले. देशाच्या विकासाचे नियोजन, विज्ञान, तंत्रज्ञान, शेती विकास इ. बाबतीत पुढच्या १० वर्षात देशाने खूप प्रगती केली. देशाला सुखी, समृद्ध राष्ट्र बनविण्याबरोबरच आंतरराष्ट्रीय राजकारणातही पं. नेहरूंच्या विचारांचा ठसा उमटलेला दिसतो.**

**१५ ऑगस्ट १९५७ रोजी देशाच्या स्वातंत्र्याला १० वर्षे पूर्ण झाली. त्यावेळी पंतप्रधान पं. नेहरू म्हणाले,**

''आज आपण आपल्या प्रवासाचा एक टप्पा ओलांडला आहे. आता दुसऱ्या टप्प्याला आपण सुरुवात करावयाची आहे. माझी अशी खात्री आहे की, आपण आपले ऐक्य कायम राखले तर जशी गुलामगिरी आम्ही नाहीशी केली तसेच दारिद्र्यही नाहीसे करू.''

''हिंदी व पाकमधील संबंध हजारो वर्षांचे जुने आहेत. पाकबरोबर आम्हास मैत्री व शांतता हवी आहे आणि आमचे संबंध अशा तऱ्हेने वाढले पाहिजे की त्यांना त्यांच्या स्वातंत्र्यात व आम्हाला आमच्या स्वातंत्र्यात समाधानाने राहता आले पाहिजे.''

**देश स्वतंत्र होऊन १३ वर्षे झाली तरी देशाचा एक भाग गोवा, पोर्तुगिजांच्या आधिपत्याखाली होता. १९६० साली गोवा मुक्तीसंग्रामाचे वारे वाहात असताना १५ ऑगस्ट १९६० साली पंतप्रधान पं. नेहरू म्हणाले,**

''गोवा मुक्ततेबाबत येथील सत्ताधाऱ्यांनाही संभ्रम नाही. प्रांत, धर्म,



**मंदार देवगावकर तर्फे प्रबोधकांना बलसंपन्न व आरोग्यपूर्ण वाटचालीसाठी शुभेच्छा!**

जात याहून देश मोठा असल्याने त्याचे रक्षण प्रथम केले पाहिजे. संघटितपणे कठीण असा संग्राम करून त्यागाच्या बळावर आपण राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळविले. परंतु ते मिळाल्यानंतर आपले कर्तव्य संपले असे तुम्ही मानले तर ती विचारसरणी चुकीची होय. हे स्वातंत्र्य टिकविण्यासाठी आपण सतत धडपड केली पाहिजे. त्यासाठी त्याग करण्यास सदैव तयार असले पाहिजे. तेव्हाच आपले हे स्वातंत्र्य सुरक्षित होईल. पूर्वी घेतलेल्या आणाभाकांचा पुनरुच्चार व स्मरण करून 'हाका' मारत असलेल्या भविष्यकाळाकडे आपणास नजर टाकावयाची आहे.''

ते पुढे म्हणाले, ''आमच्या मायदेशाचा, हिंदचा, गोवा हा एक भाग असून तो आमच्या मनात आणि हृदयात कायम बसलेला आहे. आमचा कमकुवतपणा म्हणून नव्हे तर धैर्य म्हणून आणि कोणताही प्रश्न लष्कराच्या बळावर सोडवायचा नाही; या आमच्या तत्त्वाशी आम्ही प्रामाणिक असल्याने, आम्ही गोव्याची मुक्तता करण्याचे कामी आमचा हात असा बाजूला ठेवला आहे. आमच्या पुढील तो प्रश्न आहे आणि तो आम्ही सोडवूच. जगाने असे पक्के समजावे की सध्या गोव्यावर ज्यांची सत्ता आहे तेथे आमची सत्ता लवकरच येईल. याविषयी कोणताही संभ्रम नाही. हिंद हा प्रश्न खात्रीने निकालात काढील आणि परक्या सत्तेच्या जुवाखालून गोवा मुक्त करण्यात येईल.''

**१९६२ च्या चीन आक्रमणाच्या काळात जनमानसात खोलवर रुजलेल्या राष्ट्रप्रेमाच्या उदात्त भावनेला वाचा फोडण्याचे सामर्थ्य पंतप्रधानांच्या त्यावेळच्या भाषणात होते.**


**१५ ऑगस्ट १९६२ रोजी सीमेवरही परकीय आक्रमणाचे संकट उभे असताना देशवासीयांना ऐक्याचे आवाहन करताना पंतप्रधान पं. नेहरू म्हणाले,** ''स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आपल्या देशाची सेवा आणि संरक्षणासाठी एकत्रित येण्याची प्रतिज्ञा आपण केली पाहिजे.

हिंदूंमधील अभेद्य ऐक्य निर्बल करणारी कृत्ये करणे म्हणजे विश्वासघात करणे होय, असे मी समजतो. जातीयवाद आपण नाहीसा केला पाहिजे. देशात राष्ट्रीय एकता निर्माण करण्याची व बदलत्या जगात स्वार्थरहित समाज निर्माण करण्याची गरज आहे. सरहद्दीवर अनेक अडचणी आपल्यासमोर उभ्या आहेत व त्यासाठी आपण तयार राहिले पाहिजे. कारण सरहद्दीपलीकडे आपणाकडे वाईट दृष्टीने पाहणारे लोक आहेत. त्यांना आपल्यावर हल्ले चढवायचे आहेत. या सर्व गोष्टींना मोठ्या गंभीर हृदयाने व सदैव जागृत राहून आपण 'एकराष्ट्र' म्हणून तोंड दिले पाहिजे. राष्ट्रीय एकात्मतेची अशी जागृती आपल्यात निर्माण झाली तर आपण कोणतेही आक्रमण थोपवू शकू आणि आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करू शकू.''

''आज आपल्या स्वातंत्र्याचा मंगल दिवस उजाडला आहे. याचदिवशी रक्षाबंधन आल्यामुळे ही मंगलता द्विगुणित झाली आहे. यादिवशी लोक राखी बांधतात. राखी राष्ट्रीयत्वाचे प्रतीक आहे. एकमेकाला मदत करावी, एकमेकांशी सहकार्य करावे आणि एकमेकांचे रक्षण करावे हीच गोष्ट राखी सांगते. स्वार्थासाठी आम्ही एकमेकांचा फायदा घेणार नाही व अशा सहकार्याने वागू की कोणीही आमचा देश हादरवू शकणार नाही. देश समृद्ध व्हावा व समाजात अशी समज नांदावी की तेथे उंच आणि सखल यामध्ये फार अंतर राहू नये. हा ध्येयवाद आपल्याला गाठावयाचा आहे. समाजसत्तावादी समाज आपल्याला निर्माण करावयाचा आहे. जेथे जातीला महत्त्व नसते. परंतु तो निर्माण करण्यासाठी आपल्याला अनेक अडचणी सोसाव्या लागतील.''

''आज आपण बदलत्या जगात राहात आहोत. रशियासारखा देश अंतरिक्ष प्रवासी पाठवत आहे. अमेरिकाही तसेच प्रयत्न करत आहे. ज्या जगात एवढ्या मोठ्या गोष्टी चालत आहेत तेथे आपण राहात आहोत! सर्व जग बदलत आहे. नव्या शक्ती निर्माण होत आहेत. या शक्तिंचा उपयोग आपल्याला नीट करून घेता आला नाही, बदलत्या जगात आपण पुढे सरकलो नाही व आपल्या सुधारणा करून घेतल्या नाहीत तर आपण मागे पडू. आपल्या देशाच्या रूपात एक जिवंत देश आपल्याला निर्माण करावयाचा आहे. जयहिंद!''

**चीन आक्रमणानंतर पं. नेहरूंचे निधन हा देशाला बसलेला मोठा धक्का होता. त्यानंतर १९६५ सालचे भारत–पाक युद्ध ही घटना देशाला हलवून टाकणारी घटना होती. १५ ऑगस्ट १९६५ रोजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी पाकिस्तान, चीनच्या धोरणाबद्दल अतिशय परखड शब्दात तीव्र निषेध व्यक्त केला.**





With Best Compliments from - **JAISONS ENGINEERING TECHONOLOGY, PUNE**

''सामर्थ्याला सामर्थ्यानेच तोंड दिले जाईल आणि देशात घुसणारा प्रत्येक आक्रमक शोधून काढून त्याची देशाबाहेर हकालपट्टी करण्यात येईल. पाकिस्तानचे आक्रमक वर्तन लक्षात घेता वाटाघाटी करण्यास वाव नाही.

काश्मीरमध्ये कटकटी निर्माण करण्याचा पाकिस्तानचा उद्देश आहे, असे दिसून येते. सध्या त्या ठिकाणी जे काही घडत आहे, हा काही दिवसांचा प्रश्न नाही. ते आज आक्रमक झालेत आणि उद्या ते परत निघूनही जातील अशातला प्रकार नाही. हे संकट चालू राहणारे आहे. पाक हा इभ्रतीचा प्रश्न करेल पण आम्हालाही राष्ट्रीय असा स्वत:चा अभिमान आहे. आम्हालाही आमच्या काही जबाबदाऱ्या पार पाडावयाच्या आहेत. काश्मीर प्रश्नावर वाटाघाटी करण्यास कोणतीही जागा नाही. आम्ही या गोष्टीचा विचार करू शकत नाही.

चीनविषयी बोलावयाचे झाल्यास तो असा एक देश आहे की, त्यास व्हिएतनाममध्ये अगर भारतात शांतता नको आहे. भारताला सतत अडचणींना तोंड द्यावे लागत राहावे, यात चीन स्वत:चे हित मानतो. त्यामुळे त्या देशाच्या (हिंदच्या) प्रगतीत व आर्थिक विकासात व्यत्यय येऊन अधोगति प्राप्त होईल, अशी त्याची विचारसरणी आहे. परंतु त्यांच्या दबावाखाली आम्ही कदापिही येणार नाही.''



**१९७१ साली बांगला देशातून निर्वासितांचे लोंढे भारतात येऊ लागले. पाकिस्तानच्या बांगला देशातील दडपशाहीच्या धोरणाविरुद्ध पंतप्रधान इंदिरा गांधींनी कणखर पवित्रा घेतला. १५ ऑगस्ट १९७१ च्या भाषणात त्यांनी अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी प्रकटपणे आव्हान स्वीकारले.**

''सर्वांना समान संधी देणारी समाजव्यवस्था स्थापन करण्याच्या वाटचालीतील हिंदच्या मार्गात कोणतेही अडथळे असले तरी ते दूर करण्यास सरकार मागे पुढे पाहणार नाही.''

''हिंदमधील निवडणुकांच्या सुमारास पाकिस्तानातही निवडणुका झाल्या होत्या. परंतु लोकमताच्या कौलाप्रमाणे वागण्याऐवजी तेथील लष्करी राजवटीने बांगला देशात दहशत व दडपशाहीचा कारभार सुरू केला. त्याचा परिणाम म्हणून आपले घरदार सोडून हिंदमध्ये ७५ लाख निर्वासित येऊन दाखल झाले आहेत. हिंदने त्यांना आपले दरवाजे बंद केलेले नाहीत. त्यांच्यामागे त्यांनी स्वातंत्र्यासाठी चालविलेला उदात्त लढा असून, आपले हक्क प्रस्थापित करण्यासाठी ते आपले जीवन अर्पण करीत आहेत.

पाक अध्यक्ष आम्हाला युद्धाच्या धमक्या देत आहेत. आम्हाला कोणाशी युद्ध करावयाचे नाही. आम्ही युद्धाच्या घोषणाही देत नाही. तसेच आम्हाला कोणत्याही धमक्यांची भीती वाटत नाही. आव्हाने मिळतील तेव्हा त्यांना आम्ही तोंड देऊ. आपण एकजुटीने राहिजे पाहिजे आणि देशाचे बळ वाढविले पाहिजे. बांगला देशातील लोकांवरील आपत्ती पाहून लोकशाही आणि स्वांतंत्र्यावर प्रेम करणाऱ्या लोकांना धक्का बसलेला आहे.''

**१९७० ते १९८० हे दशक देशाचे राजकारण, अर्थकारण, समाजकारण या सर्वच बाबतीत वादळी उलथापालथीचे होते.**

**१५ ऑगस्ट १९७३ च्या पंतप्रधान इंदिरा गांधींच्या भाषणात पुढे २ वर्षांनी आलेल्या आणीबाणीच्या परिस्थितीची चाहूल दिसते.**

''सरकार मन मानेल तसे वागू शकत नसते. लोकशाहीने लोकांना जसे हक्क दिले, तसेच अधिकार जबाबदाऱ्याही दिल्या आहेत. प्रत्येक नागरिक स्वत:वरील जबाबदारी उचलत नसेल, तर परिस्थिती सुधारणे अशक्य आहे. आपण जनतेचा आवाज उठवतो असे काहींना वाटते. पण आंदोलनात काही वेळा लुटालूट, हिंसाचार व कामात खोटी होते व सामान्य जनतेच्या हालअपेष्टाही वाढतात. इकडे लक्ष द्यायला हवे. कारणे काहीही असोत, पण गिरण्या व कारखाने बंद पडता उपयोगी नाहीत.

व्यक्तीच्या आयुष्यात जसे चढउतार येतात, तसेच देशाच्याही येतात. काही टंचाई आहे, किंमती वाढल्या आहेत, हे आम्ही लपवून ठेवणार नाही, उलट ही टंचाई का व कशी निर्माण झाली हे लोकांनी लक्षात घ्यावे. गेली दोन वर्षे मुख्यत: महारा, राजस्थान, गुजरात या राज्यात गेल्या पन्नास वर्षात नव्हता असा दुष्काळ पडला. त्यामुळे ज्वारी, बाजरी, भुईमुगाचे पीक कमी आहे आणि किंमती वाढल्या, हे आपणाकडे नव्हे तर आशिया-आफ्रिकेतील अनेक देशात टंचाई व भाववाढ झाली. टंचाई निवारणाची कामे, बांगला देशाचे निर्वासित व पाकिस्तानबरोबरचे युद्धामुळे खर्च झाला. सुगी चांगली झाली असती तर ताळमेळ बसला असता, पण सुगीही

चांगली न झाल्याने बिकट परिस्थिती निर्माण झाली.

मागण्या मान्य करून घ्यावयाचा संप हा एक मार्ग असला तरी देशाच्या मोठ्या हिताचे दृष्टीने व्यक्तिगत मागण्या बाजूला ठेवण्याचीही वेळ कधी कधी येते व भारताचे दृष्टीने आताची वेळ ही तशी आहे. अडचणींवर नुसतेच तक्रारखोर लोक हवेत की अडचणींवर धैर्याने मात करणारे हवेत हा प्रश्न आहे. या अवघड वेळी सर्व लहानथोर माणसांचे सहकार्य हवे आहे.

**आणीबाणीच्या या काळोख्या कालखंडानंतर निवडणुकांचे चौघडे वाजले. जुनी राजवट कोसळून जनता पक्षाचे सरकार आले. १५ ऑगस्ट १९७८ रोजी पंतप्रधान मोरारजी देसाई देशाला उद्देशून केलेल्या भाषणातून जनता पक्षाचे धोरण, तत्त्वे जनतेसमोर मांडताना म्हणाले,**

''कोणत्याही प्रकारचा असंतोष हा



शिस्तीशिवाय दूर होऊ शकत नाही. म. गांधींनी शिकविल्याप्रमाणे शिस्तीवर, साधनांच्या विशुद्धतेवर माझा पूर्ण विश्वास आहे. या दोन बाबतीत मी कोणाशीही तडजोड करणार नाही. कारण त्यांच्या बळावरच देश बलवान होऊ शकतो. जनता पक्षाला समर्थपणे काम करण्यासाठी लोकांच्या सहकार्याची, मदतीची व आशीर्वादाची गरज आहे.''

**त्यानंतर झालेल्या निवडणुकात पुन: जनतेने काँग्रेस पक्षाला कौल दिला व श्रीमती इंदिरा गांधी पुन्हा एकदा पंतप्रधान पदावर आल्या. १५ ऑगस्ट १९८० साली केलेल्या भाषणात त्या म्हणाल्या,**

''धर्मांधता, भ्रष्टाचार, जातीयवाद आणि बेशिस्त यांचे राष्ट्रीय जीवनातून उच्चाटन करण्याचा सरकारने निर्धार केला आहे. दंगेधोपे, अराजक आणि बेशिस्त यांच्यात सर्वत्र होणारी वाढ वेळीच मोडून काढली नाही तर राष्ट्रशक्तीचा कुणालाच लाभ होणार नाही. त्यागातून उभे राहिलेले शिस्तीचे वातावरण नष्ट होत चालले आहे. आपल्याला ती किंमत मोजून अराजकाला आळा घातला पाहिजे. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक अशा सर्व प्रकारच्या जीवनात बेशिस्त पसरली आहे आणि जनतेच्या सहकार्यानेच तिचे उच्चाटन शक्य होईल. भ्रष्टाचाराचे निर्मूलन झाल्याशिवाय आपली धोरणे यशस्वी होणार नाहीत.''

**श्रीमती इंदिरा गांधींच्या हत्येनंतर श्री. राजीव गांधी पंतप्रधान पदावर आले. १९८८ साली १५ ऑगस्टच्या स्वातंत्र्यदिनाच्या सोहळयातील भाषणात पाकिस्तान सरकारला अप्रत्यक्षपणे इशारा देताना ते म्हणाले–**

''पंजाबमधील अतिरेक्यांना मदत



करायचे ताबडतोब थांबवा आणि भारतावर प्रत्युतर देण्याची वेळ आणू नका. अन्यथा पश्चाताप करण्याची पाळी येईल. मात्र त्यांच्यावर तशी वेळ यावी अशी कारवाई करण्याची आमची इच्छा नाही.''

''स्थानिक पातळीवर संस्था बळकट व्हाव्यात आणि सत्तेचे विकेंद्रिकरण व्हावे. लोकांना स्वत:चे भले करण्यासाठी अधिकार वापरता यावेत अशी सरकारची भूमिका आहे. लोकांसाठी केलेल्या योजनांचा फायदा त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही अशा अनेकदा तक्रारी झाल्या आहेत. त्यावर विकेंद्रीकरण हाच उपाय आहे. 'स्वराज्य म्हणजे स्वयंशासन' या महात्मा गांधीच्या तत्त्वज्ञानाला धरून ही कल्पना आहे.''

**१९९० साली पंतप्रधानपदाची धुरा सांभाळत असताना श्री. व्ही. पी. सिंग यांनी तरुणांच्या सामर्थ्यावरील आपला विश्वास व्यक्त केला. तसेच कायदा, न्याय, सामाजिक ऐक्य यांच्याबद्दल असलेली निष्ठा व्यक्त करताना ते म्हणाले,**

''सरहद्दीपलीकडून होत असलेल्या



देशविरोधी कारवायांच्या 'चक्रात' सापडू नये, यासाठी सर्वांनीच आणि विशेषत: तरुणांनी अतिशय सावध राहणे जरूरीचे आहे. हा सारा देश अखेर त्यांचा आहे आणि त्याची प्रगती व भरभराट


त्यांच्यावरच निर्भर आहे. फाळणीनंतर काश्मीरमधील जी मंडळी पाकिस्तानात गेली, ती अद्यापही तेथे निर्वासित (मुहाजिर) म्हणूनच ओळखली जातात. हे येथील युवकांनी विसरू नये.''

''देशाचे ऐक्य व अखंडता टिकविण्याबाबत मात्र कोणतीही तडजोड केली जाणार नाही. ज्या मंडळींना शांतता आणि प्रेम हवे आहे, त्यांना ते दिले जाईल आणि ज्यांचा बंदुकीच्या सामर्थ्यावरच विश्वास आहे, त्यांनाही आमच्याकडून समजेल अशाच भाषेत उत्तर मिळेल. देशाचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. येथील ८० कोटी जनता एक दिलाने उभी राहिली तर या देशाच्या सरहद्दीचा भंग करण्याची हिंमत कोणीही दाखवू शकणार नाही.''

''रामजन्मभूमी-बाबरी मशिद हा वाद परस्परसामंजस्याने सुटावा, या दृष्टीने आमचे प्रयत्न सुरु आहेत. त्यास अद्याप पावेतो फारसे यश आलेले नसले तरी चर्चेच्या मार्गानेच या प्रश्नी तोडगा निघेल अशी आम्हाला आशा आहे. अर्थात अखेर या प्रश्नी न्यायालयाचा जो निकाल राहील, तोच आम्ही बंधनकारक मानू हे निश्चितच.''

''संसद व राज्याच्या विधिमंडळातील चाळीस टक्के जागा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी राखून ठेवण्याच्या प्रश्नावर राष्ट्रीय चर्चा व्हावी. देशाच्या कारभारात दुर्बल घटकांना अधिक महत्त्वाचे स्थान मिळावे, यासाठी सध्याच्या राज्यव्यवस्थेत काही बदल घडवून आणणे अपरिहार्य आहे, या कामात तरुणांनी विशेष पुढाकार घ्यावा.''

**१९९१ ते १९९६ ही पंतप्रधान श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांची कारकीर्द भ्रष्टाचारांची अनेक प्रकरणे उघडकीला आल्याने गाजली. १५ ऑगस्ट १९९४ च्या भाषणात पाकव्याप्त काश्मीर परत मिळविण्याचे**



**काम अपूर्ण असल्याचे सांगून त्यांनी काश्मीरमधील अतिरेक्यांना मदत आणि चिथावणी देण्याचे धोरण पाकिस्तानने त्वरित थांबवावे असा इशारा दिला.**

''काश्मीर हे भारताचे अविभाज्य अंग आहे आणि यापुढेही ते तसेच राहील. काश्मीरला भारतापासून अलग करण्याचे प्रयत्न निरर्थक ठरतील हे पाकिस्तानने लक्षात घेतले पाहिजे. काश्मीरमध्ये मानवी हक्काची पायमल्ली होत असल्याची ओरड आंतरराष्ट्रीय पातळीवर संधी मिळेल तेव्हा तेथे करीत राहाणे व संघर्षाचा मार्ग अवलंबिणे निरर्थक आहे, हेही त्यांनी लक्षात घ्यावे. पाकव्याप्त काश्मीर परत मिळविण्याचे आमचे काम अपुरे राहिले आहे, हे विसरू नये. काश्मीरमध्ये विकासाच्या कामांना सुरुवात झाली आहे. प्रशासन त्यासाठी वेगाने कामाला लागले आह. मानवी हक्कांची पायमल्ली कोण करीत आहे हे आंतरराष्ट्रीय समुदायाने लक्षात घ्यावे.''

**१९९६ साली पंतप्रधानपदावरून बोलताना श्री. एच. डी. देवेगौडा यांनी देशासमोरील अनेक प्रश्नांचा उल्लेख केला. भ्रष्टाचारनिर्मूलनाचा निर्धार,**



**तळागाळांतील गरीब जनतेपर्यंत सुविधा पोचविण्याची तळमळ त्यांच्या भाषणातून व्यक्त झाली. उत्तरखंडाच्या मागणीला पाठिंबा देताना ते म्हणाले,**

''दीर्घकाळ प्रलंबित असलेली उत्तरखंड राज्याची मागणी मान्य करण्यात येईल. या संबंधीचे एक विधेयक लवकरच संसदेत सादर करण्यात येईल. उत्तर प्रदेशात पुढील महिन्यात विधानसभा निवडणूक होत असून, त्यानंतर लगेचच या प्रक्रियेला सुरुवात होईल. या निर्णयामुळे उत्तरखंड भागातील नागरिकांच्या आशा पूर्ण होतील असा आपल्याला विश्वास वाटतो.''

**गेल्या ५० वर्षातील पंतप्रधानांच्या काही भाषणातील विचारांची झलक आपल्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातून नकळतच देशाचा इतिहास, समस्या, तत्कालिन प्रश्न आपल्यासमोर येतात. बदलत्या देशस्थितीचे धावते चित्र डोळ्यासमोर यावे, देशप्रश्नांचे भान मनात जागे व्हावे; पंतप्रधानांच्या व्यक्तिमत्त्वाचा नकळत ओझरता परिचय व्हावा आणि गेल्या ५० वर्षांचा इतिहास मुळातून अभ्यासण्याची प्रेरणा मिळावी एवढीच अपेक्षा!**

●●



प्रायोजक : कौशिक एंटरप्रायझेस, पुणे ३८.

# कविता पानोपानी

## आमुचे जन गण मन गाणे

भारतवासी आम्ही आमुचे जन गण मन गाणे
हिंदू, मुस्लीम, शीख नांदती येथे एकीने ।।धृ।।

घराघराचे दीप वेगळे एकच तेल तरी
वात वातीने पेटून सारे उजळे वरचे वरी
हात हाताशी घेऊन अवघ्या मातीचे जगणे ।।१।।

एकजुटीचा सहकाराचा आम्ही घेतला वसा
एक वाहते रक्त आमुचे जरी वेगळ्या नसा
नसे वेगळे जात - पात वा धर्माचे नाणे ।।२।।

कुराण आमुचे, आमुची गीता, आमुचे ख्रिस्त पुराण
ग्रंथामधुनी साऱ्या विलसे एकच तत्त्वज्ञान
एकच ईश्वर आम्ही सांगतो अनेक भाषेने ।।३।।

कर्नाटक, पंजाब, सिंध वा गोवा, राजस्थान
महाराष्ट्र, दक्षिण असो की उत्तर हिंदुस्थान
जिकडे तिकडे दिसती एका सूर्याची किरणे ।।४।।

टिपू येथला, इथला बाजी, छत्रपती शिवराय
या भूमीवर रुजत राहिले पराक्रमाचे पाय
एकोप्याने इथे जाहले आभाळही ठेंगणे ।।५।।

अखंडता, राष्ट्रीय एकता आमुचे ब्रीद, आणि
ह्रदयावरती आम्ही कोरली समता सर्वांनी
बाणा आमुचा सर्वधर्मसमभावाला जागणे ।।६।।

**- कल्याण इनामदार**



## एकतेचा मंत्र

तीन सागर एक होती, दक्षिणेला सर्वदा ।
एकतेचा मंत्र अमुच्या अंतरी घुमतो सदा।।धृ।।

पाच बोटे एक होता, वज्रमुष्ठी बनविती ।
पाऊले एकापुढे नित, राजमार्गी चालती ।
दोन बाहू वाढवीती, व्यक्तिची बलसंपदा ।।१।।

सर्व जाती अन् जमाती, राष्ट्रकार्यी लावणे ।
धर्म पंथा 'भारतीय' ही, अस्मिता नित सांगणे।
एक कोणी शक्य नाही, दूर करणे आपदा ।।२।।

स्पंदने ह्रदयांतरीची, एकमेका उमगती ।
वेदकाला पासुनीया, ऋषिमुनी नित सांगती ।
गौरवाने सर्व मिळुनी, पूजिणे श्री मोक्षदा ।।३।।

**- रवीन्द्र भट**

## गाऊ या गाणे देशाचे

आनंदाने, एक दिलाने गीत गाऊ या देशाचे
आपुल्या भारत मातेचे ।

निळ्या उंच या सागरलाटा उसळति चरणांसी
हिमालयाची शिखरे करिति राखण पाठीशी
खळखळ खळखळ वाहे पाणी पवित्र गंगेचे
गाऊ या गाणे देशाचे

येतो वारा सांगत गोष्टी-वीरकथा गाई -
'सुजला, सुफला' झाली भूमी - मोठी नवलाई,
शूर झुंजले किती धुरंधर, ध्वजा तिरंगी नाचे
गाऊ या गाणे देशाचे

देश कुणाचा? हा प्रिय अमुचा - थोर समर्थांचा
किती हुतात्मे झाले, लढले; जय स्वातंत्र्याचा!
सीमेवरि जे जवान झुंजती, तया न विसरायाचे,
गाऊ या गाणे देशाचे!

हातामध्ये हात घेऊनी - पुढती जायाचे,
झेंडा मिरवित, मायभूमिचे सुपुत्र व्हायाचे;
या रे सारे मिळून गाऊ -गान गौरवाचे,
गाऊ या देशाचे
आपुल्या भारतमातेचे!



**प्रायोजक : मे. ओम. कन्स्ट्रक्शन, प्रोपा. माणिकराम हळबे, पुणे ४११९३०**

# स्वांतत्र्य संग्रामातील मंतरलेले दिवस


– ग. प्र. प्रधान

*देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी म. गांधींनी सरू केलेल्या जन आंदोलनात, देशव्यापी स्वातंत्र्य संग्रामात अनेक ध्येयधुंद तरुणांनी उडी घेतली. प्रा. ग.प्र. प्रधान हे अशा स्वातंत्र्यसैनिकांपैकी एक. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात त्यांचा सहभाग होताच. परंतु त्यानंतरही प्रथम समाजवादी पक्ष व नंतर जनता पक्षाचे कार्य करीत असताना एक सजग, सजाण, सक्रिय नागरीत ही भूमिका ते आजतागायत निष्ठेने करीत आले आहेत.*

*१९७५ साली आणीबाणीच्या काळात १६ महिन्यांचा कारावास त्यांना सोसावा लागला. एकूण १८ वर्षे स्वच्छ चारित्र्याचा आमदार म्हणून विधानपरिषदेत त्यांनी कार्य केले. म.सा.प., साधना साप्ताहिक, ग्रंथालय चळवळ यांच्या निमित्ताने साहित्यिक चहवळीतील त्यांचा सहभागही तितकाच मोलाचा! 'हाजीपीर, साता उत्तराची कहाणी, स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत' यासारख्या अनेक मौलिक पुस्तकांचे लेखनही त्यांनी केले. त्यांना पुरस्कारही मिळाले. तर एकीकडे १९८४ पासून 'साधना'ची धुराही संपादक म्हणून समर्थपणे पेलली. विविध क्षेत्रात चाललेल्या या धडपडींबरोबरच ऋषितुल्य प्रधान सरांचं इंग्रजीचं अध्यापनही सातत्यानं चालूच होतं.*

*आजही मा. आण्णा हजारे यांच्या खांद्याला खांदा भिडवून भ्रष्टाचार निर्मूलन मोहिमेत सहभागी असणाऱ्या प्रधानसरांचा उत्साह खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्यप्रेमी योद्ध्यालाच शोभणारा!*

*विद्यार्थीदशेत स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याची प्रेरणा कशी मिळाली हे वाचूया प्रा. ग. प्र. प्रधान यांच्याच शब्दात!*



– ग. प्र. प्रधान

हायस्कूलमध्ये शिकत असताना मी खूप वाचीत असे. माझ्या या छंदामुळे पं. नेहरूंचे आत्मचरित्र मी वाचले आणि मी विलक्षण प्रभावित झालो. स्वातंत्र्य चळवळीबद्दल माझ्या मनात ओढ निर्माण झाली. पुढे १९३६ साली पं. नेहरू पुण्यात आले असताना मी त्यांचे भाषण ऐकावयास गेलो आणि त्या भाषणात त्यांनी 'स्वातंत्र्य लढ्यात तरुणांनी आले पाहिजे' हे जे आवाहन केले त्याचा माझ्या मनावर फार मोठा परिणाम झाला. १९३८ साली सुभाषचंद्र बोस हे काँग्रेसचे अध्यक्ष असताना पुण्यात आले होते. त्यावेळी त्यांचे भाषण ऐकताना मी भारावून गेलो. पुढे कॉलेजमध्ये गेल्यावर मधू लिमये, नाथ पै या समन्वयस्क मित्रांबरोबर मी समाजवादी पक्षातर्फे चालणाऱ्या राजकीय अभ्यासवर्गाला जाऊ लागलो. या अभ्यासवर्गात एस. एम. जोशी, ना.ग.गोरे, अच्युतराव पटवर्धन आदींची भाषणे ऐकण्याची संधी मला मिळाली. या भाषणांमधून ब्रिटिश साम्राज्य भारताचे आर्थिक शोषण प्रचंड प्रमाणावर करीत असल्यामुळे, आपला देश गरीब झाला आहे, हे जसे आम्हाला सांगण्यात आले; त्याचप्रमाणे पारतंत्र्य नष्ट करण्यासाठी स्वातंत्र्य चळवळीत सर्वस्व दिले पाहिजे हा संस्कारही आमच्या मनावर झाला.

१९४० साली साने गुरुजी पुण्यात आले असताना मित्रांसमवत मी त्यांच्याबरोबर फर्गसन कॉलेजच्या मागच्या टेकडीवर फिरायला गेलो होतो. आम्ही जेव्हा ना. गोखले यांच्या स्मारकाजवळ आलो तेव्हा साने गुरुजी म्हणाले, 'आपण येथे बसूया.' साने गुरुजींनी आम्हाला ना.गोखले यांचे असामान्य जीवन, त्यांची उज्ज्वल देशभक्ती याची माहिती अत्यंत स्फूर्तिदायी शब्दात दिली. भाषणाच्या शेवटी साने गुरुजी म्हणाले, ''या ठिकाणी ना. गोखल्यांच्या स्मृतीला साक्ष ठेवून तुम्ही तरुणांनी देशसेवेची शपथ घेतली पाहिजे.'' साने गुरुजींचे ते शब्द माझ्या मनाला जाऊन भिडले.

पुढे १९४१ साली मी राष्ट्र सेवादलात जाऊ लागलो. १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरु झाले होते. स्वातंत्र्य चळवळ समीप येत आहे; हे जाणवत होते. सेवादलातील आम्ही तरुण मित्रांनी स्वातंत्र्य लढ्यात सामील




**चि. हृषीकेश कुलकर्णीकडून प्रबोधकांना शुभेच्छा!**

होण्याची शपथ २६ जानेवारी १९४२ ला घेतली. यावेळी शिरुभाऊ लिमये यांनी मला भगतसिंग व अन्य क्रांतिकारकांच्या जीवनाची व त्यागाची वर्णने ज्या पुस्तकामध्ये होती ती पुस्तके वाचावयास दिली. स्वा. सावरकरांचे 'माझी जन्मठेप' हे पुस्तकही मी वाचले. तरुण वयात क्रांतिबद्दल आकर्षण असतेच. त्याप्रमाणे आगामी स्वातंत्र्य लढा सशस्त्र व्हावा असेही मनाला वाटू लागले.

याच वेळी जयप्रकाश नारायण यांनी तुरुंगातून आपल्या समाजवादी मित्रांना गुप्त रीतीने पाठविलेले पत्रक मला वाचावयास मिळाले. या पत्रकात आगामी स्वातंत्र्य लढ्यात आपल्याला भूमिगत चळवळ कशी चालवावी लागेल याचा तपशील होता. ब्रिटिश सरकार खिळखिळे करण्यासाठी साबोटेजिंगचा कार्यक्रम जयप्रकाशजींनी सुचवला होता. या संदर्भात पुण्याला १९४२ च्या जून महिन्यात एक गुप्त शिबिर झाले. त्या शिबिरासही मी हजर होतो. शिरूभाऊ लिमये यांनी चळवळीमध्ये प्रचार करणारा विभाग, मोर्चे काढणारा विभाग आणि भूमिगत राहून साबोटेजिंग करणारा विभाग अशी आखणी केली. शिबिराला मुंबईचे युसुफ मेहेरअल्ली हे समाजवादी पुढारी आले होते.

१९४२ च्या जानेवारी पासून म. गांधींनी देशातील राजकीय वातावरण तापविण्यास सुरुवात केली. ब्रिटिशांनी हिंदुस्थान सोडून चालते व्हावे, (क्विट इंडिया) असे 'हरिजन' या त्यांच्या साप्ताहिकातून त्यांनी लिहिले. गांधीजींच्या या निर्भय भूमिकेमुळे आम्हा तरुणामध्ये एकदम चैतन्याचे वातावरण निर्माण झाले. पं. नेहरूंनी असे जाहीर केले की, भारताचा हिटलरला, त्याच्या हुकूमशाहीलाच पाठिंबा आहे. परंतु भारतावर राज्य करणाऱ्या इंग्लंडला आम्ही लोकशाहीवादी मानीत नाही. स्वातंत्र्यासाठी ब्रिटिश साम्राजाबरोबर संघर्ष करणे हाच आमच्यापुढील एकमेव मार्ग आहे. मं. गांधींनी 'स्वतंत्र भारतच परचक्रापासून स्वत:चे रक्षण करू शकेल आणि म्हणूनच युद्धकाळातच आम्हाला स्वातंत्र्य पाहिजे,' असे जाहीरपणे ब्रिटिश राज्यकर्त्यांना सुनावले.

७ आणि ८ ऑगस्टला अखिल भारतीय काँग्रेसची बैठक झाली. आम्ही मित्रही या बैठकीला हजर होतो. अनेक तरुणांनी समर्पण भावनेने या लढ्यात सहभागी व्हायचे ठरविले. या बैठकीला पं. नेहरू, म. गांधी, मौलाना आझाद आदींची भाषणे झाली. 'करेंगे या मरेंगे' असा संदेश गांधीजींनी देशाला दिला.





प्रायोजक: स्वस्तिक बिल्डर्स (अनिल लोढा, राजेंद्र गोठी) मखमलाबाद नाक्याजवळ, नाशिक (५१३५६०)

त्याच दिवशी रात्री म. गांधी, पं. नेहरू यांना अटक झाल्याचे ९ ऑगस्टला सकाळी आम्हाला कळले. त्यांच्या अटकेमुळे तरुणांनी अनेक ठिकाणी मोर्चे, मिरवणुका काढल्या. आमच्यावर लाठीहल्ले झाले. पण सरकार उलथून टाकायच्या धुंदीत आम्ही सगळे होतो. ९ ऑगस्टला अरुणा असफअल्लींनी गवालिया टँक मैदानावर तिरंगा फडकावला. ही घटना आम्ही पाहिली. एका महिलेने प्राणाची पर्वा न करता असे धैर्य करणे कौतुकाचेच होते. अशा देशभक्तांच्या उदात्त, उज्ज्वल धैर्यानेच मी खऱ्या अर्थाने चळवळीकडे ओढला गेलो.

आजचे विद्यार्थीही त्यावेळी असते तर तेही असेच स्वातंत्र्य चळवळीकडे ओढले गेले असते. ते वातावरणच असे प्रेरणादायी होते की, तरुण मुले भारावून जात. त्यामुळे आजच्या पिढीविषयीही मला खात्री आहे. कारण मातृभूमीशी आपलं नातंच तसं असतं; ते संस्कृत वचन आहे ना,

'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरियसी!'

**स्वातंत्र्य चळवळीच्या मंतरलेल्या दिवसात जगणं हे परम भाग्य होतं आणि त्यावेळी तरुण असून चळवळीत स्वत:ला झोकून देणं हे तर स्वर्गसुख होतं.** शिरुभाऊ लिमयेंनी ६ डिस्ट्रक्शन स्क्वाडची स्थापना केली. त्यांना बॉम्ब करण्यासाठी शूर लोकांची गरज होती. यावेळी जनसंपर्क शाखेमध्ये मला काम देण्यात आले. गुप्त पुस्तके (बुलेटिन) लिहिणे, छापणे, वाहाणे असे काम मी त्यावेळी केले. तसेच विद्यार्थ्यांच्या छोट्या बैठकाही मी घेत होतो. त्यावेळी एका वेळेला दहा पंधरा विद्यार्थ्यांचीच बैठक घेता येत असे, कारण या गुप्त बैठकी असत. या बैठकींमध्ये साने गुरुजी अर्धा तासच बोलत. त्यांच्या वाणीला विलक्षण धार होती. या भाषणांमधून प्रेरणा घेऊन विद्यार्थी तिथल्या तिथे चळवळीत सामील व्हायला तयार होत.

याच सुमारास देशभर सर्वत्र मोठ्या प्रमाणात धरपकड सुरू झाली. पुण्यातही मिरवणुका काढण्यात आल्या. काँग्रेस हाऊसजवळ नारायण दाभाडेची गोळी मारून हत्या करण्यात आली. स. प. महाविद्यालयाजवळ लाठी हल्ला करण्यात आला. पण तरीही कोणी मागे हटले नाही. देशभर भूमिगत चळवळीचे जाळे विणले गेले होते. भूमिगत चळवळ म्हणजे लोक वेश पालटून राहात. एस.एम. जोशी दाढी वाढवून इमामअली नावाने राहात, तर शिरुभाऊंना आम्ही दादा मराठे नावाने ओळखत होतो. याचवेळी उषा मेहतांनी गुप्त रेडिओ सुरू केला. या रेडिओवरून देशभक्तीपर भाषणे, गाणी सादर केली जात. तसेच सर्वत्र मोर्चे घेऊन सरकारी कचेऱ्या ताब्यात घेण्याचा प्रयत्नही अनेकांनी केला. अशाच एका प्रसंगी महाडला गोळीबारात माझा मित्र वसंत दाते हा मारला गेला. त्यावेळी अभिमानही वाटला आणि चांगला मित्र गमावल्याचे दु:खही झाले.

मोठे जनआंदोलन उभारले गेले. सरकार खिळखिळे करण्यासाठी भूमिगत चळवळीने मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरू केले. परंतु कुठल्याही संस्थेच्या कार्याचा जोश जसा सहा महिनेच टिकतो तसा निदर्शनात्मक चळवळीचा जोरही कमी झाला. पण त्याचवेळी भूमिगत चळवळ आणखी संघटित झाली. याच सुमारास जयप्रकाश तुरुंगातून पळून बाहेर आहे. त्यामुळे चळवळीत चैतन्य आले. त्यांनी 'आझाद दस्ते' स्थापन केले. तसेच ब्रिटिश सरकारच्या विरोधात प्रतिसरकार स्थापन करण्याची गरजही त्यांना वाटू लागली. त्यानुसार सातारा व सांगली येथे नाना पाटील यांनी प्रतिसरकार स्थापन केले. या सरकारने दरोडे घालणाऱ्यांना शिक्षा केली. शेतकऱ्यांना फसवून त्यांच्या जमिनी लुबाडणाऱ्यांना सावकारांनी शिक्षा केल्या. शेतकऱ्यांना नाना पाटलांनी असा आत्मविश्वास दिला, की आता तुम्ही तिरंग्याच्या छपराखाली आहात. निर्धास्त मनाने शेती करा.

याचवेळी मला अटक झाली. पकडल्यावर माझी रवानगी येरवडा तुरुंगात करण्यात आली, तुरुंगात अनेक मित्र भेटले. आमच्यावर निर्बंधही फारसे नव्हते. कारण तुरुंगात इतकी गर्दी होती की आम्हाला आटोक्यात कसे आणावे असाच प्रश्न तुरुंगाधिकाऱ्यांना पडला होता. मात्र तुरुंगातील चौघे स्वातंत्र्यसैनिक पळून गेले तेव्हा अधिकारी संतापले. रोज हजेरी होत असे. त्यामुळे राजबंदी पळून गेल्याचे कळल्यावर चौकशी झाली. जेल अधिकारी चिडले व त्यांनी जेलमध्ये लाठीहल्ला केला. त्यावेळी काकासाहेब गाडगीळ सर्वांच्या पुढे जाऊन उभे राहिले व तुरुंगात असा हल्ला करता येणार नाही असे त्यांनी जेलरला सांगितले. त्यावेळी चिडून एका अधिकाऱ्यांने त्यांना लाठी मारली. ते रक्तबंबाळ झाले. परंतु त्यामुळेच आम्ही सर्वजण धैर्याने वागलो. तुरुंगातही मला खूप भाषणे ऐकायला मिळाली. मला वाचनाची आवड असल्यामुळे वाचनही खूप झाले. त्यामुळे जेलमध्ये माझे विचार

अधिक स्पष्ट झाले. जेलमध्येच आम्हाला बातमी समजली की कोतवालांनी ठाण्यात प्रतिसरकार स्थापन केले. पण ब्रिटिशांनी त्यांना वेढा घातला; आणि त्यावेळी समोरासमोर झालेल्या हल्ल्यात कोतवाल मारले गेले.

**अशा अनेक ज्ञात, अज्ञात देशभक्तांनी देशासाठी प्राणार्पण केले. ब्रिटिश सत्तेविरुद्ध चालू झालेल्या या जन आंदोलनापुढे अखेर ब्रिटिश सत्तेला नमाव लागलं आणि १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला.**

देश स्वतंत्र होणं म्हणजे केवळ येथून इंग्रजांची सत्ता जाणं असा संकुचित अर्थ आमच्या मनात नव्हता. येथे न्यायाचं व समतेचं राज्य असावं असे स्वप्न आम्ही पाहिले होते. मात्र स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी देशाचं जे चित्र रंगवलं होतं त्यापैकी काही स्वप्नांच्या आज ठिकऱ्या झालेल्या दिसतात. त्याची सुरवातच मुळी स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळी झालेल्या फाळणीने झाली. त्यामुळे त्याक्षणीही पहिल्या स्वातंत्र्यदिनी माझ्या एका डोळ्यात हासू आणि एका डोळ्यात आसू होते.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशाच्या विकासाचे दोन मार्ग समोर होते. एक म्हणजे म. गांधीची ग्राम स्वराज्याची संकल्पना. ती विकेंद्रीकरणाच्या तत्त्वावर उभी होती. तर पं. नेहरूंनी अवलंबिलेला मार्ग त्यापासून पूर्णत: वेगळा होता. परंतु त्यांचा विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन मला खूप मोलाचा वाटतो. भाभा अणुसंशोधन केंद्रासारखी संशोधन केंद्रे म्हणजे नवी तीर्थक्षेत्रे होत. आय.आय.टी सारख्या संस्थेतून दिले जाणारे मौलिक शिक्षण ही पं. नेहरूंनी दिलेली फार मोठी मोलाची देणगी आहे. विद्यार्थ्यांना आधुनिक तांत्रिक शिक्षण मिळावं हा आधुनिक विचार पं. नेहरूंनी रुजवला. स्वातंत्र्यापूर्वी सामान्य विद्यार्थी हा स्वाभिमानशून्य, झापडे लावलेला होता. केवळ कारकून होणं अन्यथा शिक्षक होणं एवढेच ध्येय असायचे. संशोधन, साहस, बुद्धीचा चौफेर आविष्कार करायला संधीच उपलब्ध नव्हत्या. आज शिक्षणामुळं तरुणांच्या कर्तृत्वाचा एक नवीन आविष्कार होत आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या पहिल्या १० वर्षातच देश अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण झाला. संरक्षणाची मोठी यंत्रणा उभी राहिली. 'जवान आणि किसान' यांना प्रतिष्ठा मिळाली. जवानांनी देशाचे रक्षण केले, तर किसानांनी अन्न पुरवून देशातील जनतेचे रक्षण केले. त्यामुळे 'जय जवान जय किसान' हे त्यांना अभिवादन अगदी योग्य आहे. नवनवीन धरणे झाली. या जमेच्या बाजू!

पण त्याचबरोबर हळूहळू अर्थसत्ता, राज्यसत्ता याचे केंद्रीकरण होत गेले. जुलूम, भ्रष्टाचार, वाढत गेला. त्याचेच पर्यावसन म्हणजे १९७५ ची आणीबाणी. राजकीय पक्षांनी जनतेची निराशा केली. नोकर शाहीत भ्रष्टाचाराचा कळस झाला. पण सर्व परिस्थिती पूर्णत: निराशाजनक आहे असं नाही. त्यावरही उत्तरं शोधता येतील. सत्ता व अर्थकारणाचं विकेंद्रीकरण व्हायला हवं. विकेंद्रीकरण करताना आधुनिक विज्ञान नाकारून चालणार नाही. पण Globalisation (विश्वव्यापी), liberalization (व्यापकता) च्या धोक्यातून आपण बाहेर यायलां हवं, आणि डॉ. लोहियांच्या High technology ला महत्त्व द्यायला हवे. तळागाळातल्या माणसांपर्यंत सत्ता जायला हवी.

आज भोवताली माजलेल्या भ्रष्टाचाराच्या तणात अनेक तरुणांचे गट देशाच्या कानाकोपऱ्यात विधायक कामाचे ताटवे फु लवताना दिसताहेत. त्यांच्या रूपात मला उज्ज्वल भवितव्याच्या खुणा दिसतात. **म्हणूनच देशाला स्वातंत्र्य मिळणं म्हणजे केवळ इंग्रजांची सत्ता जाऊन स्वकीयांची सत्ता येणं असं मी समजत नाही तर न्यायाचं आणि समतेचं राज्य येथे नांदणं हाच स्वातंत्र्याचा खराखुरा अर्थ आहे.**

आमची पिढी हे स्वप्न साकार करण्याच्या कामात अपुरी पडली. तरुण पिढीने खांद्यावर सामाजिक व आर्थिक समतेचे निशाण घेऊन जेथे अन्याय असेल, विषमता असेल तेथे संघर्ष केले पाहिजेत. जाति धर्माच्या बंधनापलीकडे जाऊन सर्व श्रमिकांची व गरीबांची संघटना केली पाहिजे. स्त्रियांना न्याय मिळाला म्हणून लढा दिला पाहिजे. अशा संघर्षातून स्वातंत्र्य लढ्यात माझ्या पिढीने पाहिलेले स्वप्न साकार होईल असा मला विश्वास वाटतो.

●●

**– ग. प्र. प्रधान**
९३३ सदाशिव पेठ, बॅरिस्टर गाडगीळ
रस्ता पुणे ४११०३०






'Save Trees, Reuse Paper' - Dr. H. V. GALANA, Pune.

# माकडांचा खेळ

– मल्हार अरणकल्ले

रस्त्यात गर्दीचा गराडा दिसला म्हणून सहज थबकलो. पाच-पन्नास माणसांचं ते रिंगण पुढलं काही तरी पाहण्यात गर्क झालं होतं. त्यात मिसळून मीही टाचा उंचावून डोकावू लागलो.

गर्दीचा पोटातल्या रिकाम्या मैदानावर माकडाचा खेळ मोठा रंगात आला होता. एक माकड, एक माकडी आणि एक त्यांचे पिल्लू, हे या नाट्याचे मुख्य कलाकार आणि माकडवाला सूत्रधार.

सूत्रधारानं आदेश द्यायचा नि मुख्य पात्रांनी त्याबरहुकूम करायचं, असाच एकूण खाक्या. तिघांच्याही गळ्यात लोखंडी कडं आणि त्याला बांधलेली दोरी. सारा खेळ या दोरीवरचाच. माकडवाल्याची हुकमत जशी शब्दफेकीवर आणि आवाजावर; तशीच या दोरीवरही.

माकडवाल्यानं 'एऽऽऽय्' असा काहीसा वरच्या पट्टीतला आवाज केला की माकड तोल सावरत उभं राही, माकडी रुसून बसे नि पिल्लू डोळ्यांच्या खिडक्या टक्क उघडून आळीपाळीनं त्या दोघाकडं पाही. मधेच ते डोकं खाजवी, शेपटी हातात घेऊन तिच्याशी खेळे आणि एक उडी घेऊन पुन्हा टकमक पाहू लागे.

मग माकडवाल्याची, दोरीच्या साहाय्याने सांकेतिक भाषा सुरू झाली. त्यानं माकडाची दोरी थोडी खेचली. त्याबरोबर ते थोडं अलीकडं येऊन जमिनीवर झोपून राहिलं. माकडीची दोरी सैल करताच ती मान वर करून इकडे तिकडं पाहात थोडी पुढं, माकडाच्या जवळ गेली. इतका वेळ बाजूला असलेलं पिल्लू एकदम उड्या मारत कसला तरी आवाज काढू लागलं...

'एऽऽऽय्', हेऽऽ! माकडवाल्याचा आवाज, दृश्य बदललं. माकड पुन्हा दूर, माकडीही दूर आणि पिल्लू एका ढोलक्यावर जाऊन बसलेलं. गळ्यातलं डबडं पुढं घेऊन माकड त्यावर काठीनं वाजवू लागतं. माकडी नृत्याचे काही हावभाव करू लागते आणि पिल्लूही इकडून तिकडं धावत आनंद साजरा करू लागतं...

पिल्लाच्या गळ्यातली दोरी ओढली जाताच एकदम ते शांत होतं. त्याच्या चेहऱ्यावर घाबरल्याचा भाव दिसू लागतो. सारं शरीर आकसून घेऊन ते असे काही बसून राहतं की बस्स! या वेळी त्याच्या कपाळावर मात्र आठ्यांच्या आडव्या लाटा एकामागून एक दिसत होत्या. कपाळावरील या रेषांखेरीज त्याची हालचाल एकदम थांबली होती.

माकडानं डबा वाजवला, तरी पिल्लू शांतच, माकडीनं त्याच्या डोक्यावरून हात फिरवला, तरी पिल्लू गप्पच. माकडवाल्यानं त्याला उद्देशून काही आवाज काढले, सूचना दिल्या, तरीही पिल्लू थंडच.

'एऽऽऽय् रामू, काऊ घे, काऊ घे' असं म्हणत माकडवाल्यानं पिल्लापुढं दोन बिस्किटं धरली; पण त्यान तिकडं पाहिलंही नाही. पिल्लापुढं गोंडेदार टोपी धरली, तरीही त्याने लक्ष दिलं नाही. पेरूची फोड दिली, तरी पिल्लू गप्पच. काही केल्या पिल्लू हालचालच करीना.

माकडवाल्यानं मग एक युक्ती केली. खिशातनं दोन रुपयांची एक नोट काढून पिल्लापुढं धरली आणि पिल्लानं पटकन् ती घेतली!

'एऽऽऽय् रामू, पैशे खाताव काय? पैशा हवा काय? थांब, थांब सारा लोठा तुला पैशा देल. पैशा देल. पैशा दिला तरी पावती नाय देऊ. फक्त रोकड घ्यायची. टोपीत टाकायची...' माकडवाल्यानं सूचना देत पिल्लाच्या गळ्यातली दोरी सोडली. पिल्लू मोकळं झालं आणि टोपी हातात घेऊन ते वर्तुळाकार गर्दीच्या पुढून फिरू लागलं. उघडी टोपी. कुणी कुणी पैसे टाकले. नोटाही टाकल्या.

पिल्लानं पैसे तर उकळलेच पण मुक्तपणाचा फायदा घेऊन वाट्टेल तशा लीला केल्या. उड्या मारल्या. मातीत लोळून घेतले. पाण्याची बाटली फोडून टाकली. मैदानातले काही दगड उचलून भिरकावलेसुद्धा. मधूनच ते किंचाळलं. नाचलं. माकडच ते. त्याचं मन जसं वाहिलं तसं ते करत राहिलं. गर्दीतून टाळ्यांचा आवाज येऊ लागला. त्याबरोबर माकडवाल्यानं ढोलकी सुरू केली. त्याच्याबरोबरच्या साथीदारानं पिल्लाच्या टोपीतली रक्कम ठेवून आवराआवर सुरू केली. झालं. खेळ संपला. माकडवाल्याची तिन्ही पात्रं सायकलीवर बसली आणि त्यांची ही वरात पुढल्या मुक्कामासाठी निघून गेली.

एकदम भानावर येऊन घड्याळात पाहिलं. अर्धा पाऊण तास कुठल्या कुठं



**केदार देवगावकर याच्या वतीने छात्र प्रबोधनच्या वैशिष्ट्यपूर्ण वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!**

पसार झाला होता. 'अरे, किती वेळ गेला. हं! चला आता लवकर निघायला हवं, असं मनाशी म्हणत गर्दीतून बाहेर पडलो.

माकडाच्या खेळाचा अंमल काही केल्या मनातून जात नव्हता. माकडवाल्याचे इशारे, त्यानुसार माकडांच्या हालचाली, त्यांचे रुसवे-फुगवे आणि पिल्लाची एकूण लगबग. सारंच खूप विचारात टाकू लागलं.

गळ्यातली दोरी ठीक होती तोपर्यंत पिल्लू शांत होतं; पण ते स्वतंत्र होताच बिघडलं. त्यांच मन वारं प्यालं आणि वादळ बनलं. दिशाहीन वादळ जिकडे वार फुटलं तिकडे धावतं. तसंच त्याचं झालं. आपलं बंधन सुटलं, याचा आनंद लुटण्याचं भानही न राहता त स्वैराचाराकडं झुकलं. त्यानं स्वातंत्र्याचा केवढा सोहळा करायला हवा होता; पण नाही. पिल्लाला त्याचा विसर पडला. त्याला जाणं नको होतं, करमणूक नको होती, त्याला प्रेमाचा-सलोख्याचा धागाही नको होता. त्याला फक्त दोन रुपयाची नोट दिसली आणि तीही त्यानं माकडवाल्याच्या हातातून जवळजवळ ओरबाडूनच घेतली. नंतरही त्यानं पैसेच उकळले. खंडणी वसूल करावी तसे.

माकडाचा खेळ तर तेव्हाच संपला होता. मी आता घराच्या दिशेने चाललो होतो. मन अजून माकडाच्या खेळात होतं; तसंच लक्षही तिकडंच होतं. डोळ्यापुढं सारखा तोच खेळ दिसू लागला आणि आजूबाजूलाही माकडांचाच गराडा भासू लागला. माकडांचे चेहरे फक्त बदलत होते; किंबहुना त्यांना अधिक पैलू पडलेले होते.

समोरून एक मोर्चा आला. माकडांचा मोर्चा. होय, माकडांचाच. काही कारण होते, नव्हते; ठाऊक नाही. मोर्चेकऱ्यांनी दगड उचलले आणि भिरकावून दिले. घरांच्या, दुकानांच्या काचांवर, मोटारीच्या-रिक्षांच्या काचांवर कुणी पेटते बोळे फेकले. आग भडकली. दहशतीनं लोक घाबरले. 'बंद'चा जल्लोष करीत मोर्चा पुढं गेला. मागे आग धुसमत राहिली.

काचांचा खच पडलेला. धुरानं सारा परिसर काळवंडलेला. सगळीकडं भीतीचं सावट पसरलेलं.

पुढं गेलो तर या कशाचाही मागमूस दिसेना. रस्त्यावर तुरळक रहदारी सुरू होती. काही मुलं हातांनी कसली तरी पत्रकं वाटत होती. तुमची इच्छा नसली तरी ही पोरं पत्रकं तुमच्या हाती देतात. तसंच यंत्रवत् पद्धतीनं त्यापैकी एकानं एक पत्रक माझ्या हातात कोंबलं.

तो गोळा उलगडून वाचू लागलो. 'स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव! नागरिकांना आवाहन' अशा शीर्षकाखाली त्यावर काही मजकूर छापलेला होता.

स्वातंत्र्य हा शब्द माकडाच्या खेळापासून मला जाणवत होता, तो वेगळ्या अर्थानं. पण नंतर वाटलं अजूनही आपल्या आजूबाजूला माकडांचा तसाच खेळ सुरू आहे, होय, आपण स्वतंत्र आहोत म्हणून!

हुतात्म्यांनी रक्ताचं पाणी करून, फासावर प्राणांची आहुती देऊन स्वातंत्र्य मिळवलं; पण आम्ही अजूनही माकडांचाच खेळ तर खेळत नाही ना?

●●

– **मल्हार अरणकल्ले**
१०/२ गुरुजन सोसायटी परमहंस नगर, कोथरुड, पुणे ४११ ०३८





**आकाशातील ताऱ्यांची ओळख करून घेण्यासाठी अवश्य वाचा 'छंद आकाशदर्शनाचा' छात्र प्रबोधन प्रकाशन.**

# तेजस्वी उल्का – कल्पना दत्त

– दत्ता श्री. टोळ

सोळा वर्षांची एक तरुणी ब्रिटीश सत्तेविरुद्ध भूमिगत राहून लढणाऱ्या क्रांतिसेनेत दाखल होण्यासाठी क्रांती कार्यालयात आली. क्रांतिदलाच्या नेत्याजवळ तिने स्वत:चा मनोदय व्यक्त केला. तो नेता तिला म्हणला,

''तुझं नाव''.

''क्रांतीकारक''.

''न बोलावता दत्त म्हणून दारी उभे ठाकणे हे तुझं साहस कल्पनेपेक्षा भयंकर ठरेल हे ठाऊक आहे का तुला?''

''उघड्या डोळ्यानं मी हे सतीचं वाण स्वीकारत आहे.''

''आमच्या दलात सामील होऊ इच्छिणारी तू पहिलीच स्त्री. कसं जमणार?'' नेत्याने शंका बोलून दाखवली.

''मी सदैव पुरुष वेशात हिंडेन. पडेल ते काम करण्यास मी तयार आहे. नाही म्हणू नका.''

''स्त्रीनं पुरुषी कपडे परिधान करून वावरणं हा ह्या देशात कायद्यानं गुन्हा आहे.''

''ठाऊक आहे मला. मात्र क्रांतीदलात तसं भरती होऊ नये हा तर कायदा नाही.''

''तुझा युक्तिवाद बिनतोड आहे.''

''शिवाय उघडकीस येईल, सिद्ध होईल तेव्हा तो गुन्हा मानला जाईल. तोपर्यंत काम करण्यास प्रत्यवाय नसावा.''

''बस्स. खूप चांगलं बोललीस. आजपासून तू आमची एक सैनिक. जमेल तर स्वतंत्र स्त्री पलटण उभी करण्याचा प्रयत्न कर.''

कल्पना दत्त हे त्या तरुणीचे नाव. भारताच्या स्वातंत्र्यावर ब्रिटिशांनी घाला घातला. भारतीयांच्या सहिष्णुतेचा फायदा घेऊन व्यापाराच्या निमित्ताने भारतात आलेल्या इंग्रजांनी भारताला गुलाम केले. भारताने स्वातंत्र्ययुद्ध पुकारले. राणी लक्ष्मीबाईसारख्या अनेक रणरागिणी ह्या लढ्यात कामी आल्या. त्यापैकी कल्पना दत्तही एक रणचंडी. भूमिगत राहून सशस्त्र क्रांतीचा उठाव करण्यासाठी लढणाऱ्या पलटणीत ती दाखल होऊ इच्छित होती.

नेत्यांची संमती प्राप्त होताच कल्पनाचा जीव हरखून गेला. ती आनंदली. बंदुका, गोळ्या, संगिनी अशी हत्यारे गुप्तपणे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचविण्याची जोखमीची कामगिरी तिच्यावर सोपविण्यात आली. तिच्या तुकडीत नलिनी रंजनदास सामील झाली. पूर्ण तालुकेदार, तारकेश्वर दस्तीवार, सुधींद्रदास असे तिचे साथीदार होते. काही महिने लोटले. एके दिवशी...

क्रांतिकारकांच्या त्या गुहेवजा अज्ञात ठिकाणी सगळे काही योजना आखत होते.

''आपल्याजवळ असलेली शस्त्रास्त्रे पुरेशी नाहीत.'' सूर्यसेन म्हणाला, ''आणखी दारूगोळा आणायचा कुठून?''

''सरकारखेरीज फार मोठा साठा दुसरा कुठं असणार?'' तारकेश्वर बोलला.

''अगदी बरोबर आहे तुझं म्हणणं.'' एवढं बोलून सूर्यसेन सांगू लागला, ''चटगाव येथे ब्रिटिशांचा बंदूका, बॉम्ब अशा विविध शस्त्रांचा, दारूगोळ्याचा प्रचंड साठा आहे. तो आपण लुटायचा.'' ''सूर्यसेनजी, ही जबाबदारी माझ्यावर सोपवा.'' कल्पनाने इच्छा प्रदर्शित केली.

''बॉम्ब हाताळायचे म्हणजे लाडू वळायचे नाहीत.'' कल्पना स्त्री म्हणून तिला थोडं नाउमेद करीत सूर्यसेनने म्हटले.

''लाडू वळणं अन् बॉम्ब हाताळणं यात माझ्या दृष्टीनं फरक नाही. त्यासाठी परवा पलीकडच्या डोंगरात गोल गोटे अचूकपणे फेकण्याचा सराव केला आहे मी.''

''चालू दे तुझी प्रॅक्टीस. योग्य वेळ येताच तुझ्यावर ती देखील कामगिरी सोपवता येईल. थोड्याच काळात मी चटगाव शस्त्रागार लुटीची योजना आखतो. तालुकेदारांनी त्या ठिकाणची माहिती घेऊन नकाशा तयार करायचा. सुधींद्रदास त्या अवघड ठिकाणी बिनबोभाट कसं जाता येईल याची पाहाणी करेल. बाकीची माझ्याबरोबर प्रत्यक्ष लुटीत भाग घेतील.'' असं म्हणत त्या दिवशीची ती बैठक संपली.

२४ नोव्हेंबर १९३२. कल्पना दत्त नेहमीप्रमाणे दोस्त साथीदारांसह हिंडत होती. अंगात फुल पँट, फुल शर्ट, डोक्याला फेल्ट हॅट असा तिचा वेष होता. 'ठहरो' ह्या आवाजाने तिचे लक्ष वेधले. कोण हाका देतेय पाहाण्यासाठी तिने मागून वळून पाहिले. तेवढ्यात तिचे दोघे साथीदार सटकले. कारण त्या हाकेचा धनी एक शिपाई होता, हे त्यांनी चाणाक्षपणे ओळखले होते. कल्पनाला पोलीस चौकीवर नेण्यात



**प्रायोजक : ॲडॅप्ट रेकॉर्डिंग इन्स्ट्रुमेंट प्रा. लि., पुणे.**

आले. तिला हॅट काढायला सांगितले. तसे करताच तिचा घट्ट बांधलेला केशसंभार सुटला. अन् पुरुष वेष घेऊन हिंडल्याबद्दल तिला पिनलकोडच्या १०९ कलमानुसार खटल्याला सामोरे जावे लागले. जामिनावर सुटताच तिचे कार्य पूर्ववत् सुरू झाले. बंदुका, बॉम्ब घेऊन हिंडत असताना एकदा कल्पना व तिचे अन्य सहकारी यांची पोलिसांशी चकमक सुरु झाली. ठोऽ ठोऽ गोळीबार होऊ लागला. दोन्ही बाजूंनी बंदूका चालवण्यात येऊ लागल्या. सूंऽऽसूं करीत आलेल्या बंदुकीच्या एका गोळीने नलिनी रंजनदासच्या छातीचा ठाव घेतला. तर धड् धड् करीत दोन गोळ्या पूर्ण तालुकेदार याच्या शरीरात घुसल्या.  दोघे जागीच कोसळले. मरण पावले. कल्पनाला अपार दु:ख झाले. अन्य साथीदारांसाह तिने त्या धुमश्चक्रीतून सुटका करून घेतली.

'प्रतिशोध' ह्या एकाच शब्दाचे पुन: पुन: पडसाद कल्पनाच्या कानात घुमत होते. इकडे सूर्यसेन ह्यांनी चटगाव शस्त्रागारावर हल्ला चढवण्याची योजना पूर्ण केली. गणेश घोष, लोकनाथ सिंह, अनंत बल व अन्य ३० साथीदारांसह सूर्यसेनने त्या शस्त्रागारावर चढाई करण्याचे ठरवले. कल्पनाला मात्र ह्या मोहिमेत घेतले नव्हते. ती नाराज झाली. परंतु आपल्या क्रांतिकारक साथीदारांना दगाफटका झाला तर सुरक्षा म्हणून तिने पाठीवर बॉम्बची थैली घेऊन त्यांच्या पाठोपाठ जाण्याचे ठरविले.

१९ एप्रिल १९३०. त्या अलौकिक साहसी कृत्यासाठीचा मुक्रर करण्यात आलेला दिवस उजाडला. त्या दिवशी सूर्य मावळण्यापूर्वी त्याच्या साक्षीने सूर्यसेनने आपल्या पलटणीसह त्या दुर्गम



भागाकडे कूच केले. पूर्वनियोजित आखणीप्रमाणे पहाऱ्यावरील पोलिसांना जेरबंद करण्यात आले. तेवढ्या ह्या कटाचा सुगावा लागल्याने, ब्रिटिश फौजेची एक तुकडी त्या ठिकाणी येऊन पोहोचली. क्रांतिकारक अन् इंग्रज शिपाई यांची लढाईच सुरू झाली. कल्पना दुरून ते युद्ध पाहात होती. आपल्या साथीदारांची पिछेहाट होत आहे हे लक्षात येताच, इंग्रज सैन्यावर ती एकामागून एक बॉम्ब फेकू लागली. त्या अचानक हल्ल्याने इंग्रजांची धांदल उडाली. आपल्या मदतीला कोण धावून आले आहे हे क्रांतिकारकांना कळेना. मनोमन ते आनंदित झाले होते. तेवढ्यात इंग्रजांनी हवेत प्रकाशबॉम्ब उडवले. त्या उजेडात त्यांना तंग कपडे घातलेली कुणी तरुणी बॉम्ब फेकते आहे हे कळले. पण ती कोण आहे हे कळण्यापूर्वीच तिने तिथून पोबारा केला. इंग्रजांना माघार घ्यावी लागली. सूर्यसेन यशस्वी झाले.

कल्पना निसटली. आता पुढची झेप घ्यायची असा तिने मनाशी निर्धार केला. इंग्रज अधिकाऱ्यांच्या कचेरीत डायनामाईटचे स्फोट घडवून आणायचे, अशी महत्त्वाकांक्षा तिने उराशी बाळगली. त्या दृष्टीने तयारीला देखील लागली. बॉम्बस्फोट हे कल्पनाच्या लेखी क:पदार्थ होते. कशी कुणास ठाऊक इंग्रजांना ती वार्ता कळली. त्याचवेळी सूर्यसेन ह्यांना ती एकटी हे कृत्य करणार असल्याचे कळले. चटगावला आपल्या मदतीला धावून आलेली तरुणी, दुसरी-तिसरी कोणी नसून कल्पना दत्त होती हे कळल्याने त्यांचा ऊर अभिमानाने भरून आला. पोलीस कल्पनाचा पाठलाग करताहेत याचा वार्ता एका क्रांतिकारकाने तिला दिली. तेव्हा भूमिगत राहूनच ती ठिकठिकाणी आश्रय शोधत निघाली. समुद्रकिनाऱ्यावरील आपले महिरा गाव तिला सुरक्षित वाटले. ते तसे होतेदेखील. परंतु त्या गावात ती आधाराला गेल्याबरोबर इंग्रजी लष्कराने संपूर्ण गावाला वेढा दिला. त्या बिकट परिस्थितीत कल्पना हाती असलेल्या बंदुकीनिशी लढली. परंतु काडतुसे संपली तेव्हा तिला पकडण्यात आले. चटगाव शस्त्रागार लुटणे, डायनामाईट कट ह्याबद्दल तिच्यावर खटला भरण्यात आला. प्रदीर्घ कारावासाची, काळ्यापाण्याची तिला शिक्षा देण्यात आली.

धन्य ती वीरांगना कल्पनादत्त.
तिला लाख लाख प्रणाम. ●●

---

**दत्ता श्री. टोळ**
स्वरांजली, साहित्य परिषदेसमोर
पुणे ३०



**मोकाशी कुटुंबियाकडून हार्दिक शुभेच्छा!**

गंध मोहवी काव्याचा

# कविता स्वातंत्र्याची!

– शैलजा देशमुख



१४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्रीपूर्वी काही क्षणच पं. जवाहरलाल नेहरूंनी ''आज मध्यरात्री सारे जग निद्रिस्त असताना स्वतंत्र भारताला जाग येईल. एका युगाचा अस्त होईल. दीर्घ काळपर्यंत दबल्या गेलेल्या राष्ट्राच्या आत्म्याला वाचा फुटेल.'' असे भावपूर्ण उद्गार काढले. गुलामगिरीच्या काळोख्या रात्रीनंतर स्वातंत्र्याची पहाट उगवली. त्या पहाटेचे वर्णन कवी वसंत बापट यांनी

**शतकानंतर आज पाहिली पहिली रम्य पहाट,**
**मेघ वितळले, गगन निवळले**
**क्षितिजावर नव रंग उसळले**
**प्रतिबिंबित ते होऊन खुलले भारतभूमिललाट।**

अशा भावपूर्ण शब्दात केले तर वसंत सबनीस यांनी

**झरझर झरझर जा मेघांनो, गर्जत गर्जत दाही दिशांना**
**दिसेल मानव सांगा त्याला, भारत माझा स्वतंत्र झाला.**

असा संदेश मेघांजवळ दिला.

५० व्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने इतिहासाकडे मागे वळून पाहता भारताच्या साऱ्या इतिहासाचे, देशाच्या स्वातंत्र्य संग्रामाचे, वैभवशाली विजयांचे, त्यासाठी दिलेल्या निकराच्या लढ्याचे चित्र डोळ्यांसमोर उभे राहते. अनेक ज्ञान-अज्ञात क्रांतिकारकांची नि:श्वासिते ऐकू येतात.

एखादा स्वातंत्र्यवीर बेभानपणे स्वतंत्रतेचे स्त्रोत्र गातो,

**जयोऽस्तुते श्री महन्मंगले। शिवास्पदे शुभदे।**
**स्वतंत्रते भगवती त्वामहं यशोयुता वन्दे।**

स्वतंत्रता देवतेचं वर्णन करताना स्वा. सावरकरांच्या प्रतिभेला धुमारे फुटतात. पारतंत्र्याच्या आकाशात चमकणारी तारका म्हणजे स्वतंत्रता! सूर्याचे तेज, गांभीर्य, फुलांचे सौंदर्य सर्व काही स्वतंत्रतेच्या ठायी त्यांना एकवटलेले दिसते आणि शेवटी

**जे जे उत्तम उदात्त महन्मधुर ते ते**
**स्वतंत्रते भगवती सर्व तव सहचारी होते.**

शत्रूच्या रक्ताने रंगलेली, सृजनांनी पूजिलेली अशी ही स्वतंत्रतादेवी तिच्याठायी सर्वस्व अर्पण करताना सावरकर



**शिरीष पोंक्षे व प्रसाद पुरंदरे यांचेकडून प्रबोधकांना शुभेच्छा!**

म्हणतात

**तुजसाठी मरण ते जनन तुजवीण जनन ते मरण**
**तुज सकल चराचर शरण**
**भरतभूमिला दृढालिंगना कधी देशील वरदे?**
**स्वतंत्रते भगवती त्वामहं यशोयुतां वंदे!**

जेव्हा जेव्हा 'स्वातंत्र्य' या संकल्पनेचा विचार केला जाईल तेव्हा तेव्हा स्वा. सावरकरांच्या या अमर गीताचे स्मरण मराठी मनाला चेतना देत राहील.

खरोखर इतिहासकार स्वातंत्र्याचा इतिहास लेखणीने लिहितात. देशभक्त तो प्रसंगी स्वप्राण अर्पून घडवतात. परंतु हा इतिहास घडवणाऱ्यांच्या ओठावर मात्र स्फुरतात कवींची, गीतकारांची भान हरपवून टाकणारी समरगीते!

अशाच गीतांच्या सुरांवर कुणी देशभक्त फाशीच्या तक्त्यांवर हसतमुखाने चढले. तर कुणी बंदुकीच्या गोळीला सामोरे गेले. त्यावेळीही त्यांच्या ओठावर क्रांतीचा जयजयकार होता.

कवी यशवंतांच्या शब्दात

**वाढू दे कारागृहाच्या भिंतीची उंची किती मन्मना नाही क्षिती.**
**भिंतीच्या उंचीत आत्मा राहतो का कोंडुनी? मुक्त तो रात्रंदिनी!**

अशा बेफिकीरीने अनेक देशभक्तांनी कारावास तर हसत पत्करलाच. पण दऱ्याखोऱ्यात स्वातंत्र्य गीताचे सूर उमटणारा कुणी 'तो' अभिमानाने म्हणतो

**शृंखला पायात माझ्या चालताना रुमझुमे;**
**घोष मंत्रांचा गमे.**
**लौकरी स्वातंत्र्यभानो! भारतो दे दर्शने**
**होउ तेव्हा पावन.**

कुसुमाग्रजांच्या 'क्रांतीचा जयजयकार' मधील क्रांतीकारक मोठ्या धीराने पारतंत्र्यात असलेल्या भारतमातेची आश्वासक शब्दात समजूत घालतो.

**कशास आई भिजविसी डोळे उजळ तुझे भाल**
**रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उष:काल**
**सरणावरती आज आमुची पेटताच प्रेते**
**उठतील त्या ज्वालांतुन भावी क्रांतीचे नेते**
**लोहदण्ड तव पायामधले खळाखळा तुटणार आई**
**खळाखळा तुटणार...**

हा अतुट विश्वास सामान्य जनांच्या मनात जागवण्याचे



कामही अनेक कवींनी केले. दिव्याने दिवा पेटवा त्याचप्रमाणे तोंडोतोंडी खेळत ही गीते सर्वमुखी झाली. सामान्य माणसात चैतन्य निर्माण झाले; देशभक्तीचे वारे संचारले.

सर्व भेदाभेद विसरून एका सुंदर, तेजस्वी निर्भय जाणीवेने अवघा समाज उत्तेजित झाला. कवीचे हे कार्य खूप मोलाचे आहे. गेल्या ५० वर्षात स्वातंत्र्याची कविता अनेक कवींच्या प्रतिभेचे विविध रंग घेऊन फुलली. त्यातून ओसंडणाऱ्या विविध रसात वाचक अक्षरश: न्हाऊन निघाला.

मरणाला सामोरं जाताना अवघा कणखरपणा एकवटणारा कुणी क्रांतिकारक आईशी संवाद साधताना किती भावकोवळा होतो हे अनुभवायचं असेल तर कवी कुंजविहारींची 'भेटेन नऊ महिन्यांनी' ही कविता वाचायला हवी.



**छात्र प्रबोधनच्या यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा! 'हेजीब' सौमित्र गोसावी, पुणे.**

**मनी धीर धरी शोक आवरी जननी, भेटेन नऊ महिन्यांनी**
**...सांगेन तुला शपथ घेऊनी आई, मरणाला भ्यालो नाही**
**आठवी मनी श्रीगीतेचे सार, की नश्वर तनु जाणार.**
**हृदयाचे मोजून ठोके**
**बघ शांत कसं आहे ते**
**वाईट वाटते इतुके**
**तव सेवेला अंतरलो मी जननी।**
**भेटेन नऊ महिन्यांनी!**

स्वातंत्र्यरणी लढण्यासाठी पुन: जन्म लाभावा अशी हरीला मागणी करीत व नऊ महिन्यांनी पुन: जन्माला येईन अशा आश्वासनाने आईचं दु:ख हलकं करू पाहाणाऱ्या देशभक्ताची व्यथा वाचताना डोळे ओलावतात; कंठ दाटून येतो.

स्वातंत्र्याची उत्कट ओढ, स्वातंत्र्याच्या आशयाचे चिंतन, सामाजिक ऐक्य व समता यांचं चित्रण आपल्या कवितेतून जवळजवळ सर्वच मान्यवरी कवींनी केले आहे.

स्वातंत्र्यकवी गोविंद प्रभु रामरायाची प्रार्थना करताना आर्त स्वरात विनवतात –

**हे पक्षि तरुवरि गाती स्वच्छंदे**
**काननी त्यापरी रमती मृगवृंदे**
**स्वातंत्र्य सौख्य सेविनी आनंदे**
**मग आम्हाला का पारतत्र्यपंजरी कोंडीले राम?**

देशासाठी प्राण देणाऱ्या देशभक्ताचे वर्णन करताना कवी विनायक म्हणतात –

**देशभक्ता प्रासाद बंदिशाळा**
**शृंखलांच्या गुंफिल्या पुष्पमाळा**
**चिंता सिंहासन, शूल राजदण्ड**
**मृत्युदैवत दे अमरता उदण्ड**

देशाच्या स्वातंत्र्याचा विचार करताना इतिहासकाळात १८५७ च्या बंडात प्राणार्पण केलेल्या देशभक्तांचे स्मरण करायला कवी बा.ग. खापर्डे विसरत नाहीत.

**स्वातंत्र्याची ज्योत अंतरी जळत ठेवणे आहे का?**
**स्वराज्य अपुले वैभवशाली तुम्हास करणे आहे का?**
**देशासाठी होळी करतील असे दिव्य नर हवेत का?**
**हवे जरी रे रणमर्दानो सत्तावनला विसरू नका!**

१८५७ च्या युद्धाप्रमाणेच लो. टिळकांचा स्वराज्य मंत्र, गांधी युगातील वीस, तीस व बेचाळीस सालचे लढे, १९४७ साली मिळालेले स्वातंत्र्य, त्यानंतर स्वतंत्र भारतातील विविध आंदोलने या सगळ्यांचे दर्शन मराठी कवितेत झाले. भूपाळी, गोंधळ, आरती, ओवी अशी देवभक्तीसाठी वापरली जाणारी काव्यरूपे! पण कवींनी देशभक्तीची भावना या काव्यरूपातून व्यक्त केली.

कवी कुंजविहारींनी स्वतंत्रता देवीचा गोंधळ मांडला.

**स्वतंत्रते भगवती उदो गे, भारतभू माये**
**शिवाभवानी, विभवशालिनी, गोंधळास ये ये।**

असे आवतण दिले.

तर कुणी ग्रामकन्या सकाळी जात्यावर दळताना ओव्या गुणगुणू लागल्या त्याही स्वतंत्रतेच्या!

**पहिली माझी ओवी ग। भारतमातेला।**
**कुशीमंदी जिच्या आम्हा। जन्मचि लाभला।**
**दुसरी माझी ओवी ग। स्वातंत्र्यदेवीला।**
**इंग्रज घालवुन आणु हिजला। आपुल्या देशाला।**
**पोवाडा हे तर वीरांचे अभिव्यक्तीचे माध्यम!।**
**नव्या युगाचा नवा पवाडा**
**नव्या दमाने दुमदुमणार**
**करा बंधुनो एकमुखाने**
**स्वातंत्र्याचा जयजयकार**

१९४२ च्या भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात स्वत:ला समर्पण भावनेने झोकून देणारे अनेक कवी एका सुरात गाऊ लागले. वसंत बापटांचा सैनिक मोठ्या आवेशाने

**शिंग फुंकिले रणी, वाजतात चौघडे**
**सज्ज व्हा उठा–उठा, सैन्य चालले पुढे**
**दास्यकाल संपला, शांत काय झोपला**
**अग्नि येथ कोपला, पेटुनी तमा भिडे**
**सैन्य चालले पुढे**

अशी ललकारी देत होता.

कवी माधव ज्युलियन आपल्या देशबांधवाची अस्मिता जागी करताना म्हणत होते.

**हिंदुपुत्रांनो स्वत:ला लेखिता का बापडे, भ्रांत तुम्हां का पडे?**
**वाघिणीचे दुध प्याला वाघबच्चे फाकडे, भ्रांत तुम्हा का पडे?**

'श्यामची आई', 'गोड गोष्टी' यासारख्या हळव्या भावमधुर कथा लिहिणाऱ्या साने गुरुजींच्या लेखणीला देशप्रेमाने भारलेली कविता लिहिताना धार चढत होती.



निसर्गात शत्रू कोणीही नाही. प्रत्येकास काम नेमून दिलेले असते. श्री. उदय भवाळकर पुणे ९ (४३६९१६)

बलसंपन्न देशाला विश्वात मानाचे स्थान लाभो ही इच्छा व्यक्त करताना ते म्हणतात.

**बलसागर भारत होवो, विश्वात शोभुनी राहो।।**
**हे कंकण करि बांधियले, जनसेवे जीवन दिधल्ये।**
**राष्ट्रार्थ प्राण हे उरले, मी सिद्ध मरायाला हो।**

तर स्वातंत्र्य दृष्टिपथात आल्यावर कुसुमाग्रज

**निनादे नभी नाविकानो इशारा, आला किनारा.**

अशा शब्दात आनंद व्यक्त करीत होते.

देशाचा ध्वज आणि राष्ट्रगीत यांचा गौरवही कवितेतून केला जात होता. कवी ग.दि. गाडगूळकर **वेद मंत्राहून आम्हा वंद्य 'वन्दे मातरम्'।** असे मोठ्या अभिमानाने म्हणतात.

तर कधी

**हे राष्ट्र देवतांचे हे राष्ट्र प्रेषितांचे,**
**आचंद्रसूर्यनांदो स्वातंत्र्य भारताचे**

अशी सदिच्छा व्यक्त करतात.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही राष्ट्राच्या संकटकाळी, परकीय आक्रमणांच्या काळातही लोकांच्या अंत:करणातील राष्ट्रप्रेम जागं करण्याचं काम कवींच्या गीतानेचं केलं.

**अन्याय घडो शेजारी**
**की दुनियेच्या बाजारी**
**धावून तिथेही जाऊ**
**स्वातंत्र्य–मंत्र हा गाऊ**
**स्वातंत्र्य, बंधुता, समता यांचा घोष सदा घुमवू**
**उत्तुंग आमुची उत्तर सीमा इंच इंच लढवू!**

अशा सारखी गीतं ही याचीच साक्ष.

शेवटी देशाविषयीचं प्रेम ही चिरंतन भावना जागी ठेवण्याचं अनमोल काम कवी करत आले आहेत. एका कवीने अतिशय गोड शब्दात हे प्रेम व्यक्त केलंय.

**आनंदकंद ऐसा हा हिंददेश माझा।**
**जगी त्याविना कुणीही स्मरणीय अन्य नाही.**
**थोरात थोर समजा हा हिंददेश माझा।**
**पूजोनि त्यास जीवे वंदोनि प्रेमभावे**
**जयनाद हाचि गर्जा हा हिंददेश माझा।**

स्वातंत्र्यपूर्व काळात ही देशभक्तीची भावना जितक्या उत्कटतेने व्यक्त होती तितक्याच उत्कटतेने स्वातंत्र्योत्तर काळातही कवी ही भावना काव्यात व्यक्त करीत आहोत. आजही कवी सुरेश भट.

**गे मायभू तुझे मी फेडीन पांग सारे**
**आणीन आरतीला हे चंद्र सूर्य तारे**

अशा अतिशय काव्यमय शब्दात मायभूमीविषयीचे ममत्व व्यक्त करतात.

स्वातंत्र्य मिळाल्याला आज ५० वर्षे झाली. अजूनही न्यायाचं, समतेचं राज्य येथे पूर्णपणे आलेले नाही. भ्रष्टाचार, अन्याय, स्वार्थ यांच्या सभोवताली होणाऱ्या दर्शनाने कवी मंगेश पाडगावकर अस्वस्थ होऊन विचारतात.

**जमाखर्च स्वातंत्र्याचा मांडणार केव्हा?**
**जाब उंच प्रासादांचा मागणार केव्हा?**

धूर्त, शोषक, ढोंगी लोक, भ्रष्टाचारी लोक यांचे वर्तन त्यांना चीड आणते, तर दारिद्र्यात पिचणारा तळागाळातील माणूस पाहून त्यांचे अंत:करण व्यथित होते.

**घाम ओतुनी जो पिकवी मळे अमृताचे**
**दिवा झोपडीतून त्याच्या लागणार केव्हा?**

हा त्यांनी उभा केलेला प्रश्न खरोखर अंतर्मुख करणारा आहे. तरीही

**नभि नक्षत्रे बहुत एक परि प्यारा,**
**मज भारतभूमिचा तारा।**

ही भावना जोपर्यंत आमच्या हृदयात आहे तोपर्यंत येणाऱ्या आपत्तींना तोंड देत, देशाला वैभवाप्रत नेण्याची प्रेरणा कवींचे शब्द देत राहतील.

**– शैलजा देशमुख**
गुरुराज सोसायटी, पद्मावती, पुणे ३७

**विशेष अभिनंदन**

इ. १० वी व १२ वीच्या बोर्डाच्या परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्व सभासदांचे मन:पूर्वक अभिनंदन

**इ. १० वी : मुंबई विभाग –** कु. नूतन लिमये(१७ वी), कु. शलाका जोशी (२१ वी), कु. शीतल धबडे (२२ वी), चि. निखिल बडवे (२५ वा) (सर्वजण बोरिवलीचे.) चि. प्रथमेश सहस्रबुद्धे (७वा), चि. समित पाटील (२१ वा) (दोघेही डोंबिवलीचे)

**पुणे विभाग –** कु. संपदा शहा (२८वी), चि. समीर राईलकर (१९वा)

**कोल्हापूर विभाग –** चि. अमित देशपांडे, इचलकरंजी(७ वा), कु. स्मिता लंबे, कबनूर (२९वी), चि.स्वप्निल उदार, धुळे (२४वा)

**इ. १२ वी : कोल्हापूर विभाग –** कु. पल्लवी कोटिभास्कर, सांगली (३ री), चि. राहूल पाटील, इचलकरंजी (२५ वा)

**नाशिक विभाग –** चि. प्रवीण साळे (९ वा), चि. संतोष जोशी (२१ वा) (दोघेही धुळ्याचे)

वीरतेसाठीचे सर्वोच्च पदक


# परमवीर चक्र

आपण नेहमी ऐकतो, वाचतो की प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शौर्यासाठी परमवीर चक्र, महावीर चक्र, वीरचक्र यासारख्या सन्माननीय पदकांचे वितरण केले जाते. तुमच्यासारख्या मुलांनाही धैर्यासाठी, शौर्यासाठी यादिवशी शौर्य पदक दिले जाते. पण ही पदके म्हणजे नेमके काय असते? ती कोणाला दिली जातात? कशासाठी दिली जातात? आत्तापर्यंत ती कुणाला मिळाली आहेत? असे प्रश्न तुमच्या मनात नक्कीच येत असतील. तर आता या अंकात 'परमवीर चक्र' या पदाकाविषयी आपण माहिती घेऊ या.


आपल्या भारत देशात, युद्धभूमीवर पराक्रम गाजविणाऱ्यांसाठी, देशासाठी प्राणार्पण करणाऱ्यांसाठी, विज्ञान, कला, आरोग्य आदी शाखांद्वारे देशसेवा करणाऱ्यांसाठी, खास पदके दिली जातात. १५ मार्च १९५२ पासून ही पदके दिली जातात. देशासाठी महान कार्य करणाऱ्या व्यक्तींमधील सर्वोत्तम व्यक्तीला 'भारतरत्न' हा सर्वोच्च पुरस्कार दिला जातो. आतापर्यंत हा पुरस्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पं. नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी, धोंडो केशव कर्वे, आदींना देण्यात आला आहे. २ जाने. १९५४ पासून हा पुरस्कार दिला जातो.

'भारत रत्न पुरस्कारानंतर दुसरे मानाचे स्थान 'परमवीरचक्र' या पदकाला दिले जाते. आज आपण या पदकाविषयीच अधिक खोलात जाऊन माहिती घेणार आहोत. परमवीरचक्रानंतर अशोक चक्र : क्लास १, महावीर चक्र, अशोक चक्र: क्लास २, पद्मश्री अशा क्रमाने एकूण २९ पदके पुरस्कार दिले जातात. आतापर्यंत १९७१ साली पाकिस्तान युद्धाच्या वेळी सर्वात जास्त पुरस्कार दिले गेले आहेत. यात ४ परमवीर चक्र, ७६ महावीर चक्र, ५१२ वीरचक्र असे एकूण ५९२ (त्यापैकी १५९ मरणोत्तर देण्यात आले.) पुरस्कार ७१ साली दिले गेले. त्यानंतर काश्मीरच्या लढ्याच्यावेळी १९४७-४८ साली ५ परमवीर ५३ महावीर, ३०८ वीरचक्रे असे एकूण ३६६ (त्यापैकी ८० मरणोत्तर देण्यात आले.) पुरस्कार दिले गेले.

जमीन, समुद्र किंवा हवेत लढताना, Cospicus शौर्यासाठी, काही धैर्य/धारिष्ट्यासाठी, Per-eminent act of valour किंवा शत्रूशी लढताना प्राणार्पण करणाऱ्यांना परमवीर चक्र प्रदान केले जाते. हे पदक मरणोत्तरही दिले जाते. २६ जानेवारी १९५० पासून राष्ट्रपतींच्या हस्ते हे पदक दिले जाते. Gazette of India notification ने या पदकांच्या रचनेसाठी, पात्रतेसाठी, रिबीनसंदर्भात काही अटी घालून दिल्या आहेत. त्यापैकी काही अटी याप्रमाणे : या चक्राची रचना पदकाप्रमाणे असावी. त्यावर पुढील बाजूला, खाली 'परमवीर चक्र' असे इंग्रजीत असावे. पदक तांब्याचे बनविलेले असावे. १''× ३.८'' व्यासाचा गोल असावा. पदकावर पुढच्या बाजूला मध्यभागी ३ सिंहांचे राष्ट्रीय चिन्ह व त्याच्या चारही बाजूंना



PARAM VIR CHAKRA (OBVERSE)




PARAM VIR CHAKRA (REVERSE)



**मे. गोविंदराव शोभाराव आणि कं. सांगली ऋद्ध चहा सर्वत्र उपलब्ध २५० gm. १०० gm. ५० gm.**

इंद्राच्या अस्त्राचे चिन्ह अशी रचना असावी. मागच्या बाजूंना हिंदी व इंग्रजी दोन्हीत 'परमवीर चक्र' असे लिहिलेले असावे. हिंदी व इंग्रजी शब्दांच्या मध्ये कमळाच्या २ फुलांचे चित्र असावे. पदक डाव्या छातीवर लावण्यात यावे. पदकाला १ आणि पाच इंचाचा, जांभळ्या रंगाचा रिबॅन्ड असावा. **पात्रता–** भूदल, नौदल, हवाईदल, कुठलीही राखीव दले आणि कायद्यानुसारख असणारी कुठलीही सैन्य दले यातील अधिकारी पुरुष किंवा स्त्री व्यक्ती किंवा नर्सेस, सिस्टर्स, मेट्रन्स आणि नर्सिंग सेवेचे कर्मचारी, रुग्णालये आणि नर्सिंग सेवेतील इतर सेवा देणाऱ्या व्यक्ती किंवा वर उल्लेख केलेल्या दलांमध्ये नियमित किंवा तात्पुरती नोकरी करणारे नागरी स्त्री/पुरुष.

समजा, परमवीर चक्र मिळविणाऱ्या व्यक्तीला पुन्हा, शौर्यासाठी किंवा तशाच कारणासाठी, हेच पदक मिळाले तर त्यांच्या या पदकाच्या रिबॅन्डला एक बार



फ्लॅग ऑफीसर निर्मलजीत सिंग (मरणोत्तर)

लावण्यात येतो व यापुढे प्रत्येक वेळी, याच पदकासाठी, असा एक बार लावला जातो. हे बार मरणोत्तरही दिले जातात. आतापर्यंत भूदलातील चौदा जणांना तर हवाई दलातील एका व्यक्तीला हे पदक देण्यात आले आहे. पंधरापैकी ११ जणांना हे पदक मरणोत्तर देण्यात आले आहे.

हे पदक मिळविणाऱ्यांविषयी थोडसं :

भूदलाच्या १४ पैकी १७ Horse, Grenadiers, कुमाऊ रेजिमेंट, शीख रेजिमेंट आणि गुरखा रेजिमेन्ट यांना प्रत्येकी २ तर रजपूताना राइफल्स, रजपूत रेजिमेंट Brigade of Guards & Crops of Engineers यांना प्रत्येकी १ अशी पदके मिळाली आहेत. भारतीय हवाई दलातील एकमेव पदक फ्लॅग ऑफिसर निर्मलजीत सिंग यांना मिळाले आहे. मधील सेकंड लेफ्टनंट अरुण खेतरपाल यांना ७१च्या युद्धासाठी मरणोत्तर हे पदक मिळाले आहे. कुमाऊ रेजिमेंटच्या मेजर सोमनाथ शर्मा यांना हे १९४७ साली तर मे. सत्येन सिंग यांना ६२ च्या युद्धाच्यावेळी मरणोत्तर हे पदक मिळाले. मे. सोमनाथ शर्मा हे पदक मिळविणारे पहिले व्यक्ती होत.

४ Grenadiers च्या, कंपनी क्वॅार्टर मास्टर, हवालदार अब्दुल हमीद यांना १९६५ साली मरणोत्तर हे पदक देण्यात आले. १४ Guards चे लान्स नाईक अलबर्ट एक्का यांना १९७१ साली मरणोत्तर हे पदक देण्यात आले. Zoroastrian च्या लेफ्ट कर्नल ए. बी. तारापोर यांना हे पदक मिळाले आहे. पंजाबचे चार, उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश महाराष्ट्र (यात पुण्याच्या एका व्यक्तीचाही समावेश आहे) व राजस्थानचे प्रत्येकी दोन तर हरियाणा, बिहार आणि दिल्लीच्या एका व्यक्तीला हे पदक मिळाले आहे. ले. कर्नल तारापोर हे पदक मिळविणारे सर्वात मोठे म्हणजे ४२ वर्षांचे गृहस्थ होते तर इतर व्यक्तींना साधारणपणे वयाच्या ३२व्या वर्षी हे पदक मिळाले आहे. सेकंड लेफ्टनंट अरूण, खेतरपाल हे सर्वात तरुण पदक विजेते आहेत. २१ वर्षांचे असतानाच आणि नोकरीला लागून सहा महिन्यांच्या आतच पदक मिळविणारे असे ते आहेत. स्वत:हून हे पदक स्वीकारणारे सेकंड लेफ्टनंट आर. आर. राणे हे पहिले व्यक्ती होत. त्यांनी १९४८ साली हे पदक स्वीकारले. आत्तापर्यंत पदक मिळविणाऱ्यांमध्ये मे. होशियारसिंग



सी एच एम. पिरुसिंग (मरणोत्तर)

ह्या शेवटच्या व्यक्ती होत. त्यांना १९७१ साली हे पदक मिळाले.

परमवीर पदकविजेत्यांमध्ये, १ लेफ्टनंट कर्नल, ४ मेजर, १ कॅप्टन, १ उड्डाण अधिकारी, दोन सेकंड लेफ्टनंटस, १ सुभेदार, २ हवालदार, १ नाईक आणि २ लान्स नाईक अशी हुद्य्यांची विभागणी आहे. भारताबाहेरील एकाच व्यक्तीला हे पदक देण्यात आले आहे. कॅ. गुरबचन सिंग यांना त्यांच्या कांगोमधील शौर्यासाठी १९६१ साली हे पदक मरणोत्तर देण्यात आजे.

परमवीर पदकानंतर महावीर चक्र, वीरचक्र, अशोकचक्र आदी पदकांचा क्रमांक येतो. या पदकांविषयी आपण टप्प्या टप्प्याने माहिती घेऊ या. मधल्या काळात तुम्हीही या पदकांविषयी, पदक मिळविणाऱ्यांविषयी काही माहिती मिळविण्याचा जरूर प्रयत्न करा, पदकविजेत्यांच्या मुलाखती घ्या व आम्हालाही ते सर्व जरूर कळवा. ●●

**प्रतिनिधी**



**गिर्यारोहणाची प्रेरणा निर्माण करणारे पुस्तक 'गिर्यारोहणगाथा' कि. ४०रू. संपर्क 'छात्र प्रबोधन' प्रकाशन.**

# मनात जपलेले 'ते' १४ दिवस

**कर्नल ज.दि. सापतणेकर**
**मुलाखत– वर्षा कुलकर्णी**

स्वातंत्र्यदिनाच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त विशेषांक काढायचा ठरला आणि मग विविध विषयांची निश्चिती झाली. ज्यांनी प्रत्यक्ष युद्धात भाग घेतला आहे, युद्ध अनुभवले आहे. अशांच्याही मुलाखती घेण्याचे ठरले. १९७१ च्या पाकयुद्धात भाग घेतलेले कर्नल ज. दि. सापटणेकर यांची मुलाखतही घेण्याचे ठरले. 'कर्नल' सारख्या मोठ्या माणसाला भेटायला जायचं म्हटल्यावरच खरं तर टेन्शन आलं होतं. पण जेव्हा मुलाखतीची आगाऊ वेळ घेण्यासाठी म्हणून कर्नल सापटणेकरांना फोन केला तेव्हा, त्यांचा हसरा मोकळा 'कधीही या' म्हणणारा आवाज ऐकायला मिळाला आणि मनावरचं ओझं थोडंसं उतरलं. थोडंसं अशासाठी की सैन्यातल्या लोकांबद्दल नाही म्हटलं तरी आपल्या प्रत्येकाच्या मनात थोडी भीती असतेच. त्यामुळे प्रत्यक्ष भेटीच्या वेळी ते कसे वागतील, बोलतील? ते ऑफीसात देखील कडक शिस्तीचे असतील का? वगैरे प्रश्न मुलाखतीच्या प्रश्नांबरोबर मनात येत होते. खडकी ॲम्युनेशन फॅक्टरी मधील त्यांच्या ऑफिसमध्ये मुलाखत ठरली होती. लष्करी शिस्तीच्या सगळ्या गोष्टी पूर्ण करून त्यांच्या ऑफिसमध्ये पोहोचले. त्यांच्या सेक्रेटरीने पुन्हा माझी बाहेर सगळी चौकशी केली. मात्र आतमध्ये गेल्यावर लष्करी गणवेशातील एक उंच, हसरं आणि प्रसन्न व्यक्तीमत्त्व समोर आलं आणि मनावरचं ओझंही उतरलं. मनातले प्रश्न बाहेर यायच्या आधीच कर्नल साहेबांनी दमदार आवाजात स्वत:च सांगायला सुरुवात केली...

''आता मी कर्नल असलो तरी ७१च्या युद्धाच्यावेळी मी थोड्या खालच्या पदावर होतो. १४ व्या आर्टरली रेजिमेंट मध्ये कर्नल सहस्त्रबुद्धेंच्या नेतृत्वाखाली मी ॲज्युटंट (कॅप्टन) या पदावर होतो. त्यावेळी इम्फाळ, अरुणाचल प्रदेश मधून एका गावाहन दसऱ्या गावी असं



कर्नल ज. दि. सापटणेकर

आम्ही हिंडत होतो. कलकत्त्यालाही आमची रेजिमेंट जाऊन आली. त्याचवेळी जाणवलं की पाकिस्तानशी युद्ध अटळ आहे.

त्यावेळी आमच्या रेजिमेंटमध्ये बहुतेक सगळेजण तगडे जवान होते. एकदा आम्ही बोरी गावी जात होतो. कपोताक्षी नदीच्या काठी हे गाव वसलेले आहे. पाक सैन्याची अशी पद्धत होती की आधी हल्ला करायचा आणि आपण भारतीयांनी प्रतिहल्ल्याची तयारी केली की ते गाव सोडून जायचे. आम्ही आमच्या हाताखालच्या जवानांना सांगत होतो की, 'तुम्ही खड्डे खणा आणि सुरक्षित जागी बसा.' पण ते जवान तरुण रक्ताचे; त्यामुळे आमच्याकडे फार लक्ष द्यायचे नाहीत. आमचा तोफखाना असल्यामुळे आम्ही सर्वात मागे असायचो. असेच २४ नोव्हेंबरला संध्याकाळी आम्ही चहा पीत गप्पा मारत होतो. आम्ही म्हणजे कॅ. परेश, कॅ. आमटे आणि कॅ. रिझा आणि मी. गन पोझिशन ऑफिसर, जे सगळे सेकंड लेफ्टनंट असत, असे सगळेच आरामात बसले होते आणि काही कळायच्या आत अचानक आमच्यावर तोफांचा भडिमार सुरू झाला. गोळे आमच्यापासून लांब पडत होते. तरी आम्हा सर्वांनाच एकदम भीती वाटली. दारूगोळ्यांच्या गाड्या, माणसे, सगळं वाचलं. कारण शंभर पावले लांब ते गोळे पडत होते. नाहीतर आपले फारच नुकसान झाले असते. मात्र त्यानंतर दुसऱ्याच क्षणापासून आपल्या जवानांनी खड्डे खणायला सुरुवात केली.

थोड्या वेळाने कपोताक्षी नदीवर पूल बांधत असलेल्या आपल्या अभियंत्यावर पाकच्या सेबर जेट्स विमानांनी हल्ला केला. यात फार नुकसान झाले नसले तरी या हल्ल्यांची माहिती आम्ही मुख्य लष्करी केंद्राला कळविली. मात्र आपल्या केंद्राकडून काहीच प्रतिउत्तर दिले जात नव्हते. त्यामुळे आमचे जवान मात्र फारच चिडले. त्यानंतर कॅप्टन परेरांच्या बॅटरीवर (गटावर) पुन्हा हल्ला झाला. त्यानंतर ११ ।। वा. पाकची विमाने पुन्हा आली आणि यावेळी आपल्या



**उपासनेच्या विविधांगी उपयोगांची माहिती देणारे पुस्तक 'उपासनेद्वारा व्याधिमुक्ती' कि. १६ रू. 'ज्ञानप्रबोधिनी' प्रकाशन.**

डमडमहून आलेल्या विमानांनी, खालून पोटाकडून त्या तीन विमानांना अचूक टिपले. हे इतक्या अचानक झाले की, कसे झाले तेही आम्हाला कळले नाही.'' हा प्रसंग सांगताना कर्नलसाहेब इतके एक्साईट झाले होते की जणू आत्ताच आपल्या सैन्याने पाकची ती विमाने पाडली असावीत. त्यांच्या डोळ्यासमोर तो प्रसंग जसाच्या तसा उभा राहिल्याचे त्यांचे डोळे सांगत होत.

''या तीन विमानांपैकी एका विमानाचा कॅ. परवेझ वेदी याला आपण पकडले. कुठलाही कैदी पकडला, की सुरक्षेच्या दृष्टिकोनातून त्याला आधी मुख्य केंद्राकडे पाठविला जाई. या कॅप्टनलाही आम्ही मुख्य केंद्राकडे पाठविले. तिथे त्याने सांगितले की, मी सगळे सांगतो फक्त माझे डोळे काढू नका, हाल करू नका. 'असे कां?' विचारताच त्याने सांगितले की भारतीय जवानाला पकडले की पाक अधिकारी त्याचे डोळे काढत, हात-पाय कापत, हाल करत. त्यामुळे भारतीय अधिकारीही आपले असेच हाल करतील असे वाटून त्याने आधीच सर्व कबूल केले. पण आपल्या अधिकाऱ्यांनी अशी वागणूक कधीच कोणत्याही कैद्याला दिली नाही.''

सैन्यात असताना दुःखद घटना खूप ऐकायला, पाहायला मिळतात; पण गमतीदार किस्सेही ऐकायला मिळतात. सैन्यात हास्यविनोद करून आपणच आले मनोरंजन करून घ्यायचे असते, असे सांगून कर्नल सापटणेकरांनी एक गमतीदार किस्सा सांगितला. ''ती दिवाळीची रात्र होती. आमच्या तोफांची तोंडे आम्ही लढाई चालू होती तिकडे पूर्व दिशेला करून ठेवली होती. त्यावेळी बांगला देश रेडिओवरून अशी बातमी दिली गेली की, पाकचा हल्ला पश्चिमेकडून व उत्तरेकडून सुरू आहे. ही बातमी ऐकताच कॅ. आपटेंनी लगेच दोन तोफांची तोंडे पश्चिमेला आणि दोन तोफांची तोंडे उत्तर दिशेला करून घेतली आणि लगेचच मला फोनवरून तसे सांगितले. मात्र मी जेव्हा त्याला सांगितले की बांगलादेशाच्या आणि आपल्या दिशा वेगळ्या आहेत. त्यामुळे तोफांची तोंडे तुम्ही उलट विरुद्ध दिशेलाच केली आहेत. ती ताबडतोब पूर्ववत करा नाहीतर तुमच्यावर हल्ला होईल, हे ऐकल्यावर मात्र कॅ. आपटे आपल्या चुकीबद्दल खजील झाले आणि मी मात्र त्याही परिस्थितीत खळखळून हसलो.''

''३० डिसेंबरला लढाईची अधिकृतरित्या घोषणा झाली. त्यावेळी आपल्या त्यावेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधींनी रेडिओवर भाषण केले. ते भाषण आम्हाला खूप प्रेरणादायी होते. एक स्त्री पंतप्रधान दुसऱ्या देशाच्या पंतप्रधानांना आव्हान देते. हे स्फूर्ती देणारे होते. त्यावेळी आम्ही गरीपूर येथे होतो. ४५ चिलखती दल आमच्याकडे होते. त्यात P. D. ७६ टँकही होते, जे पाण्यातूनही जाऊ शकत. माझा मित्र मेजर नारंग या टँकरच्यावर उभा राहून जायचा. टँकमध्ये आत बसणे हे त्याच्यासारख्या शूर माणसाला प्रशस्तच वाटत नसे. तो जरा गंमतशीर स्वभावाचा होता. त्यांच्याशी आम्ही सतत संपर्क साधून असायचो. पण टँकवर उभे असल्यामुळे शत्रूच्या एका गोळीने मे. नारंगला अचूक टिपले. त्याला त्याच्या अतुलनीय साहसाबद्दल महावीर चक्रही देण्यात आले. थोड्याच दिवसात आम्ही गरीपूर काबीज केले. आमच्या हाती शत्रूचे अनेक टँक सापडले. मात्र मे. नारंगच्या रूपात आम्ही आमचाच एक उत्तम मोहरा गमावला.''


''लढाईच्या वेळी शूर माणसे तर बघितलीच शिवाय घाबरटही अनेक बघितले. त्यातलेच डॉ. दिवाकरन हे एक. ते केरळचे होते. त्यांना धड इंजेक्शनही देता यायचे नाही'', हे सांगताना कर्नल मोठ्याने हसत होते. ते दोन हातांनी इंजेक्शन द्यायचे. घरी पाठवा म्हणून सारखे म्हणायचे. आई आणि पत्नीच्या फोटोपुढे रडायचे. मात्र हे लढाईत शेवटपर्यंत कर्नल साहेबांबरोबर होते. त्यांच्या रेजिमेंटचे प्रमुख कर्नल सहस्त्रबुद्धेंबद्दल, कर्नल सापटणेकर मोठ्या आदराने बोलत होते. ''कर्नल सहस्त्रबुद्धे मोठे तापट पण शिस्तप्रिय होते. त्यांचा करडा आवाज कुठूनही ऐकायला यायचा. मात्र त्यांनी या लढाईत पूर्ण युनिटला आत्मविश्वास दिला. कर्नल सहस्त्रबुद्धेंचा १ हा गुप्त क्रमांक होता. त्यांचा फोन आला तरी आम्ही फक्त 'ऑफिस लिसनिंग' म्हणून आदेश घ्यायचा असतो. त्यावेळी टेलिफोन ऑपरेटर कर्नल सहस्त्रबुद्धेंचा फोन आला की इतके घाबरायचे की टायगरचा फोन (कमांडिंग ऑफिसरला टायगर म्हणत) म्हणून रिसिव्हर जवळजवळ ऑफिसरकडे टाकायचेच. आपण जणू काही आत्ताही असा रिसिव्हर झेलत आहोत, असे मिश्किल हसू कर्नलसाहेबांना येत होते. सैन्यातील एवढा मोठा अधिकारी युद्धकाळातील त्या गोष्टीमध्ये आजही रमला होता. माणसाच्या आतही एक वेगळा माणूस



**''पंख सुरांचे'' ही छात्र प्रबोधन निर्मित ध्वनिफित आवर्जून ऐका, किंमत रू. ४५/-**

लपलेला असतो असे म्हणतात, मला तर वाटते की कर्तव्यदक्ष कर्नल सापटणेकरांच्या आत एक मिश्किल, गमत्या माणूस लपलेला आहे आणि नंतर स्वत: कर्नल साहेबांनीच सांगितले की, ''मी आणि माझे अजून दोन मित्र, आम्ही आमच्या रेजिमेंटमधील सर्वात खोडकर व्यक्ती म्हणून प्रसिद्ध होतो. कुरापती काढणे यात मी, कॅ. प्रेमकुमार सूद आणि कॅ. शर्मा आघाडीवर असायचो. लढाईत एका खाणीजवळ जेव्हा कॅ. सूद जखमी होऊन अडकला होता तेव्हा बाहेर काढून दुसऱ्याला त्याच्या जागी, बंदूक लावून ठेवलेल्या जागी, (गन पोझिशनवर) पाठविण्यात आले. मात्र सूद जखमी झाला. (हा आमच्यातला पहिला जखमी होता.) तेव्हा आम्हाला खूप वाईट वाटले.''

''मधल्या काळात आपल्या सैन्याने बराकपूरही जिंकले. आम्ही पुढे सरकत होतो. वाटेत ठिकठिकाणी प्रेते पडलेली दिसत. इथेच एके ठिकाणी रात्री आम्ही तळ ठोकला होता. तंबूत रात्री विश्रांती घेताना खांद्यावर कुणाचा तरी हात असल्याचे जाणवले. मित्राचा असेल, दमल्यामुळे ठेवला असेल असे समजून मी त्याकडे दुर्लक्ष केले. मात्र खांद्यावर तो हात असल्यामुळे सकाळी मला उठताच येईना. तेव्हा हात बाजूला करायला म्हणून तो उचलला अन् पाहतो तर तो हात कमालीचा थंड होता कारण ते एक प्रेत होते.'' ऐकतानाही माझ्या अंगावर शहारे येत होते. मात्र कर्नल साहेब तो प्रसंग अनुभवत होते. ''त्या प्रेताच्या खिशात एक पत्र होते. युद्धावरील मुलाने त्याच्या आईला लिहिलेले. तो तिचा एकुलता एक मुलगा होता. मी पुन्हा घरी येईन असे वाटत नाही, असे त्याने आपल्या आईला कळविले होते. आम्ही ते पत्र त्याच्या आईला पाठवून दिले. त्याबरोबरच तिच्या मुलाच्या निधनाची बातमीही कळविली.'' सांगताना कर्नल साहेबांचा कंठ दाटून आला होता. डोळे त्या भारतमातेच्या सुपुत्राच्या आठवणीने पाणावले होते. असे हृदयद्रावक प्रसंग खरं तर सैन्यातील व्यक्तीला नवे नसतात पण प्रत्येकाच्या आत एक हळवी व्यक्ती असते जी असे प्रसंग मोठ्या कष्टाने पचविते. कारण सैन्यातील कडक शिस्तीची असली तरी शेवटी ती माणसेच असतात.



''असाच माझा एक मित्र कॅ. नकारना. नुकताच त्याचा साखरपुडा झाला होता. त्याला नवी स्कुटरही मिळाली होती. पण त्याला लढाईत लवकर पुढे जायचे असल्याने त्याने त्याचे सामान व नवी स्कूटर माझ्याजवळ दिली होती. सिरायली गावात आम्ही होतो. मद्रास बटालियनला दौलत बेगवर हल्ला करण्याचा आदेश मिळाला. कॅ. शर्मा हा त्यावेळी कॅ. नकारनाबरोबर होता. त्या हल्ल्यात पहिल्या रात्री शर्माला गोळी लागून तो जखमी झाला. तोफेची, गोळा टाकण्याची, स्वयंचलित यंत्रणा सुरु करून त्यांचा साथीदार सुरेंद्रसिंग त्याला खांद्यावरून घेऊन आला. ३० डिसेंबरला रात्री कॅ. नकारना, मला त्यांच्या कामगिरीची माहिती देत असताना, अचानक त्याचा आवाज बंद झाला. काळजीने मी त्याबरोबरच्या इतर अधिकाऱ्यांशी संपर्क साधला पण तोही लागेना. यावेळी आम्हाला थोडी माघार घ्यावी लागली. नंतर मला कळले की, हेल्मेटमधून थेट डोक्यात गोळी लागून कॅ. नकारना मरण पावला होता. हा आम्ही केलेला पहिला अंत्यसंस्कार. मात्र थोड्याच काळात आम्ही दौलत-बेग काबीज केले.''

सीझ फायरच्या एक दिवस आधी १६ डिसेंबरला आम्ही खुलनाच्या जवळ पोहोचलो. खुलना हे मेघना नदीवरील एक बंदर आहे. आम्ही आता विजयाच्या जवळ आलो होतो. संध्याकाळी आम्ही खुलनाच्या दिशेने गोळीबार सुरू केला. आणि रेडिओ सेट



**'छात्र प्रबोधन' मासिकासाठी जाहिराती मिळवून द्या. दर अर्धे पान रू. २,०००, पूर्ण पान रु. ३,०००**

वरून (युद्धाच्या वेळी वापरले जाणारे संपर्काचे साधन) अचानक एका अधिकाऱ्याने तोफखान्याची मदत मागितली. त्याची जागा आमच्या पुढे होती पण तोफा आमच्या मागे होत्या. त्या अधिकाऱ्यावर पाकने हल्ला केला होता. पण मी म्हटले तू सिद्ध कर, की तू भारतीय सेनेतील आहेस. तो गडगडला. त्याला कोड नंबर माहित नव्हता. पण एकदम तो म्हणाला, 'सापटणेकर, मी कुलू (कुलकर्णी). मी ओळखले आणि लगेच त्याला मदत पाठविली. कॅ. आपटे पुढे होते. त्यांनी त्याला मदत केली. कुलकर्णीला १६ डिसेंबरला आम्ही वाचविले पण १७ डिसेंबरला मात्र तो मारला गेला.' पण अशा घटनांसाठी सैन्य थांबत नाही. कारण देशासाठी प्राण देण्याच्या तयारीनेच तुम्ही सैन्यात येता. १७ डिसेंबरला खुलना काबीज झाले. कर्नल सापटणेकरांच्या पुढे तोफखाना होता. त्याच्यामागे त्यांची गाडी आणि त्यांच्या मागे दुर्गामातेचे मंदिर अशी रचना असे. ते जे गाव काबीज करत तिथे दुर्गामातेची स्थापना केली जाई. खुलना येथे एका शाळेत ते गेले. मुलींची शाळा असावी. त्या खूप घाबरल्या होत्या. पण जेव्हा सर्वांनी तिथे दुर्गामातेची स्थापना करून आरती केली तेव्हा त्या मुलींची भीती कमी झाली.

''कॅ. हरवंतसिंग नावाचा एक गमत्या अधिकारी आमच्यात होता. युद्धात सापडलेला दारुगोळा, हत्यारे बघायची हौस त्याला होती. बॉम्ब सोडून त्यातली दारू एकत्र करून तो काही प्रयोग करायचा. अशीच एकदा, त्याने एकत्र करून ठेवलेल्या दारूला आग लागली आणि त्याची दाढी जळाली. नसती हौस अशी अंगाशी येते. मात्र लढाई असली तरी आपले आयुष्य धोक्यात आहे असे कधी मनातही येत नसे, कारण देशासाठी आम्ही लढत होतो.''

खुलना येथेच शरणागती समारंभ झाला. पाकच्या ६७ बलून्स रेजिमेंट या पठाणांच्या, भारतीय जवान इतके चपळ आणि कार्यक्षम कसे? याचे आश्चर्य वाटत होते. ते पठाण म्हणाले ते त्या पठाणांच्या शब्दांतच कर्नल सापटणेकरांनी सांगितले. जणू काही ते शत्रूकडील कौतुकाचे शब्द त्यांच्या मनावर जसेच्या तसे कोरले गेले आहेत, ''हिंदुस्थानी जवाँ अफसर और हमारी फौज मिल जाये तो दुनिया में इससे बढकर फौज नही होगी. हम लोगोंसे बहादुरोंकी कमी नहीं, मगर हमारे अफसर्स नहीं रहें इसलिये हम हार गये.'' ह्या तरुण जवानांना त्या पठानांनी केलेले हे सॅल्युटच आहे असेच वाटते.

आणखी एक बोलका किस्सा कर्नल साहेबांनी सांगितला. युद्धानंतर ते हिंदुस्थानात परत येत असताना वाटेत त्यांना एक म्हातारी भेटली. उरली सुरली भांडी ती गोळा करत होती. कर्नलसाहेब तिला म्हटले की ''तुमचा बांग्लादेश स्वतंत्र झाला. तुम्हाला आता कसली काळजी?'' मात्र ती बंगालीत म्हणाली, 'सरकारे आपापसात भांडतात पण त्यामुळे आम्हाला काय फायदा होणार?' माझे तर सर्व नष्ट झाले, परिवार संपून गेला. चंद्रगुप्त मौर्यानंतर हिंदुस्थानचा हा पहिलाच विजय होता पण त्या म्हातारीच्या या बोलण्यानंतर मला एकदम पराभूत वाटले, हे सांगताना कर्नल साहेबांना गहिवरून आले. एकूण चौदा दिवस हे युद्ध चालले. पंधराव्या दिवशी ते लगेच परत आले.

अशा अनेक आठवणी कर्नल साहेबांकडून येताना घेऊन आले. दोन देशांमध्ये युद्ध व्हायलाच पाहिजे त्याशिवाय प्रगती होणार नाही, असे त्यांना वाटते. कारण पहिल्या, दुसऱ्या महायुद्धानंतरच इतर देशांनी प्रगती केली. आपणही ६२ च्या युद्धानंतर पुढे आलो.

कर्नलसाहेबांना १९७१ च्या विजयाच्या शिल्पकार इंदिरा गांधीच वाटतात. त्यांनी हिंदुस्थानचे भविष्य घडविले, भवितव्य बनविले. एका स्त्रीने युद्धाची सर्व परिस्थिती हाताळली हे फार मोठे कर्तृत्व असल्याचे कर्नलसाहेबांना वाटते.

युद्ध काय असते, त्यावेळचा तणाव काय असतो, शत्रूच्या काय चाली असतील, त्याला आपले प्रत्युत्तर काय असेल एक ना अनेक प्रश्न असतात. आपल्याला त्याची गंभीरता कदाचित कळणार नाही, कारण तो अनुभव घ्यायलाच लागतो. कर्नल सापटणेकरांचे अनुभव वाचून तुम्हालाही वाटलं असेल ना की आपणही शत्रूशी लढावे, बंदूकीने गोळ्या माराव्यात, शत्रूला पराभूत करावे, अरे होऽऽहोऽऽ वाचता वाचता तुम्हीही युद्धभूमीवर पोहोचलात काय? मग आम्हालाही कळवा तुमचे तिथले अनुभव !!! ●●

कर्नल ज.दि. सापटणेकर
१४ रिव्हर साईड रोड, ऑर्डनल्स
इस्टेट, खडकी, पुणे.
मुलाखत – वर्षा कुलकर्णी
२२ अ 'मैफल' ९१/३ शिक्षकनगर
कोथरूड, पुणे – ३८

वाचलेच पाहिजे असे काही
– विजय कुलकर्णी

# स्वाधीन की दैवाधीन

– रामचंद्र साळवी

लहानपणापासून आपल्या सगळ्यांना लढाई या गोष्टीचे विलक्षण आरक्षण असते. अगदी दोन-अडीच वर्षांची मुले देखील 'ढिश्यांऽव ढिश्यांऽव' करत खेळातील बंदूक घेऊन घरभर फिरत असतात. इथे एकदा 'लढाई' बद्दल जे कुतूहल, जी उत्सुकता निर्माण होते ती शेवटपर्यंत जात नाही. मग ते कुठलेही युद्ध किंवा लढाई असो. त्यातून या शतकात झालेल्या दोन महायुद्धांबद्दल तर आपण खूपच एकलेले असते. दुसऱ्या महायुद्धावर इंग्रजीमध्ये खूप साहित्य लिहिले गेले. खूप चित्रपट या विषयावर निघाले. मराठीमध्ये मात्र फार थोड्या लोकांनी या विषयावर लिहिले आहे. या थोड्या लोकांमध्येच मेजर रामचंद्र साळवी यांचा समावेश करता येईल. युद्ध या विषयाची आवड असलेल्यांना आणि नसलेल्यानाही मे. साळवी यांचे 'स्वाधीन की दैवाधीन' हे युद्धकथेवरील रोमांचकारी पुस्तक, एक खजिनाच आहे. हे पुस्तक म्हणजे मे. साळवी यांनी दुसऱ्या महायुद्धात प्रत्यक्ष घेतलेल्या अनुभवांचे कथन आहे. त्यामुळे ह्या रोमांचकारी लेखनामध्ये जिवंतपणा आला आहे.

भारतामध्ये इंग्रजांनी सैन्यभरती केली आणि या सैन्याला जगाच्या विविध भागांमध्ये जर्मन, इटालियन फौजांशी लढायला पाठविले. यामध्ये पंजाब लाइन, रजपूत लाइन, मराठा लाइन अशा भारतातल्या लढाऊ जातींच्या फौजा तयार करण्यात आल्या होत्या. मेजर साळवी हे 'मराठा लाइट एन्फंट्री' या तुकडीत होते.

पुस्तकाच्या पहिल्या भागात साळवींचे शिक्षण, लष्करात प्रवेश, लष्करातील प्रशिक्षण, त्यांच्या नेमणुका याविषयीचे त्यांचे कथन आहे. लष्कराबद्दल लिहिताना साळवींनी लष्करातल्या पद्धती, हुद्दे, लष्करी जीवन, सैन्यातील संघटना, प्लॅटून याची भरपूर माहिती दिली आहे. ब्रिगेड, बटालियन अशा आपण नुसत्याच ऐकलेल्या शब्दांचा खरा अर्थ आपल्याला कळतो. लष्करात तुम्हाला युद्धावर जाण्याचा हुकूम वेगळ्या प्रकारे दिला जातो. आपल्याला वाचताना त्याची थोडी गंमत वाटते. युद्धावर जाण्याचे आदेश देणारे दोन मोहोरबंद लखोटे येतात. पहिला लखोटा आला की युद्धावर जाण्याची फक्त पूर्वसूचना असे. या लखोट्यांबाबत अत्यंत गुप्तता ठेवावी लागे. घरच्यांनाही ही बातमी कळविण्याची परवानगी नसे. हे लखोटे चांदीच्या तबकातून आणले जात. मात्र दुसरा लखोटा मिळण्यापूर्वी रजाही मिळत असे. मे. साळवी यांनाही पहिला लखोटा मिळाल्यानंतर ३ आठवड्यांनी म्हणजेच ८ मार्च १९४२ ला दुसरा लखोटा मिळाला. २४ तासात रणभूमीवर जाण्याचा त्यात आदेश होता.

यानंतर साळवींना प्रत्यक्ष युद्धावर आफ्रिकेमध्ये सुएझ कालव्याजवळ टोब्रुक या गावी पाठविण्यात येते. नंतरच्या भागात त्याचे वर्णन आहे.





**बुद्धिमत्ता चाचण्यांसाठी भेटा अथवा लिहा. प्रज्ञा मानस संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी , पुणे.**

कैरोपासून १२ मैलांवर असलेल्या 'मीना कॅंप'मध्ये ब्रिटिश सैन्याची व्यवस्था करण्यात आली होती. तिथला दिनक्रम, मीना कॅंपमधील दिवस याबद्दलची माहिती पुढील भागात आहे. जर्मन फौजांशी लढताना दोस्त राष्ट्रांनी केलेल्या संरक्षणरचना, टेहेळणीसाठी खंदक, मग दोस्तांवरील जर्मनांचा हल्ला याचे वर्णन आहे. हे वर्णन एवढे जिवंत वाटते की आपण चित्रपट बघत आहोत असे वाटते. युद्धभूमीवर मे. साळवी पकडले जातात. युद्धकैदी म्हणून त्यांना इटलीतल्या ॲव्हर्सा या गावी पाठविण्यात येते. या भागात कैद्यांचे हाल कसे केले जातात याचे अंगावर काटा आणणारे वर्णन मे. साळवी यांनी दिले आहे. दोस्त राष्ट्रांना इटली शरण गेल्यामुळे तेथील कैदी हे कैदी उरत नाही. मात्र मुक्त होऊन २४ तास उलटायच्या आधीच पुन्हा जर्मनांच्या केदेत साळवींना जावे लागते. कारण आता जर्मनीचे सैन्य इटलीत घुसलेले असते. नंतरच्या भागात साळवींनी सुटकेसाठी केलेल्या प्रयत्नांचे वर्णन आहे, जर्मनांकडून आधी पळून गेलेल्या हिंदी कैद्यांना शोधण्याचा पास घेऊन साळवी चौघा साथीदारांसह येथून आपली सुटका करून घेतात. (पॅरोलवर) या परवान्यानुसार त्यांना ७२ तासांमध्ये पुन्हा छावणीत परत यावे लागणार असते. हे पाचजण पळून व्हिला सान सबास्तिआनो या गावात येतात.

पुस्तकाचा शेवटचा भाग, या गावातील माणसे, साळवींचा तेथील दिनक्रम या घटनांनी साळवींनी रंगविला आहे. या गावातील अदलीना, रोमानो या लोकांनी प्रसंगी स्वत:च्या जिवाचीही पर्वा न करता, साळवींना कशी मदत केली त्याचे हृद्य वर्णन या चाळीस पानात आहे. ते पॅरोलवर सुटूनही परत जात नाहीत, त्यामुळे जर्मनांचे सैन्य कायम त्यांच्या मागे आहे. यानंतर सुरू होते साळवींचे लपाछपीचे जीवन. युद्धभूमी किंवा युद्ध संपल्यानंतरही प्रांत, भाषा, धर्म ही बंधने न उरता माणूस एवढी एकच जात कशी उरते याचे अप्रतिम वर्णन आहे. त्या गावातील लोक त्यांना इतकी मदत करतात की अशी मदत त्यांना कदाचित कोणी भारतातही केली नसती. आपल्याला वाचतानाही स्वत:च्या जिवाचा विचार न करता तिथली माणसे त्यांना मदत करतात, जेवण देतात. येथील लोकांचेही शेवटी खूप हाल होतात पण तरीही मेजर साळवींचा ठावठिकाणा कोणी सांगत नाही. शेवटी ते व त्यांचे साथीदार सापडत तर नाहीतच उलट दोस्त राष्ट्रे गावावर ताबा मिळवतात. ज्या गावाने त्यांना इतकी मदत केली त्याच व्हिला सान सबास्तिआनो या गावाचे सर्वाधिकार ब्रिटिश सैन्यातर्फे साळवींना दिले जातात.

सुमारे चार वर्षानंतर साळवी भारतात परत येतात. हे पुस्तक त्यांनी परत आल्यानंतर १४ वर्षांनी लिहिले आहे. परंतु त्यातला ताजेपणा जराही कमी झालेला नाही. व्हिला सान सबस्तिओनोतल्या अदलीना बाईंशी मे. साळवींचा झालेला पत्रव्यवहारही पुस्तकाच्या शेवटी दिला आहे. पुस्तकाची भाषा खूप सोपी तरीही बोलकी आहे. आपल्यापैकी प्रत्येकाने जरूर वाचावे असेच हे युद्धावरील प्रत्यक्ष अनुभवांचे बोलके पुस्तक आहे.

●●

**– विजय कुलकर्णी**
२२ अ 'मैफल', ९१/३शिक्षकनगर
कोथरुड, पुणे ३८

## रणमर्द गडी हा!

रणमर्द गडी हा, जवान सैन्य दलाचा
एकनिष्ठ सेवक आपुल्या भारतभूचा

ही ध्वजा निरंतर फडकावी गगनात
हा यास्तव राहे चिरजागृत दिनरात

हे स्वातंत्र्याचे स्वर्ण उत्सवी वर्ष
तुजमुळे जवाना द्विगुणित आमुचा हर्ष

सद्धर्म पाळितो पुतळा निर्भयतेचा
जनमनात घुमतो जयजयकार तयाचा.

**– संजीवनी**



**आधुनिक काळात अर्थपूर्ण संस्कार होण्यासाठी ज्ञान प्रबोधिनी द्वारा प्रकाशित पोथ्या वापरा.**

## जराशी ओळख **ईशान्य भारताची!**

**– विवेक पोंक्षे**

इतिहासाचा अभ्यास करताना अफझलखानाचा वध, सिद्दी जौहारच्या पन्हाळगडच्या वेढ्यातून करून घेतलेली सुटका, खुद्द लाल महालात डेरा टाकून बसलेल्या शाहिस्तेखानाची बोटे कापून केलेली नाचक्की, यासारख्या गोष्टी वाचताना अंगावर स्फुरण चढते. या साऱ्या कथांचे नायक शिवछत्रपती! त्यांची ओळख कोणाला करून द्यायची मुळी गरजच नाही. महाराष्ट्रातल्या कोणत्याही कोपऱ्यात जन्माला आलेल्या, आमचा पिंडच मुळी शिवरायांच्या पराक्रमाच्या लीलामृतावर पोसलेला आहे.

बैलांच्या शिंगांना मशाली बांधून त्यांना पिटाळले कात्रजच्या घाटात आणि स्वत: महाराज मात्र सिंहगडाच्या दिशेने कूच करता करता कात्रजकडे धावणाऱ्या मुगली सैन्याची फटफजिती बघत राहिले. ही गोष्ट वाचताना गालातल्या गालात तुम्ही आम्ही हसत असतो. मनातल्या मनात महाराजांच्या चातुर्याचे कौतुक करत असतो. पण या चातुर्याचा, अशा पराक्रमाचा ठेवा केवळ महाराष्ट्राचा नाही तर तो साऱ्या भारतवर्षाचा आहे. छत्रपतींचा लढा भारतीय जनतेने परकीय सत्तेविरूद्ध उभारलेला लढा होता, असे सगळ्याच भारतीयांना वाटत असेल तर मग परकीयांविरुद्ध प्रांतोप्रांती ज्यांनी आपले जीव कुर्बान केले, प्रतिकाराचे निशाण उभे केले अशा वीरांचे इतिहास आम्हाला माहीत नकोत का? त्यांच्या पराक्रमांचे पोवाडे आम्ही गाणार ना?

पण वस्तुस्थिती मात्र खूप वेगळी आहे. आपल्यापैकी किती जणांना आसामच्या शिवाजीची गोष्ट माहित आहे? त्याचे नाव लचित बडफुकन. बडफुकन म्हणजे सेनापती. बडफुकन म्हणजे सरसेनापती! या लचित बडफुकनने आसाममध्ये मुगली सत्तेला पाय ठेवू दिला नाही. जेव्हा महाराष्ट्रात शिवाजी महाराज सह्याद्रीच्या अंगाखांद्यावर मुगली आणि आदिलशाही सत्तेशी गनिमी काव्याचा खेळ खेळत होते, तेव्हाच आसाममध्ये लचित ब्रह्मपुत्रेच्या तीरावर मुगलांना सळो की पळो करून सोडत होता. उंच उंच शिखरांनी सजलेला, घनदाट अरण्ये अंगाखांद्यावर ल्यालेला सह्यगिरी जसा शिवरायांच्या दारचे अंगण होता तसेच मैलोन् मैल पसरलेले ब्रह्मपुत्रेचे पात्र म्हणजे लचितच्या परसातले अंगण होते. या ब्रह्मपुत्रेचा उपयोग आपली बचावरेषा म्हणून करत लचितेने मुगलांचे कंबरडे मोडले. मशाली लावलेल्या अनेक होड्या रात्रीच्या प्रहरी नदीत सोडून मोठ्या सैन्याचा आभास निर्माण करत लचितने मोगलांचा खास आसामी कात्रज केला. त्याच्या पराक्रमाच्या कथा





**रू. ३००/– देणगी देऊन वाढदिवसानिमित्त आपल्या नावाने छात्र प्रबोधनमधील एक पान प्रायोजित करा.**

आम्हाला आपल्या वाटत नाहीत. कारण आपले अज्ञान. छत्रपतींना झोळीत घातलेले राज्य हे ईश्वरी राज्य म्हणून तूच राख, असे म्हणत ते परत करणाऱ्या निस्पृह रामदास स्वामींच्या गोष्टी आम्हाला माहीत असतील. पण असेच वागणारे वडगोहाई (वडगोहाई-मोठे गोसावी) आम्हाला अनोळखीच असतात.

आपल्या देशाची प्रचंड लांबी रुंदी पाहता कानाकोपऱ्यातल्या इतिहासकालीन गोष्टी लक्षात ठेवायच्या म्हणजे अवघडच आणि त्या ऐकून, समजून घेऊन, लक्षात ठेवून काय उपयोग? असाही प्रश्न कदाचित मनात उभा राहील. पण या गोष्टी म्हणजे देशाच्या कोपऱ्याकोपऱ्यांना जोडणारे पूल आहेत. रामायण-महाभारतातील कथांनी आपले भारतवर्ष असेच उभे आडवे बांधून काढले आहे. प्रभुरामचंद्रांचा प्रवास आहे उत्तरेतल्या अयोध्येपासून ते दक्षिणेतील लंकेपर्यंत. तर योगेश्वर कृष्णाचा संचार आहे सौराष्ट्रातल्या द्वारकेपासून ईशान्येतील मणिपूरपर्यंत. टिळक-सावरकर-गांधी-नेहरू या नामावळीत आम्हाला प्रयत्नपूर्वक 'राणी' नाव आणावे लागेल. ब्रिटिशांविरुद्ध नागांचा उठाव राणींच्या नेतृत्वाखाली झाला. त्यासाठी राणींना जन्मठेपेची सजा भोगावी लागली. दुर्दैवाने तुम्हा आम्हाला या देशाचा सगळा इतिहास माहित नाही. परिणाम प्रांताप्रांतात, जाती-जातीत नव्या नव्या भिंती उभ्या राहताहेत.



ईशान्य भारताच्या बाबतीत तर हे अज्ञान खूपच आहे. काही दिवसांपूर्वीची गोष्ट. माझा एक मित्र अरुणालच प्रदेशातून येथे आला होता. बाजारात तो खरेदी करायला गेला. त्याला दुकानदाराने प्रश्न विचारला., "Are you from China?" या प्रश्नाने तो दुखावला गेला. काही वर्षापूर्वी मला जेव्हा दिमापूरमध्ये, "Are you from India?" हा प्रश्न विचारला तेव्हाही मी असाच दुखावलो गेलो होतो. दिवसेंदिवस ईशान्य भारत आणि उर्वरित भारत यांच्यातील दरी वाढत चालली आहे. ही दरी कमी करायची असेल तर ईशान्य भारताबद्दल आपण माहिती मिळवत राहिले पाहजे. खरेतर ज्याला आज आपण ईशान्य भारत म्हणतो तो सारा भाग एकेकाळी पूर्व भारत होता. १९४७ च्या फाळणीनंतर पूर्व पाकिस्तानच्या (आताचा बांगला देश) रूपाने एक मोठा भाग वेगळा झाला. त्यामुळे ईशान्य भारताचा हा एक कोपरा उरलेल्या भारतापासून एकदम तुटल्यासारखा वाटतो. आज ईशान्य भारतात सात राज्ये आहेत. साधारणपणे ब्रह्मपुत्रेचे खोरे आणि त्या सभोवती असणारा डोंगराळ प्रदेश असे दोन मुख्य भाग या प्रदेशाचे होतात. मुळात हा साराच प्रदेश आसाम राज्यातच गणला जायचा. क्रमाक्रमाने वेगवेगळ्या राज्यांत त्याचे विभाजन होत गेले. तसे पाहिले तर मणिपूर राज्याला शेकडो वर्षांपासून स्वतंत्र अस्तित्व आहे. ब्रिटिश काळातही ते तसेच राहिले. त्रिपुरामध्ये बंगाली लोकांचे फार पूर्वीपासून स्थलांतर झाल्याने तेथेही बंगाली रितीरिवाज मोठ्या प्रमाणात आढळतात. नागाप्रदेश, मिझोराम, मेघालय व अरूणाचल प्रदेश ही आजची राज्ये मुख्यत: डोंगराळ आहेत. तेथे अंतर्गत भागात पोहोचण्यासाठी आजही दळणवळणाच्या चांगल्या सोयी नाहीत. ब्रिटिश काळातही मुख्यत: डोंगराळ सैनिकी व प्रशासकीय नियंत्रण कमी अधिक प्रमाणात होते. त्यामुळे त्या काळातही येथील लोकसमूहांची स्वतंत्र वृत्ती थोडीफार टिकून होती. स्वातंत्र्यानतर या अस्मिता उफाळून आल्याने टप्प्याटप्प्याने या प्रदेशांना प्रथम केंद्रशासित प्रदेश व नंतर राज्याचा दर्जा दिला गेला. पण आजही या राज्यांमध्ये चाललेल्या अतिरेकी चळवळींच्या बातम्या आपण वृत्तपत्रांतून वाचत असतो. या चळवळीत कोठेतरी फुटीरतेची बीजे रुजली गेली आहेत.

ईशान्य भारतातील सारीच राज्ये निसर्गसंपत्तीने नटलेली आहेत. साधारणपणे मार्च ते सप्टेंबर पावसाचा काळ असतो. काही भागात तर इतका पाऊस असतो की आठवडेच्या आठवडे सूर्यदर्शन नसते. जगातील सगळ्यात जास्त पावसाचे ठिकाण चेरापुंजी मेघालयातल्या डोंगर-रांगांवर वसलेले आहे. तिबेटमधून अडीच तीन हजार किलोमीटरचा प्रवास करून ब्रह्मपुत्रा नदी अरूणाचलप्रदेशातून भारतात प्रवेश करते. या एवढ्या मोठ्या प्रवासात तिला अनेक छोट्या मोठ्या उपनद्यांनी संपन्न केलेले असते. हिमालयाच्या


**विविध रोगांवर गुणकारी 'प्रबोधन सूक्ष्मौषधे' वापरा. संपर्क 'आयुर्वेद संशोधिका', ज्ञान प्रबोधिनी, पुणे.**

दऱ्याखोऱ्यातून वळसे घेत सदिया जवळ ती आसामच्या मैदानी प्रदेशात उतरते तेव्हा तिचे रूप प्रेक्षणीय असते. ऐन पावसाळ्यात गढुळलेले पाणीच पाणी सर्वत्र पसरलेले असते. काही ठिकाणी तर तिचे हे पात्र १०-१२ किलोमीटर रुंद असते. उगाच नाही तिला 'ब्रह्मपुत्रा' म्हणत आलो आहोत. पण ब्रह्मपुत्रा नव्हे तर तो आहे ब्रह्मपुत्र. अर्थात ब्रह्माचा पुत्र आणि आपल्या देशात पुल्लिंगात उल्लेख होणारा एकमेव नद! ब्रह्मपुत्रेच्या अनेक उपनद्या आहेत. सुभानतिरी, कामेंग, तिरप, दिबांग इ. या नद्याही खूप पाणी वाहून आणतात. त्यामुळे पावसाळ्यात आसामचा सारा प्रदेश जलमय होऊन जातो.

ईशान्य भारताच्या डोंगराळ भागात एकेकाळी खूप जंगले होती. उष्ण कटिबंधीय अरण्ये ज्याला म्हणतात (Tropical Rainforests)अशी सदाहरित अरण्ये जागोजागी दिसायची. या अरण्यातले वृक्ष दोन-दोनशे फूट उंच. सरळ वाढणारे. त्यांच्या अंगाखांद्यावर वाढणाऱ्या वेलींचे जाळे. पायाशी हत्तीएवढे उंच गवत. नाना-प्रकारची नेचे, ऑर्किड्स, सरळसोट वाढणाऱ्या बांबूच्या शेकडो जाती असं हे हिरव्या श्रीमंतीने नटलेले अरण्य हळुहळु माणसाची दृष्ट लागून नष्ट होत चाललं आहे. जोपर्यंत केवळ फिरत्या शेतीसाठी जंगले तोडली जात होती तोपर्यंत नैसर्गिक चक्राने त्याची पुनरुत्पत्ती होत होती. पुढे इमारती लाकूड, प्लायवूड यासाठी बेसुमार जंगलतोड होऊ लागली आणि हे चक्र बिघडले. आजही अनेक ठिकाणी अर्धवट तोडलेली जंगले आपलं ढासळणारं जुनं वैभव टिकवून कशीबशी उभी आहेत.

ईशान्य भारताच्या मैदानी भागातून जाताना लक्षात येत की मैलोगणती पसरलेली भातशेती. या भातशेतीच्या मध्येमध्ये गर्दझाडीत लपलेली छोटी छोटी गावं. गावांच्या भोवती बांबूची दाट बने, सुपारीच्या बागा. आसामच काय पण साऱ्या ईशान्येला वेड आहे ते तांबुल खाण्याचं. ओली सुपारी खाणं हे इथलं परंपरागत व्यसन. जेवण झाल्यावर यजमान आपल्यापुढे करेल ती ही ओली सुपारी. बाकी जेवण अगदी साधं. मुख्यत: भात आणि भातच. गव्हाची रोटी आपल्या नजरेलाही पडायची नाही. सोबत बऱ्याचदा मांसाहार. येथील ग्रामीण जीवन अगदी साधं पण कष्टाचं. वेळी अवेळी येणाऱ्या पुराने येथील शेतकऱ्यांना कायमच दैवाच्या लहरीला तोंड द्यावे लागते.

गुवाहाटी, नौगांव, दिब्रुगड, तेजपूर, तिनसुकिआ, सिल्चर ही आसामातली तर इटानगर, पासीघाट, तेजू ही अरूणाचलातील; दिमापूर, कोहिमा, मोकोचुंग ही नागा प्रदेशातील; इम्फाळ, उखरूल ही मणिपुरातील; मिझोराममध्ये ऐझॉल, त्रिपुरात आगरतला आणि मेघालयात शिलाँग ही या भागातील महत्त्वाची शहरे.

या साऱ्याच प्रदेशात अनेक लोकसमूह राहतात. आपल्या आपल्या वैशिष्ट्यपूर्ण चालीरिती आणि सण उत्सवांनी त्यांनी स्वत:चे असे व्यक्तिमत्त्व तयार केले आहे. आसाममध्ये अहोम, बोडो, कचारी, मिसिंग, करबी; अरूणालचात आदि, मिश्मी, निशी, आपतानी, मिरी, मोंपा इं.; नागाप्रदेशात अंगामी, आओ, कोन्याक; मणिपूरमध्ये कुकी; मिझोराममध्ये मिझो; त्रिपुरात त्रिपुरी, बंगाली; तर मेघालयात गारो, खासो आणि जैतिया असे मुख्य लोकसमूह आहेत. या सगळ्यांचे जीवन आपण समजून घेतले पाहिजे. त्यांचा इतिहास, त्यांची जीवनपद्धती, त्यांचे सण उत्सव हे कळले तर मग आपल्याला खऱ्या अर्थाने ईशान्य भारताची ओळख होईल. या ओळखीतून आपली, आपल्या देशाची ओळख दृढ होत जाईल.

**यासाठी आपण स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात एक विशेष योजना करत आहोत. छात्र प्रबोधनच्या सभासदांनी एका तरी ईशान्य भारतीय विद्यार्थ्याशी पत्रमैत्री करावी. यासाठी ईशान्येतल्या सातही राज्यातल्या विद्यार्थ्यांपैकी एकाचे नाव व पत्ता आम्ही तुम्हाला कळवू. प्रारंभीचे पत्र कसे लिहायचे याचे मार्गदर्शनही करू. अर्थात ही पत्रमैत्री इंग्रजी किंवा हिंदीतून सुरू करावी लागेल. नंतर मग परस्परांच्या पत्रांच्या देवाणघेवाणीतून तुमचा परिचय दृढ होईल. या मैत्रीची गोष्ट कधीतरी तुम्ही आम्हाला जरूर कळवायची. ज्यांना या पत्रमैत्री अभियानात सामील व्हायचे आहे त्यांनी एक जोडकार्डवर स्वत:चे नाव, पत्ता, छात्र प्रबोधन सभासद क्रमांक शाळा, इयत्ता, छंद एवढी माहिती लिहून पाठवायची आहे. जोडकार्डातील दुसऱ्या कार्डावर स्वत:चा पत्ता लिहायला विसरू नका. चला तर मग एकेक दोस्त मिळवत मिळवत सारा देश जोडूया.**

●●

**प्रा. विवेक पौंक्षे**
रघुराज सोसायटी, पुणे-सिंहगड रस्ता.



**''पंख सुरांचे'' ही छात्र प्रबोधन निर्मित ध्वनिफित आवर्जून ऐका, किंमत रू. ४५/-**

# भारतमातेची मुले

– सुभाष देशपांडे

आजकाल कुठल्याही शाळकरी मुलांच्या गटात कोणी ओरडलं, की ''भारतमाता ऽऽ की –'', तर उत्तर हमखास येणार –''जय!'' मग समजा गुरुजींनी एकदा 'जय' म्हणेल त्याला एक छडी, दुसऱ्यांदा 'जय' म्हटला तर शाळेतून काढून टाकणार? आणि एवढे होऊनही कोणी तिसऱ्यांदा 'जय' म्हटलेच, तर त्याला चाबकाचे फटके मारणार! तुम्ही म्हणाल, 'ह्याऽ, आमचे गुरुजी असे नियम घालणारच नाही.' विचारा पाहू तुमच्या गुरुजींना, की तुम्ही ठेवाल का असे दुष्ट नियम आणि ते तुमच्याएवढे असताना त्यांना कोणी म्हटले होते का असे? कदाचित त्यांना नसेल, पण त्यांच्याही शिक्षकांना मात्र ते विद्यार्थी असताना अशा नियमांना तोंड द्यावं लागलं होतं, असं ते म्हणतील!

फार जुनी नाही, केवळ ५० वर्षापूर्वीची ही गोष्ट आहे. तुमचे आजोबा शाळेत असतानाची. आज्या मात्र फारच थोड्या जणांच्या शाळा शिकत असणार त्या वेळी! तिरंगा झेंडा हाती घेऊन 'वंदे मातरम्' अशी घोषणा देणं हा १५ ऑगस्ट १९४७ या दिवसापूर्वी चक्क 'गुन्हा' होता, आणि त्यानंतर मात्र ती एक अभिमानाची गोष्ट झाली आहे. याला म्हणायचं स्वातंत्र्य! आपल्याला जे आनंदाचं, अभिमानाचं वाटतं, ते खुशाल करण्याचं स्वातंत्र्य. सगळ्या देशाला असं स्वातंत्र्य मिळून यंदा ५० वर्ष झाली. आणि इंग्रजी रँड साहेबाचा वध करणाऱ्या चाफेकर बंधूंना फाशी दिली गेली त्याला झाली १०० वर्षे. परदेशी कापडाची होळी केली म्हणून सावरकरांना फर्गसन कॉलेजातून काढून टाकलं गेलं, यालाही जवळपास शतक होतंय. 'भारतमाताऽकी जय' म्हणताना छातीवरून इंग्रजांची मोटार गेली ती हातातला झेंडा सोडला नाही. असे न नोंदले गेलेले शिरिषकुमार ही अनेक होते.

मित्रांनो, त्यांनाही 'हॅपी बर्थ डे टू यूऽ' असं त्यांच्या मित्रांनी केव्हातरी म्हटलं असणार. नव्या कोऱ्या वह्या पुस्तकांचं दप्तर त्यांना त्यांच्या आई-वडिलांनी वर्षाच्या सुरुवातीला भरून दिलं असणार. सध्या आपण जेव्हा शाळेत प्रतिज्ञा म्हणतो, की 'भारत माझा देश आहे', तेव्हा अशा मुलांचा त्याग, त्यांचा वारसा डोळ्यासमोर आला पाहिजे.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हे कळून चुकलं, की आता नवा भारत घडविला पाहिजे. अनेक शिक्षणसंस्था, संघटना त्यासाठी पुढे आल्या. त्यातली मुलं कशी होती? आपली ज्ञान प्रबोधिनी १९६२ साली स्थापन झाली, म्हणजे तिला यंदा ३५ वर्षे पूर्ण होताहेत. सुरुवातीच्या १० वर्षात प्रबोधिनी पूर्ण वेळाची शाळा नव्हती. मुलं दिवसा आपापल्या शाळेत जाऊन संध्याकाळची प्रबोधिनीत यायची. खूप खेळायची आणि मग २ तास अभ्यास. त्यात आजूबाजूच्या परिस्थितीची माहिती करून घ्यायची. चीननं आपल्याला युद्धात हरवलं होतं, त्याविरुद्ध त्वेषानं बोलायची. आपला महाराष्ट्र सगळ्या देशाच्या रक्षणासाठी सदैव पुढाकार घेत आला आहे, त्याची आठवण काढायची.

गणेशोत्सवात ढोल-ताशाच्या कडकडाटात धुंद होऊन बरची नृत्य करायचं, भगवा ध्वज नाचवायचा, म्हणजे देशभक्ती दाखवण्याचाच मार्ग होता. त्या आवेशाचं रूपांतर पालखीच्या वेळी भक्तीमध्ये व्हायचं. 'ज्ञानेश्वर माऊली'च्या बरोबर 'रामदास-शिवाजी' असं म्हणत वारकरी आणि धारकरी यांची सांगड समजावून घ्यायची.

अभ्यासाकडे दुर्लक्ष नव्हतं बरं का! १९६४ साली एस्. एस्. सी.ला प्रबोधिनीचा विद्यार्थी पहिला आला आणि मग पहिल्या तिसात यायची परंपराच सुरू झाली. पुढे पूर्ण वेळाची शाळा सुरू झाल्यावर आणि निगडी, सोलापूर केंद्र सुरू झाल्यावर घवघवीत यश मिळवून १०वी उत्तीर्ण व्हायचं, ही परंपरा चालूच आहे.

पण प्रबोधिनीची मुलं म्हणजे काही फक्त पुस्तकातले किडे नाहीत. स्नेहसंमेलनात बहारदार नाटकं सादर करणार, अभियान करीत गीत म्हणणार, स्वत:च एकांकिका लिहिणार आणि गटाने तयारी करून सादर करणार. सहलींची गंमत तर विचारूच नका. आठवीतली मुलं सायकलनं रायगडाला जायचं म्हणून हट्ट धरून बसली, अन् पंक्चर काढता काढता सहलप्रमुखांच्या नाकी नऊ आले. पावसाळी सहली म्हणजे तर मुद्दाम भिजत डोंगरदऱ्या पालथ्या घालायच्या. साहससहलीच त्या! एकदा सह्याद्रीच्या कडेकपारीत हिंडताना वाट चुकली आणि सहल पुण्याला चक्क २४ तास उशीरा

पोहोचली. एकीकडे परीक्षेत मार्कही उत्तम पडले पाहिजेत आणि दुसरीकडे असे उपद्व्यापही करता आले पाहिजेत अशी शिकवण आहे प्रबोधिनीच्या संस्थापकांची, डॉ. अप्पासाहेब पेंडसे यांची, आपल्या देशावर जीव ओवाळून टाका, असं ते म्हणत.

स्वामी विवेकानंदांनी तर म्हटले होते, 'जे सुकुमार आहे, सुकोमल आहे, नुकतेच उमललेले, वास न घेतलेले जे फूल असते, तेच देवाच्या चरणी व्हायचे असते.' असं लहान वयातच भारतमातेच्या चरणी आपलं जीवनपुष्प अर्पण करण्याचा निश्चय करायला प्रबोधिनी शिकविते. आपल्याला ज्यांच्या कष्टांमुळे सुखी आयुष्य जगायला मिळते, त्यांचीही जाणीव ठेवा, असं स्वामीजी म्हणत. खेडोपाडी जाऊन तिथल्या चंद्रमौळी झोपडीत कांबळं अंथरून झोपता आलं पाहिजे, ते एवढ्यासाठी.

गेल्या ३५ वर्षात प्रबोधिनीतल्या मुलांनी 'भारत मातेची मुलं' बनण्याचा आटोकाट प्रयत्न चालविला आहे. ते नवीन विज्ञान आत्मसात करीत असतात. नव्या वस्तू तयार करा म्हटलं, तर एकाने एस. पी. कॉलेजच्या तलावात रिमोट कंट्रोलवर चालणारी बोट तयार केली होती, तर दुसऱ्यानं न्यू इंग्लिश स्कूलच्या मैदानावरती बॅटरीच्या साहाय्यानं हवेत उंच उडणारं विमान तयार केलं होतं. अलीकडे संगणक (कॉम्प्यूटर) हा तर नवा खेळगडीच बनला आहे.

प्रत्येक विद्यार्थ्याला आणि प्रत्येक विद्यार्थिनीला आपला अभ्यास सांभाळून स्वत:चं व्यक्तिमत्त्व चौफेर बनवता येतं.

''खेळ खूप खेळून सतेज व्हायचे। रोज नवे ज्ञानदिवे, चेतवायचे ।।'' असं म्हणत म्हणत एका वेगळ्या प्रकारच्या




आयुष्याची स्वप्नं पाहायची, म्हणजे ज्ञान प्रबोधिनीतलं होऊन जायचं, भारतमातेची मुलं होण्याचा तो एक सर्वोत्तम मार्ग आहे।

गेल्या काही वर्षात पुण्याबाहेरही प्रबोधिनीचे वेगवेगळे कार्यक्रम होत आहेत. छात्र प्रबोधन मासिकाचे वाचक म्हणून प्रबोधिनीची तुमची ओळख वाढत चालली असेल. देशाच्या स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव आणि प्रबोधिनीचा ३५वा वाढदिवस, या शुभवर्षी तुम्ही शालेय वयोगटात आहात, हे मोठं भाग्य आहे. उज्ज्वल आणि विस्तीर्ण भविष्यकाळ तुमच्या डोळ्यांसमोर आहे.

अमेरिकेचे 'पाथ फाईंडर' हे यान नुकतचं मंगळावर उतरलं. चंद्रावर माणूस उतरला त्याला आता ३० वर्ष झाली. त्यावेळी ज्या मुलांनी आपल्या गोष्टींच्या पुस्तकात वाचलं होतं, की आता स्वारी मंगळावर, त्या मुलांनी मोठेपणी ते म्हणणं चक्क खरं करून दाखविलं! आपल्यालाही हे जमलं पाहिजे. अभिमानाची गोष्ट म्हणजे आपले उपग्रह अवकाशात पाठविणारी यानं आपण आता भारतात करू शकतो. सर्वच बाबतीत प्रगती करून भारत जगातील एक महासत्ता बनण्याच्या मार्गावर आहे, असे आपले प्रबोधिनीचे अध्यक्ष डॉ. वसंतराव गोवारीकर म्हणतात; ते तुमच्या आमच्या भरवशावर!

याच्यापुढची १० वर्ष कशी असतील? स्वातंत्र्याच्या हीरकमहोत्वात भारत खरंच 'महान' होईल ना? ''विजयश्रीका मुकुट फिरसे। मातृमस्तकपर विराजे।'' अशी आकांक्षा बाळगणारी दुसरी कोण असणार, तुम्ही भारतमातेची मुलंच!

त्यासाठी आत्तापासून कंबर कसली पाहिजे. आपण भारतीय आहोत, याचा अभिमान बाळगला पाहिजे. भारतीय भाषा बोलल्या पाहिजेत. अर्धवट इंग्रजीमिश्रित मराठी किंवा टी.व्ही. वरचं हिंदी नाही. इंग्रजीसकट अनेक भाषा तिच्या शुद्धतेसह, शैलीदारपणे आत्मसात करता आल्या पाहिजेत. भारतीय भाषेची, भारतीय वेषाची आणि स्वदेशी वस्तूची लाज वाटायला नको. अभिमानानं मिरवण्याच्या या गोष्टी आहेत. आपण जेवढे स्वाभिमानी होऊ, कार्यक्षम होऊ, तेवढं जग आपल्यामागे येईल, एरवी दुसऱ्याची आंधळी नक्कल करणाऱ्याला जगात विचारतो कोण?

आणि हो, 'लहान तोंडी मोठा घास' घेतला पाहिजे. देशभक्तीला वय नसतं. लहान वयातच अनेक गोष्टी समजावून घ्या, खूप प्रवास करा, वाचन करा, चर्चा करा, कर्तृत्ववान स्त्री-पुरुषांच्या जीवनाचा अभ्यास करा. 'आपण त्यांच्या समान व्हावे, हाचि सापडे बोध खरा', असं तुम्हालाही वाटेल. कारण काही झालं तरी तुम्ही अखेर 'भारतमातेची मुलं' आहात! ●●

**सुभाष देशपांडे**
ज्ञानप्रबोधिनी, पुणे



**''पंख सुरांचे'' ही छात्र प्रबोधन निर्मित ध्वनिफित आवर्जून ऐका, किंमत रू. ४५/-**

# सप्टेंबर मधील कार्यक्रम

## गणेशोत्सवातील सहभाग

लोकमान्य टिळकांनी समाज प्रबोधनासाठी, समाजजागृतीसाठी आणि समाज संघटित व्हावा यासाठी गणेशोत्सव सुरू केला. उत्सव म्हणून गेल्या १०० वर्षांमध्ये निश्चितच तो फोफावला आहे. गावोगावी, गल्ली-गल्लीत, चौका-चौकात गणेशात्सव मंडळे मोठ्या धुमधडाक्यात हा उत्सव साजरा करतात. पण या उत्सवाची मूळ प्रेरणा हरवत चाललेली जावणते अन् मग आपणही या सार्वजनिक गोष्टींपासून बाजूला राहतो. मुलामुलींनी विद्यार्थ्यांनी त्यात सहभागी होऊ नये असे सुचवत असतो, या पार्श्वभूमीवर, विद्यार्थ्यांचा १५ ते २० मिनिटांचा एखादा कार्यक्रम गणेशोत्सवामध्ये सादर करता येईल का? प्रचलित प्रश्नांवर एखादे नाटुकले, प्रसंगनाट्य, स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त काही पथनाट्य, कवितेवर आधारित कार्यक्रम, स्फूर्तिगीते, साभिनय गीत, घोषणा असे काही त्यामध्ये असू शकेल. विद्यार्थ्यांनीच योग्य त्या माध्यमाची निवड करावी. त्यासाठी काही लेखन करावे. त्याचा सराव करावा आणि गणेशोत्सवाच्या काळात विविध मंडळांसमोर चौकांमध्ये हा कार्यक्रम सादर करावा. स्नेहसंमेलनामध्ये एखादा कार्यक्रम सादर करणं वेगळं अन् अशा खुल्या व्यासपीठावर कार्यक्रम सादर करणं वेगळं. यातून लोकांसमोर आपले विचार प्रभावीपणे मांडण्याची संधी मुलांना मिळावी, त्यातून त्यांचा आत्मविश्वास वाढावा, एखादा कार्यक्रम चांगला करण्यासाठी करावे लागणारे सामूहिक प्रयत्न, कष्ट याची त्यांना जाण यावी, गटकार्याचा अनुभव मिळावा यादृष्टीने असा कार्यक्रम बसवावा. गरजेप्रमाणे कार्यक्रम बसविण्यासाठी व तो सादर करण्यासाठी आवश्यक ते साहाय्य करावे. १० ते १५ जणांचा एक कार्यक्रम, असे उपस्थितीनुसार २-३ कार्यक्रम बसवावेत. गर्दी आकर्षून घेण्यासाठी व कार्यक्रमाच्या शेवटी त्यांच्या ओठावर एखादी देशभक्तीपर ओळ गुणगुणत राहावी, यासाठी सोप्या चालीतील, ठेक्यावरील छानसे स्फूर्तिगीत यामध्ये अवश्य असावे. कार्यक्रम झाल्यावर त्याबद्दल अवश्य कळवावे.

# ‘छात्र प्रबोधन’ची स्थानिक कार्यालये


**निगडी** : ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, पेठ क्र. २५, निगडी, पुणे ४४ . ☎ ७८४३८०
**सोलापूर** : ज्ञान प्रबोधिनी, बाल विकास मंदिर, डफरिन चौक, सोलापूर. ☎ ६२५७८२
**सातारा** : श्री. सतीश कुलकर्णी, प्लॉट नं. ५१, सर्व्हे नं.३२७/१अ, अंजली कॉलनी, करंजे तर्फे, सातारा. ☎ ५०५०४
**सांगली** : श्री. शैलेंद्र केळकर, ६९२ गावभाग, खाडिलकर गल्ली, सांगली. ☎ ३३१३८२
**कोल्हापूर** : डॉ. शुभांगी कुलकर्णी, आशीर्वाद हॉस्पिटल, बिनखांबी गणेश मंदिराजवळ, कोल्हापूर. ☎ ५२१५३४
**इचलकरंजी** : श्री विनायक गद्रे, वॉर्ड नं. ५, घर नं. ६७ अ, झेंडा चौक, इचलकरंजी ☎ ४२४००८
**नाशिक** : सौ. साधना गाडगीळ, रामकृष्णधाम, श्रीरामवाडी, म. गांधी रस्ता, नाशिक ☎ ५७४८३०
**ठाणे** : डॉ. अजित दातार, बी २० अहिल्या सोसा., घंटाळी रस्ता, ठाणे (प.) ☎ ५४२१०८७
**डोंबिवली** : सौ. सविता सुनील ढोणसळे, बी-१३ कॉमेटकुंज को. हौ. सो., टिळकनगर शाळेजवळ, डोंबिवली(पू.) ☎ ४५४६८८
**बोरिवली** : सौ.अर्चना अशोक साठे, साठे हाऊस, क्रासरोड नं. २, बोरिवली(पू.) ☎ ८०६०२४१
**पार्ले** : सौ. वसुंधरा भोसले, ‘त्रिमूर्ती’ प्लॉट नं. ३९, तेजपाल स्कीम, रोड नं. ३, विलेपार्ले (पू.) ☎ ८२०४०७६
**अलिबाग** : श्री. राम जोशी, १, कृष्णविहार, समर्थ नगर, पिंपळघाट, अलिबाग. ☎ २४६०३
**रत्नागिरी** : सौ. अंजली कार्लेकर, लक्ष्मीबाई लिमये चाळ, जोशी पाळंद, रत्नागिरी. ☎ २०७२४
**धुळे** : सौ. उषा पाठक, धुळे अर्बन बँक, गरूडबाग, धुळे.
**परभणी** : श्री. दिलीप राके, ‘पारस’ नाथनगर, परभणी.
**लातूर** : डॉ. अरूणा देवधर, विद्यानगर, विवेकानंद रुग्णालय, लातूर ☎ ४३६१४
**औरंगाबाद** : सौ. स्वाती पळसकर, सनी कॉर्नर, दुसरा मजला, पैठण गेट, औरंगाबाद. ☎ २३३२६

**या कार्यालयांमध्ये छात्र प्रबोधन मासिकाची, ‘प्र’शिक्षक या शिक्षकांसाठीच्या द्वैमासिकाची वर्गणी स्वीकारली जाईल. तसेच ज्ञान प्रबोधिनीची विविध प्रकाशने विक्रीसाठी उपलब्ध असतील.**

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक प्रा. महेंद्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १५ श्रावण शके १९१९, ६ ऑगस्ट १९९७ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातुबाग, पुणे येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिद्ध



**‘‘पंख सुरांचे’’ ही छात्र प्रबोधन निर्मित ध्वनिफित आवर्जून ऐका, किंमत रू. ४५/-**


अनोखा
पूर्वांचल!

नोंदणी क्रमांक : PHM/22/VIII/1997, टपाल नोंदणी क्र. छात्र प्रबोधन; PNCW/349, तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र.- L 128

# नव्या युगाचे

नव्या युगाचे पाइक आम्ही तारे नवक्षितिजावरचे
निजरुधिराची आण वाहुनी रूप पालटू देशाचे ॥ध्रु.॥

आद्यकवींनी चित्रियलेली भूमी ही सुजला सुफला
रूप तियेचे आज पाहुनी चीड चेतवी चित्ताला
सुजल-सुफलता पुन्हा निर्मिण्या कोटि कोटि व्यापू गगने
भागिरथीला प्रसन्न करण्या वाहू यत्नांची सुमने
घराघरातुन मनामनातुन दीप चेतवू स्फूर्तीचे ॥१॥

यंत्रदेव तो पूज्य अम्हाला पूज्य अम्हाला वेदऋचा
विज्ञानावर भक्ति असुनही गंध मोहवी काव्याचा
पूजनीय तो उंच हिमालय पूज्य अम्हाला सागर हा
भव्यत्वाची साक्ष ज्यामध्ये पूजा त्याची करू महा
या सर्वांच्या पूजांमधुनी पूजन करू या शक्तीचे ॥२॥

समोर मूर्ती मातृभूमिची आज न काही प्रिय दुसरे
शुद्ध मनाचे कोंदण करुनी तिच्या रूपाचे जडवू हिरे
स्वयंप्रकाशित अम्ही काजवे दुष्ट ग्रहांवर मात करू
आकांक्षांच्या पूर्तीसाठी मृत्यूशीही होड धरू
त्यागपत्र हे आजच लिहिले अवघ्या जीवनपुष्पाचे ॥३॥

**संपर्क पत्ता :**
संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ,
पुणे 411030 ☎ (०२१२) ४७७६९१, ४७८०९५
**कार्यालयाची वेळ** : स. १० ते संध्या. ७
**या अंकाची किंमत** : रु. १०/-
**वार्षिक वर्गणी** : रुपये १२५/-
**प्रकाशन दिनांक** : राष्ट्रीय सौर १५ श्रावण, शके १९१९
६ ऑगस्ट १९९७